7503
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं. ३२
REFBK-0000114

सं. नि.
१५१.१५२,१५

REFBK-0000114

# गणपत्युत्सव मीमांसा.

"बालविद्वज्जन सभे" तर्फे
इ०सन १९०१ सालीं

## रा. रा. केशव हरि पौडवाल

यांनीं दिलेलें व्याख्यान.

---

Religion is one of the necessities of man's
moral Nature,
It is the spontaneous homage of the human-
heart to Nature and Nature's God.

---

प्रकाशक,

रा. रा. रामचंद्र यशवंत पवार यांनीं

मुंबई

"कर्नाटक" प्रेसमध्यें छापिलें.

इ० सन १९०२.

किंमत २ आणे.

# प्रस्तावना.

रा. रा. केशव हरी पौंडवाल यांनीं "बालविद्वज्जनसभे" तर्फे गणपत्युत्सवावर दिलेलें व्याख्यान स्वतंत्र पुस्तकरूपानें छापवून प्रसिद्ध करावें ह्मणून त्यावेळीं त्यांना बऱ्याच इसमांकडून सांगण्यांत आलें होतें. परंतु तसें त्यांनीं कबूल न करतां 'व्याख्यान वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करतों' ह्मणून सांगितलें. व त्याप्रमाणें व्याख्यानाचा अर्धा मजकूर येथील सुप्रसिद्ध इंदुप्रकाश नांवाच्या पत्रांतून प्रसिद्ध केला व पुढील मजकूर प्रसिद्धीकरतां पाठविण्यापूर्वीच ह्मणजे समग्र लेख न वाचतां इंदुप्रकाशकारांनीं त्यांच्या पत्रांतून प्रसिद्ध झालेला अर्धाच लेख ध्यानांत घेऊन मेळ्याविरुद्ध वरीच टीका केली व रा. रा. पौंडवाल यांनीं पाठविलेला पुढील लेख प्रसिद्ध केला नाहीं. तो बराच उपयुक्त असून त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें गणपत्युत्सवाची योग्य व्यवस्था करण्यांत आल्यास त्यापासून पुष्कळ हित होणार आहे असें वाटून समग्र व्याख्यान प्रत्येकाच्या नजरेखालून जावें ह्मणून स्वतंत्र पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. तो हेतु श्री सिद्धिविनायक पूर्ण करो.

रा. य. पवार,

प्रकाशक.

# प्रस्तावना.

गणपत्युत्सवाची शांतपणें विचारणा करण्याची हीच वेळा योग्य आहे असें वाटल्यावरून पुढील लेख लिहिला आहे. उत्सवाचें वारें जोंपर्यंत मोठ्या जोरानें [illegible] होतें तोंपर्यंत त्याच्या इष्टानिष्ट परिणामांकडे लोकांचें लक्ष वेधून त्याबद्दल योग्य विचार होणें अशक्य होतें, परंतु आतां वाऱ्याचा जोर कमी झाल्यामुळें वादळ शांत झालें आहे. विकारवश होण्याचा संभव कमी दिसत आहे, अर्थात् अशा वेळीं सर्वत्रांकडून दोन्ही बाजूंचा विचार योग्य रीतीनें होण्याची शक्यता आहे हेंच आज हा विषय पुढें येण्याचें विशेष कारण होय.

के० ह० पौडवाल.

# गणपत्युत्सव मीमांसा.

अव्यक्तोपासना दुःखमधिकंतेनलभ्यते।
व्यक्तस्योपासनात्साध्यंतदेवा व्यक्त भक्तितः।

गणेशगीता.

"उत्सव प्रियाः खलुमनुष्याः" उत्सवप्रिय मनुष्य नाहीं असें कधींही व्हावयाचें नाहीं. स्वभावतांच मनुष्याच्या मनाचा ओढा उत्सवाकडे असतो. उत्सवाची मूळ कल्पना अस्तित्वांत आली कशी याचा एकंदर इतिहास पाहिला असतां हें सहज कळून येणार आहे. आतां उत्सवाचा साद्यंत इतिहास येथें देतां येणें अशक्य आहे. तरी पण थोडक्यांत इतकें सांगितलें ह्मणजे बस्स होणार आहे कीं बरेच दिवस श्रम करून मनुष्य त्रासला ह्मणजे त्यास विश्रांति घ्यावीशी वाटते. विश्रांति घेणें ह्मणजे स्वस्थ बसणें वा झोंपा काढणें नव्हे. झोंप ही प्रत्येक रात्रीं मनुष्य घेत असतो, व ती एक विश्रांतीच आहे. परंतु वर निर्दिष्ट केलेल्या विश्रांतिहून ती पुष्कळ अंशीं निराळी आहे. दिवसा श्रम न केले तरी रात्रौ झोंपी जावें लागतें व तसें करणें अत्यावश्यक असतें; तरी त्यापासून बरेच दिवस केलेल्या श्रमांचा परिहार होतो असें ह्मणतां येत नाहीं. बरेच श्रम करून दोनचार दिवस विश्रांति घ्यावयाची ती झोंपेच्या रूपानें वा कांहीं एक हालचाल न करितां स्वस्थ बसून घेतली तर त्यापासून श्रमाचा परिहार होईल असें मुळींच ह्मणतां येणार नाहीं. अगोदर दोनचार दिवस एकसारखी निद्राच येणें अशक्य आहे. व तसें कदाचित् घडलें तरी त्यापासून मनाचें खरें समाधान न होतां उलट त्रास मात्र होणार आहे हें कोणीही कबूल करील. तर जेणेंकरून अति श्रमापासून झालेला मनाचा त्रास कमी होईल, ह्मणजे मन उल्हासित होऊन आनंदित राहील व पूर्ववत् श्रम करण्यास तयार

होईल असें करणें यालाच खरी विश्रांति ह्मणतात. उत्सवाची अशाच रीतीनें उत्पत्ति झाली आहे. रानटी स्थितींत मूळकल्पनेचा उद्भव अशाच रीतीनें झाला आहे असें उपलब्ध असलेल्या त्या काळच्या त्रोटक इतिहासावरून कळतें. चाकरी करणाऱ्या लोकांस बरेच दिवसांतून एखादे दिवशीं रजा मिळाली ह्मणजे ते तो दिवस कशा रीतीनें घालवितात याचा प्रत्येकास अनुभव आहेच. सारांश उत्सवाचा हेतु त्रासलेल्या मनास उल्हासित करण्याचा आहे. पृथ्वीवरील निरनिराळ्या प्रदेशांतील निरनिराळ्या जातींत होणाऱ्या उत्सवाच्या मुळाशीं हाच हेतु असला पाहिजे. आमच्यांतील निरनिराळ्या उत्सवांची योजना याच तत्वावर झालेली आहे असें निरीक्षण करणाऱ्या प्रत्येक इसमाच्या नजरेस आल्यावांचून राहणार नाहीं. रानटी स्थितींत उत्सवाचे प्रकार त्यांच्या स्थितीला व ज्ञानाला साजतील अशाच प्रकारचे होते. व तसें असणें हें साहजिक होतें; परंतु पुढें जसजशी ती स्थिति नष्ट होत गेली, तसतसा उत्सवांतील कांहीं रानटी प्रकारासही फांटा मिळत गेला. अलिकडे अलिकडे कांहीं उत्सवांना विशेष उज्वल स्वरूप येत चाललें आहे. गणेशोत्सव हें त्याचें ढळढळीत उदाहरण आज आपल्या डोळ्यांसमोर आहे. होलिकोत्सव, विजयादशमीचा उत्सव सुद्धां याच सदरांत येणारीं उदाहरणें आहेत. परंतु त्यांची या ठिकाणीं विचारणा करण्याची आवश्यकता नाहीं.

गणपत्युत्सव हें हिंदु मुसलमानांच्या दंग्याचें पर्यवसान होय असें कित्येकांचें ह्मणणें आहे. मुंबई, पुणें व इतर स्थळीं मुसलमान लोकांनीं कारण नसतां कुरापती काढून हिंदु लोकांस जो त्रास दिला व त्यांच्याशीं जें वाईट रीतीचें वर्तन केलें त्याचा योग्य मोबदला देण्याकरितांच कांहीं पुढाऱ्यांनीं ही युक्ति ( गणेशोत्सवाची कल्पना ) काढली आहे व या उत्सवांत मोहरमांतील सर्व साधनांची योजनाही केली आहे. तेणेंकरून खालच्या प्रतीच्या लोकांस या उत्सवांत मिसळतां येऊन, मोहरमच्या सणापासून अलग राहतां येतें इ० आशयाचें ह्या उत्सवाच्या द्वेष्टयांचें मत आहे. परंतु हें मत किती निराधार

व चुकीचें आहे हें आतां चांगलेंच सिद्ध झालें आहे. राजेरजवाड्यांतील गणपत्युत्सवाच्या थाटाची ज्यांस कल्पना असेल त्यांस अलीकडील उत्सवास आलेलें स्वरूप विशेष नवीनसें वाटणार नाहीं. कोल्हापूर, सातारा, पुणें, सांगली, मिरज इ० ठिकाणीं प्रतिवर्षी मोठ्या थाटानें होत असलेले श्रीमंगलमूर्तीचे उत्सव प्रत्यक्ष नजरेनें पाहिलेले कांहीं वृद्ध गृहस्थ अद्यापपावेतों हयात आहेत, ते याची चांगली साक्ष देतील. साधारण श्रीमंत गृहस्थांकडील हल्लींचा गणपत्युत्सवाचा थाट पाहिला तरीसुद्धां पूर्वींच्या रीतीची कल्पना करितां येणार आहे. गणपतीची स्थापना ज्या जागेंत करावयाची ती जागा प्रथमतः चांगली रंग वगैरे देऊन सुशोभित करावयाची, मग हंड्या, झुंबरें, आरसे इ० लावून चांगली आरास करून उत्तम चित्रकारास सांगून मुद्दाम बनविलेली मृण्मय श्रीगजाननाची मूर्ति आणवून तिची तेथें स्थापना करावयाची. व शक्त्यनुसार दीड दिवस, तीन दिवस, पांच दिवस, सात दिवस वा दहा दिवस समारंभ मोठ्या प्रेमानें व थाटानें करावयाचा. रोज कथा, कीर्तन व ब्राह्मणभोजन व्हावयाचें. व शेवटच्या दिवशीं पालखींत घालून वा इतर वाहनांतून वाजत गाजत समुद्रतीरीं वा इतरत्र सोइस्कर पडेल त्या ठिकाणीं नेऊन तिचें विसर्जन करावयाचें. पूर्वी राजेलोक व त्यांचे आश्रित अशांकडून पुढाकार घेऊन हे उत्सव होत असत. परंतु अलीकडे तो मनु वदलल्यामुळें स्वतः लोकांसच पुढाकार घेऊन हे उत्सव करावे लागत आहेत. आणि त्याचमानानें देशकाळाला अनुसरून त्यांत फेरबदल झाला आहे. सारांश, उत्सवाची कल्पना नवीन आहे, मुसलमान लोकांस खिजविण्याकरितांच त्याचा जन्म झाला आहे, असें ह्मणणें कितपत योग्य आहे याचा विचार वाचकांनींच करावा. कावळा बसावयास व डहाळी मोडण्यास एक समयावच्छेदेंकरून सुरुवात झाल्यामुळें कावळ्याच्या भारानें डहाळी मोडली हें ह्मणणें जितकें शहाणपणाचें, न्याय्य व नीतीला अनुसरून होईल तितकेंच सत्य वरील विधानांत आहे. दुसरी गोष्ट गणपत्युत्सव हे

मुसळमानांच्या डोल्यांचें अनुकरण आहे असें मानलें तर त्यांत हिंदूंचाच कमीपणा दिसून येणार आहे. कारण ज्या गोष्टीचें अनुकरण करावयाचें त्या गोष्टीसंबंधानें प्रथमतः अनुकरण करणाऱ्याच्या मनांत श्रेष्ठता, पूज्यता, आदरबुद्धि, मान इ० विकारांचा उद्भव झाला पाहिजे. ह्मणजे प्रथमतः अनुकरणीय गोष्टीचें श्रेष्ठत्व कबूल केलें पाहिजे आणि त्याप्रमाणें गणपत्युत्सव हें डोल्यांचें अनुकरण मानलें तर मुसलमानांच्या डोल्यांच्या उत्सवास श्रेष्ठत्व द्यावें लागेल. अर्थात् तेणेंकरून मुसलमानांस हें एक अभिमान बाळगण्यासारखें कारण होऊन उलट हिंदूंची या अनुकरणानें मानहानि झाल्यासारखें होणार आहे.

मुसलमान लोकांस खिजविण्याकरितां जर या उत्सवाची उत्पत्ति आहे, तर जे लोक या उत्सवांत मोठ्या भक्तीनें व प्रेमानें नाचतात तेच लोक मोहरमच्या सणांत डोल्यांच्या मेळ्यांत नाचतांना हल्ली दृष्टीस पडतात, हें कसें? सारांश हा उत्सव कोणाचें अनुकरण नसून कोणास खिजविण्याकारितां वा कोणावर कडी करण्याकरितां उत्पन्न झाला नाहीं. तर केवळ मनरंजन होऊन सामान्यजनसमाजाचें लक्ष भक्तिमार्गाकडे लागावें व त्यांतच सध्यांच्या कालमानाला अनुसरून देशहिताच्या कार्यांसही हातभार लावतां यावा या हेतूवरच अस्तित्वांत आला आहे. आणि या दृष्टीनें यांत अजून बऱ्याच सुधारणा झाल्या पाहिजेत, व त्यासंबंधींच थोडा उल्लेख करावा ह्मणून मी हा प्रयत्न केला आहे. सामाजिक सुधारणेचे पुढारी डा. भांडारकर यांनीं एके प्रसंगीं मुंबईतील प्रार्थनासमाजांत उपदेश करतांना असें सांगितलें कीं धर्मासारखें राष्ट्रोन्नतीचें दुसरें साधन नाहीं. राष्ट्रोन्नतीचा धर्म हा पाया आहे. ह्मणून धर्माविषयीं जागृति ठेवणें हें प्रत्येक सुजाण मनुष्याचें कर्तव्य आहे, आणि हें खरें आहे; कारण त्याच्याच मदतीनें अन्य सुधारणा होणें सुलभ पडणार आहे.

नवीन शिक्षण पद्धतीनें आमच्या तरुण पिढींत धर्मासंबंधी बरीच अनास्था उत्पन्न केली. सूक्ष्मदृष्ट्या त्यांच्या आचाराचें निरीक्षण

केलें असतां धर्मसंबंधीं सर्व कर्में या पिढींतील लोकांनीं पार झुगारून दिलीं आहेत, असें आपणांस दिसून येईल. याचीं अन्यही कारणें असतील. परंतु नवीन शिक्षण पद्धतीचा अंमल येथें सुरु झाल्यापासून या बाबीकडे विशेष दुर्लक्ष झालें, हें कोणीही नाकबूल करणार नाहीं; इंग्रजी शिक्षण ज्या पिढीस प्रथमतः मिळून त्याचा परिणाम ज्या लोकांवर झाला त्यांस पश्चिमेकडील तेवढें चांगलें वाटूं लागलें, अर्थात् स्वकीयाबद्दल ते अगदीं बेपर्वा बनून आपलें पूर्वीचें काय आहे याचा अगदीं विचारच करीतनासे झाले. आपल्या शाळांतून हें शिक्षण मिळावें तर तेथेंही तें मिळत नाहीं. अलिकडे एक दोन शाळा शिवाय करून सर्व शाळांतून धर्माच्या अभ्यासाची अवगणना करण्यांत येत आहे. अशा प्रकारें शाळांतून धर्माच्या अभ्यासास फांटा मिळाल्यावर त्यांतून शिकून बाहेर पडलेल्या तरुण मंडळींत धर्मासंबंधीं अनास्था दिसून यावी यांत नवल तें काय? बरें घरीं आईबापांकडून तसा प्रयत्न व्हावा तर आईबापांस तसें करण्यास अवकाश नसतो व इच्छाही नसते. अर्थात् मुलगा मोठा झाल्यावर ह्मणजे कर्तासवरता होऊन स्वतंत्र झाल्यावर धर्म ह्मणजे काय व तो खातात कशाशीं याचा लहानपणांत मुळींच संस्कार नसल्यामुळें त्यासंबंधीं तो पुढेंही विचार करीत नाहीं. आणि अशा रीतीनें नवीन पिढीस आपल्या धर्माची मुळींच माहिती नसल्यामुळें आपल्या धर्मांत काय आहे, त्यापासून आपणांस कोणता बोध घेतां येईल इ० कांहींच समजत नाहीं; व त्याप्रमाणें त्यांच्या आचाराचें वळणही बदललेलें आहे. हा प्रकार पुढें चालू राहिल्यास आपल्या धर्मास अति निकृष्ट स्वरूप प्राप्त होऊन या श्रेष्ठ राष्ट्राचें अति नुकसान होईल व तो रसातळास जाईल, असें खात्रीनें भाकीत करण्यास कांहीं हरकत नाहीं. धर्मौदासिन्यामुळें इतर सर्व सुधारणेस कसा "खो" बसत आहे हें आजपर्यंतच्या अनुभवावरून आतां प्रत्येकाच्या चांगलें निदर्शनास येत चाललें आहे. राजकीय, सामाजिक, औद्योगिक इ० सर्व चळवळींस बळकटी येण्यास मूळबीजभूत धर्मसंबंधीं चळवळ

होय.* तेव्हां तत्संबंधीं प्रत्येक प्राणीमात्राच्या अंतःकरणांत प्रथमतः जागृति झाली पाहिजे. धर्मीशिवाय राष्ट्रास जीवन नाहीं. धर्म हा राष्ट्राचा जीवात्मा आहे ह्मणून तो राष्ट्ररूपी शरीरांत चांगल्या रीतीनें राहील असें करण्यास प्रत्येकानें झटलें पाहिजे. हिंदुस्थानांत धर्माचें प्राबल्य आहे आणि त्याच्याच जोरावर आजपर्यंत या राष्ट्राचा टिकाव निघाला आहे.† त्यानें ग्रीक, रोम, मिसर इ० अनेक राष्ट्रांची उन्नतावस्था व अवनत स्थिति ( लय ) पाहिली आहे. इतिहासांत असा कोणताही काळ मिळणार नाहीं कीं, ज्या काळीं आर्य (हिंदु) लोक नव्हते. परंतु सांप्रत त्याच राष्ट्राची अवस्था ठीक नाहीं. तो अति रुग्णावस्थेंत आहे. अर्थात् धर्मरूपी भेषजाच्या योगेंकरून ही रुग्णावस्था घालविली पाहिजे. युरोपांत तमोयुगांत ( Dark ages ) अशीच धर्मग्लानि झाली होती. तेव्हां ल्यूथरादि मंडळीनें मोठ्या प्रयत्नानें धर्माचा उद्धार केला. सर्व सुधारणांच्या मुळाशीं धर्माचा अति निकट संबंध असल्यामुळें धर्माचा उद्धार आधीं झाला पाहिजे. कांहीं शाळांतून अलिकडे या शिक्षणास अगदीं अल्प प्रमाणावर सुरवात झाली आहे, ह्मणून वर ह्मटलेंच आहे; यांत मुंबईतील आर्यन एज्युकेशन सोसायटीचा नंबर वर आहे. आणि या

---

* "आपलें कर्तव्य करण्याचा निश्चय स्थिर होण्यास धर्माची अवश्यकता आहे या बीजभूत व अत्यंत महत्वाच्या धर्मसंबंधीं विषयामध्यें जागृति झाल्याशिवाय इतर सर्व चळवळी व्यर्थ आहेत. आणि तिच्यासंबंधानें तर सर्व उपेक्षा आपल्या दृष्टीस पडते. ही जागृति आपणामध्यें व इतर सर्व जनांमध्यें करणें हा उद्देश प्रार्थना-समाज या संस्थेचा आहे. त्याचा सर्व कार्यभाग वाहण्याविषयीं आतां नवीन मंडळीनें सिद्ध असलें पाहिजे, आणि त्याची उपेक्षा केली तर अंतीं आपला नाश होईल. ह्याप्रमाणें पाहतां राष्ट्रीय उन्नतीस धर्माची अत्यंत आवश्यकता आहे." डा० भांडारकरांनीं १८९७ मध्यें मुंबई प्रार्थनासमाजांत केलेला उपदेश.

† हिंदुस्थानांत धर्माला श्रेष्ठत्व दिलें असून तो नेहमीं श्रेष्ठपदावरच राहणार. ( केसरी. )

दृष्टीनें त्या स्कुलच्या चालकांचे आभार मानणें अत्यावश्यक आहे. त्यांचा कित्ता इतर शाळाधिकारी गिरवितील अशी आशा आहे. याशिवाय दुसरा मार्ग—ज्या मार्गाचा लूथरादि प्रभृतीनें अवलंब केला—व्याख्यानादि प्रकार होय. परंतु या दुसऱ्या मार्गास तसेच विशेष प्रसंग आल्याशिवाय त्याचा उद्दिष्ट हेतु सिद्धीस जात नाहीं. व ते विशेष प्रसंग मनरंजन होऊन जर आले तर दुधांत साखर पडल्याप्रमाणेंच होतें. असे विशेष प्रसंग कोणते ह्मणाल तर राष्ट्रीय धार्मिक महोत्सव हेच होत. अशाच वेळीं पुष्कळ लोकांचा जमाव स्वभावतांच एके ठिकाणीं होत असल्यामुळें धर्मतत्वांचा त्यांच्या अंतःकरणांत ठसा उमटविण्याची फारच उत्तम सोय असते व अशाच प्रसंगामुळें धर्मजागृति होण्याचा अधिक संभव असतो. हें जगाच्या इतिहासाकडे पाहिलें असतां चांगलें कळून येणार आहे. आणि या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे पुणेंकरांनीं गणपत्युत्सवास दिलेलें नवीन स्वरूप धर्मजागृतीच्या कामीं योग्य असून अति अवश्यक व महत्वाचें आहे, असें खात्रीनें ह्मणतां येतें. व त्याचा कित्ता बहुतेक ठिकाणीं वळविला जात आहे, हेंही अति उत्तम आहे. ह्याच जागृतीच्या योगें आमच्या देशाची निकृष्ठ स्थिति नाहींशी होऊन तो उन्नतीच्या मार्गास लागेल यांत संशय नाहीं. परंतु हें तत्व सर्वत्रांच्या मनांत सारख्या रीतीनें बिंबलेलें नाहीं. फारच थोड्या लोकांचें या गोष्टीकडे लक्ष लागलें आहे; तरी त्या मंडळीनें कोणत्याही प्रकारें स्वताचें धैर्य खचूं न देतां हें जें अति महत्वाचें कार्य हातीं घेतलें आहे, तें तसेंच शिथिलता येऊं न देतां मोठ्या नेटानें पुढें चालवावें व त्यांत जें वाईट दिसेल तें सुधारण्याचें श्रेय संपादावें. धर्माच्या खऱ्या तत्वाची अशा प्रकारें अधिकाधिक वृद्धि होऊं लागली ह्मणजे त्याचा सर्वत्र प्रसार होऊन पुष्कळ मंडळी यांत सामील होऊन राष्ट्राची उन्नति होईल. पुष्कळ लोक या धर्मसंबंधीं उद्योगाकडे पाहून नाकें मुरडतात, त्याचें कारण हेंच कीं, त्यांच्या अंगीं धर्माचें महत्व जाणण्याची अजून योग्यता आली नाहीं. गतवर्षी मुंबईतील उत्सवांत कांहीं सुधारक पक्षाचीही मंडळी सामील झाली होती, व पुढें अधिकाधिक सामील होत जाईल.

अशा रीतीनें राजकीय सामाजिक इ० उन्नतींचा ज्यांत क्रमाक्रमानें संचार होत जाणार अशी मूळ जी धर्मोन्नति तिच्याकडे सर्वत्रांचें अधिकाधिक लक्ष वेधत जाणें हें राष्ट्राचें भाग्य समजलें पाजिजे.

वर निर्दिष्ट केलेल्या हेतूंकडे पाहिलें असतां अशा रीतीचे उत्सव असणें फारच जरूरीचें आहे हें सिद्ध झालेंच आणि माझ्या मतें या सार्वजनिक उत्सवाचें स्वरूप जसें असावयास पाहिजे तसें करण्याची योग्य तजवीज पुढारी मंडळीकडून होईल तर ही एक मोठी इतर देशहिताच्या ज्या अनेक संस्था आहेत, त्यांहीपेक्षां अति महत्वाची देशहितकारी संस्था होईल. इतकेंच नव्हे, तर या संस्थेकडून नांवाप्रमाणें खात्रीनें योग्य करणी ( देशहित ) होईल यांत बिलकुल संशय नाहीं.

१ **मेळेः**—या उत्सवांत प्रथमतः दृष्टीसमोर येणारा विषय म्हटला म्हणजे " मेळे " हा होय. त्यांसंबंधी दोनचार गोष्टींचा येथें उल्लेख करणें अत्यावश्यक आहे. मेळे असावे वा नसावे, यासंबंधी अजूनपर्यंत दोन्ही पक्षांकडून मुळींच चर्चा झालेली नाहीं. तेव्हां त्या वादांत न पडतां सध्यां चालू असलेल्या प्रकारांतच कोणत्या सुधारणा व्हावयास पाहिजेत त्याचा विचार करूं.

( अ ) मेळ्यांत म्हणावयाचीं पदें–कै० अण्णा किर्लोसकर यांनीं मराठी पदांस संगीताचें रूप देऊन जी जनमनरंजनाची नवी टूम काढली तीच पुढें बराच काळ प्रचारांत होती व कांहीं ठिकाणीं अजूनपर्यंत तिला सभ्य जनांत चांगला मान मिळत आहे; परंतु मध्यंतरीं तींत पाटणकरी चालीची भेसळ होऊन हल्लीं जिकडे तिकडे तिचेंच अनुकरण होऊं लागलें आहे. आणि तेणेंकरून शास्त्रीय संगीत गानांत अति घोंटाळा झाला आहे. पदाची चाल अमुकच असेल तर तें खुलतें, अन्यथा रंग येत नाहीं, असा बिलकूल प्रकार नाहीं सौभद्रांत कै० भाऊरावांनीं कोणतेंही म्हटलेलें पद जसें खुलत असे, तसें इतर कंपनींतील सुभद्रेच्या भूमिकेचें काम करणाऱ्यानें म्हटलेलें पद कां खुलूं नये ? सारांश रंग येणें ही गोष्ट मुख्यतः पदाच्या चालीवर अव-

 17 ९५१-१५३

लंबून नाहीं. चालीच्यासंबंधाचा मुद्दा अगदीं गौण आहे. तेव्हां मेळ्यांतील पदांच्या चाली अमुकच असाव्यात असा आग्रह धरितां येणार नाहीं. तरी पण ज्या चालींच्या योगानें संगीताची शास्त्रीय पद्धति विघडते अशा चालींस अजिवात फांटा दिलाच पाहिजे; ह्मणजे मेळ्याच्या योगानें संगीत शास्त्राची वृद्धि होऊन संगितांत चांगले गाणारे निपजतील असाही प्रयत्न मेळ्यांच्या पुढाऱ्यांकडून झाला पाहिजे.

पद्यांतील विषय यासंबंधानें पाहतां मनरंजन हा मेळ्याचा उद्देश आहे, तरी त्यांत भक्ति हा भाग मुख्य आहे. गणपत्युत्सवांतील मुख्य अंग ह्मटलें ह्मणजे भक्ति होय, अर्थात् इतर उद्देश अंगभूत आहेत. तेव्हां या मुद्याकडे विशेष लक्ष ठेवून त्याप्रमाणें आचार झाला पाहिजे. या दृष्टीनें मेळ्यांत ह्मणावयाचीं पदें सगळीं भक्तीनेंच ओतप्रोत भरलेलीं असलीं पाहिजेत. भक्तीवांचून त्यांत अन्य विषयांसंबंधानें चर्चा नसावी, असें माझें मत आहे. आतां देशकालमानाला अनुसरून राजकीय, औद्योगिक, सामाजिक इ० स्थित्यंतराची अवश्यकता आहे त्या त्या गोष्टीचाही समावेश यांत व्हावा असें पुष्कळांचें ह्मणणें आहे, व तें अन्यथा आहे असें ह्मणतां येणार नाहीं. परंतु त्यांत प्रमुखत्व भक्तिलाच दिलें पाहिजे. पुष्कळ पद्यें आज अशीं दाखवितां येतील कीं, त्यांत आराध्य देवतेसंबंधीं एक अक्षरही नसून कांहीं तरी बाष्कळ विषयांची चर्चा केलेली आहे. अशीं पद्यें गाळलीं पाहिजेत. तसेंच राजकीय विषयाची चर्चा करावयाची ह्मणजे ती किती जपून केली पाहिजे व ती करतांना किती दूरदृष्टि ठेविली पाहिजे याचा ज्यांत मुळींच विचार केलेला नाहीं, अशीं पद्यें उलट देशसुधारणेस विघातक होतात. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, अशाच पद्यांचा मेळ्यांत विशेष भरणा दिसतो. सरकारास शिव्या देऊन सरकारांत व प्रजेंत असंतोष उत्पन्न करणें यास राजकीय सुधारणा ह्मणावयाची असेल तर मुळींच प्रश्नच नाहीं. सामाजिक विषयासंबंधीं सुद्धां हाच प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो. उखाळ्या पाखाळ्या काढून एकमेकांस शिव्या देण्यांतच शब्दांचें अवडंबर मा-

जविलेलें आहे. सारांश ह्या पद्यांतील प्रकार टाळला पाहिजे. देश-हिताच्या विषयाची चर्चा अशा पद्धतीनें करावयाची असेल तर अशा विषयांस अजिबात फांटा द्यावा हेंच उत्तम. यानें देशाचें हित न होतां उलट नुकसान मात्र होणार आहे. याकडे उत्सवाच्या अध्वर्यूंचें लक्ष वेधून त्यांत वर सुचविल्याप्रमाणें योग्य सुधारणा करण्याचा प्रयत्न होईल अशी आहे.

( व ) पदें रचणारे कवि-अलीकडे, छापण्याची कला स्वस्त व सोपी झाल्यामुळें, उठावें त्यानें पदें रचित सुटावें असा हानिप्रद प्रकार सुरू झाला आहे. कविता रचण्याचें काम किती कठिण आहे हें आपलें पुराण प्राकृत कवी ज्ञानेश्वर, वामन, श्रीधर, एकनाथ, तुकाराम, मोरोपंत, रामदास इत्यादिकांनीं रचलेल्या अनेक विषयांवरील कविता पाहिल्या असतां कळून येणार आहे. ‘य’ ला ‘य’ व ‘र’ ला ‘र’ जुळला ह्मणजे कविता झाली असें समजणें अति घातक आहे; असल्या प्रकारचे ‘यमके’ कवी आपला अमोल्य वेळ अशा कामीं निरर्थक न दवडतील तर बरें. मेळ्यांतील पुष्कळ कविता अशा दाखविण्यांत येतील कीं ज्यांत ‘य’ ला ‘य’ व ‘र’ ला ‘र’ जुळविण्यापलिकडे कांहींच झालें नाहीं, इतकेंच नव्हे तर उलट अशा प्रकारें बादरायण विषयाची जुळणी केल्यामुळें लोकांत कवितेबद्दल असंतोष मात्र उत्पन्न झाला आहे. मुंबई व पुण्यासारख्या ठिकाणीं तरी जेथें बरीच विद्वान मंडळी या उत्सवांत पुढारी ह्मणून वागत आहे, त्यांनीं या प्रकारांत असा अव्यवस्थित गोंधळ माजूं द्यावा हें त्यांच्या विद्वत्तेला कमीपणा आणण्यासारखें आहे. राजकीय वा समाजिक विषयावर चर्चा करावयाची ह्मणजे ती किती जपून केली पाहिजे हें या विद्वानमंडळीस चांगलें अवगत असून त्यांनीं या बाबतींत मुळींच सुधारणा करूं नये हें चमत्कारिक नव्हे काय? यापुढें तरी या मंडळीनें स्वस्थ न बसतां आजपर्यंत छापून निघालेल्या सर्व कविता एकत्र करून त्याचें चांगलें परिक्षण करावें व योग्य कवितांचीच निवड करून त्याचें निराळें पुस्तक छापून काढावें व तेंच सर्व

ठिकाणीं सुरू करण्याची योजना करावी ह्मणजे हल्लींसारखा हास्यकारक, निंद्य व जनांत असंतोष उत्पन्न करणारा प्रकार बंद होऊन सध्यांचीं पदें ह्मणजे थट्टा आहे, असा लोकांचा समज होत चालला आहे तोही बंद होईल. या संबंधानें एक गोष्ट सुचवावयाची ती हीच कीं, प्रत्येक वर्षी मेळ्यांच्या कमेटीनें कोणता तरी एक उपयुक्त विषय नेमून त्यावर अमूक एक संखेपर्यंत पदें रचण्यास सर्वत्रांस शुभा ठेवावी व ज्यांचीं पदें उत्तम ठरतील त्यांस कांहीं तरी ठराविक बक्षिसें देऊन तीं पदें मेळ्यांत सुरू करावीं ह्मणजे खऱ्या कवींस उत्तेजन दिल्यासारखें होऊन मेळ्याच्या पदांतील विषयांची योजनाही चांगली होणार आहे; व पुढें जे जे कोणी कविता करतील त्यांतून ज्या उत्तम ठरतील त्या प्रत्येक वर्षी नवीन आवृत्तीच्या वेळीं त्याच पुस्तकास जोडण्यांत याव्या.

( क ) **मेळ्यांतील मंडळीचे पोषाखः**—पोषाखाची तऱ्हा कोणती असावी हें ठरवितां येणें कठीण आहे; व तें सर्वांस सारखें पसंत पडेल असेंही निश्चयात्मकतेनें सांगतां येत नाहीं. तेव्हां त्यासंबंधानें येथें कांहींच लिहितां येत नाहीं. तें पुढाऱ्यांच्या आवडनिवडीवर अवलंबून राहणार आहे. परंतु तसें करतांना त्यास इतकेंच सुचवावयाचें आहे कीं, पोषाखाकरितां लागणारें कापड मात्र स्वदेशी वापरावें. ह्मणजे या उद्देशानें तरी देशांतील एका कार्यास–अगदीं थोड्या प्रमाणावर कां होईना–हातभार लावल्यासारखें होणार आहे. गणपत्युत्सवांत हरएक कामांत लागणारें सर्व प्रकारचें कापड जर स्वदेशी खरेदी केलें तर त्यापासून कमी फायदा होईल असें नाहीं. असें एका कार्यांत योग्य वळण लागलें ह्मणजे इतर सर्व कार्यांतही तोच आचार जनांकडून होतो. तेव्हां स्वदेशी कापड वापरा ह्मणून ओरड करून जें कार्य व्हावयाचें आज किती वर्षें भिजत पडलें आहे तें अनायासें या उद्देशानें आरंभ करून पुरें होणार आहे. व तसें झालें ह्मणजे या खटपटीचे चालक कै० गणेश वासुदेव जोशी यांस स्वर्गी आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. विद्वान मंडळीस यासंबंधांत पुष्कळ गोष्टी करतां येण्यासारख्या आहेत.

**( ड ) मेळे मिरविण्याची वेळाः**—मेळे मिरविण्याची वेळा ८ ते १० असावी. मेळ्यांत विशेषतः तरुण विद्यार्थी मंडळींचा भरणा अधिक असल्या कारणानें त्यांस १० पलीकडे रोज जाग्रण करावयास लावणें पुष्कळ अंशीं अहितावह होणार आहे. सध्यां चालू असलेल्या शिक्षणपद्धतीप्रमाणें अभ्यास करून मेळ्याकडे दोनतीन तास विद्यार्थ्यांस देतां येणें अशक्य आहे. तेव्हां त्या गोष्टीकडे आधीं लक्ष देऊन हें उत्सवाचें कार्य उरकलें पाहिजे. कांहीं कांहीं ठिकाणीं मेळ्याची तयारी करण्या करितां तीनतीन, चारचार, महिने सारखी तालीम चालू असते, व ती विशेषतः रात्रीच्या प्रहरीं एकाद्या कोंदट हवेच्या जागीं चालू असते. तेणेंकरून लहान मुलांवर पुष्कळ अहितकर परिणाम झाल्याचें प्रत्यक्ष पाहण्यांतही आलें आहे. तेव्हां या अनिष्ट प्रकाराकडे मेळ्यांच्या चालकांचें लक्ष जाऊन त्यांत योग्य सुधारणा होणें अति जरूर आहे. निरोगी, सशक्त मनुष्याच्या झोंपेस एकदोन रात्र संक्षेप दिला तर त्यापासून त्याच्या शरीरावर किती वाईट परिणाम होतो, हें आपण प्रत्यक्ष पाहतों. मग लहान—सध्याच्या पद्धतिप्रमाणें शिक्षणाचा बोजा वाहणाऱ्या—विद्यार्थ्यांवर त्याचा किती अहितकर परिणाम होईल याची कल्पना वाचकांनींच करावी. उत्सवाच्या दिवसांत शनिवारीं मात्र एक वेळ जाग्रण केल्यास कदाचित् हरकत नाहीं. परंतु तदितरवारीं तो प्रकार सारखा चालू ठेवल्यास लहान मुलांचें आरोग्य बिघडल्यावांचून कदापि राहणार नाहीं. जाग्रणानें अभ्यासालाच अडथळा होईल इतकेंच नाहीं तर शरीरप्रकृतीवरही त्याचा परिणाम होऊन तो जन्मभर सोसावा लागेल. करितां हा ही प्रकार मेळ्यांच्या पुढाऱ्यांनीं लक्षांत घेणें अत्यंत अवश्यक आहे.

**२ व्याख्यान, कथा, पुराण, नाटक** हा ज्ञानसंपादनाचा दुसरा भाग या उत्सवांत अति महत्वाचा आहे. व्याख्यानश्रवणानें किती फायदा होतो हें या ठिकाणीं सांगण्याची अवश्यकता दिसत नाहीं. जनसमूहाला उपयुक्त ज्ञानाची माहिती करून देण्याचा हा एक श्रेष्ठतर व अति सुलभ मार्ग आहे. व्याख्यात्याला आपला विषय

श्रोत्यांच्या मनांत ठसविण्याची हातोटी चांगली साधली असली ह्मणजे त्याच्या भाषणाचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर झाल्यावांचून कदापि राहणार नाहीं. निबंधमालाकारानीं वक्तृत्व या विषयावर लेख लिहितांना प्रथमारंभींच एक श्लोक घातलेला आहे.

**तद्वक्ता सदसि ब्रवीतु वचनं यच्छृण्वतां चेतसः ।**
**प्रोल्लासं रसपूरणं श्रवणयो रक्ष्णोर्विकासश्रियम् ॥**
**क्षुन्निद्राश्रम दुःख कालगतिहृत् कार्यांतरप्रस्मृतिं ।**
**प्रोत्कंठामनिशं श्रुतौ वितनुते शोकं विरामादपि * ?**

अशा प्रकारचे वक्ते आज आपणांत किती आहेत? असा प्रश्न केला तर त्यास आपणांस उत्तर काय देतां येईल! 'मुळीं नाहींत' ह्या पंचाक्षरी मंत्राचाच उच्चार करावा लागेल. सांप्रतची स्वदेश स्थिति पाहतां वक्त्यांची या देशांत किती जरूर आहे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. तेव्हां ती वाण पुरी करण्याचें काम गणपत्युत्सवाच्या चालकांनीं प्रयत्न केल्यास त्यांकडून होणार आहे. वक्तृत्वोत्तेजक सभा, हेमंतव्याख्यानमाला, वसंतव्याख्यानमाला, इ० कडून हें कार्य होणार आहे असा कदाचित् कोणीं आक्षेप घेईल किंवा आजपर्यंतच्या अनुभवावरून वरील संस्थांकडून आजपर्यंत हें कार्य कितपत झालें आहे? तोच प्रकार गणपत्युत्सवाचा होणार, असाही उलट आक्षेप घेण्यास कोणी कमी करणार नाहीं. या आक्षेपास उत्तर इतकेंच कीं, वरील संस्थांकडून मुळींच कांहीं कार्य झालें नाहीं असें नाहीं. पंचवीस तीस वर्षांपूर्वी वक्तृत्वासंबंधीं जी स्थिति होती त्यापेक्षां हल्लीं थोड्या बहुत प्रकारें भाषण करणारे लोक प्रत्येक सभांतून दोनचार

---

* सभेंत उभें राहून वक्त्यानें बोलणें तर असें बोलावें कीं, जें ऐकतांना श्रोत्यांचीं अंतःकरणें प्रसन्न व्हावीं, कर्ण वाग्रसानें भरून जावे, आणि डोळे आश्चर्यानें विकास पावावे; तसेंच क्षुधा, निद्रा, श्रम, दुःख आणि कालगति यांचें त्यांस भान राहूं नये; इतर सर्व कार्यांचें विस्मरण पडून भाषण ऐकण्याकडेच त्यांस अतिशय उत्कंठा वाटावी; आणि तें संपलें असतां फार वाईट वाटावें!

तरी जे दृष्टीस पडतात तें वरील संस्थांचेंच फळ होय. दुसरी गोष्ट वरील संस्थांत नियमितपणा बिलकुल नसल्यामुळें त्यांपासून आजपर्यंत जितकें कार्य व्हावयास पाहिजे तितकें झालें नाहीं. एक वर्ष वक्तृत्वोत्तेजक समारंभ होतो तर चार वर्षे होत नाहीं मग त्यापासून होणारी फलनिष्पत्ति तशीच असावी यांत दोष कोणाचा? गणपत्युत्सव हा प्रतिवर्षी अवश्य होणारच व तो एकाच वेळीं सर्वत्र ठिकाणीं होणारा असल्यामुळें त्याचें प्रमाणही तितकेंच मोठें असणार. अर्थात् त्यापासून होणारें कार्यही मोठ्या प्रमाणावर असणार. तेव्हां यांत पुढारी मंडळींनीं योग्य धोरण ठेऊन वक्तृत्वकलेच्या प्रवृद्ध्यर्थ प्रयत्न केला तर होण्यासारखा आहे. कोणत्याही रीतीची योग्य चळवळ करण्यास यापासून किती मदत होते हें पाश्चात्य राष्ट्रांचा इतिहास पाहिला असतां चांगलें कळून येणार आहे. युरोपांत मध्यकालांत जेव्हां धर्माची ग्लानि होऊन अनाचार मातला तेव्हां ल्यूथरानें या दिशेनेंच प्रयत्न करून धर्मक्रांति केली. साक्रेटिस्, डिमॉस्थेनीस्, सिसरो, वर्क, पीट, फॉक्स वगैरे यांची सर्वत्रांस माहिती आहेच. त्यावरून जनसमूहाचें चित्ताकर्षण करून त्यास योग्य प्रकारचें वळण लावण्यास किंवा शिक्षण देण्यास हा प्रकार किती साधनीभूत होतो हें दिसून येईल. मिशनरी मंडळीनें हिंदुस्थानांत येऊन येथील बऱ्याच लोकांस आपल्या कंपूंत ओढलें त्याचें कारणही हीं व्याख्यानेंच होत. तेव्हां गणपत्युत्सवांत व्याख्यानें देण्याचा प्रकार सुरू केला आहे तो फारच चांगला आहे व त्यापासून पुष्कळ फायदा होणार आहे.

जनसमूहास नीतिवादाची प्रेमळ कथानकें सांगून त्यांस सन्मार्गास लावणें हें काम कथापुराणानेंही फारच चांगल्या रीतीनें होतें. पुराणीकांपेक्षां कथेकऱ्यांचा या कामीं अधिक उपयोग होतो. कारण जनांचें रंजन करण्याचीं उपकरणें टाळ, विणा, मृदंग, बाजाची पेटी इत्यादिकांचें कथेंत गायनप्रसंगीं साह्य घेतां येत असल्याकारणानें लोकांचें लक्ष कथेकडे विशेष वेधून त्याचा योग्य परिणाम त्यांच्या मनावर होणें साहजिक आहे.

नाटकासंबंधानें पाहतां, अलीकडे हा एक धंदाच बनून राहिला आहे. व तो हलक्या जातीच्या लोकांच्या हातीं असल्यामुळें त्यापासून वस्तुस्थितीचा उलट परिणाम होत आहे, हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. पूर्वी नाट्यकलेस फारच मान असे आणि वस्तुतः पाहतां, नाटकापासून लोकसमूहास लागणारे वळण वर निर्दिष्ट केलेल्या सर्व साधनांपेक्षां श्रेष्ठ आहे. सृष्टींतील अनेकविध प्रकारांची यथावत माहिती करून देण्यास नाटकासारखें दुसरें सुलभ साधन नाहीं. संसारांत मनुष्यांस अनेक प्रसंग येतात. अर्थात् त्या प्रसंगानुसार त्याच्या होणाऱ्या वर्तणुकीचें हुवेहुब चित्र प्रेक्षक जनांपुढें ठेवणें यालाच नाटक ह्मणतात. एका ग्रथकारानें ह्मटलें आहे कीं, 'नाटक हें प्रत्यक्ष झालेली स्थिति दाखवून केलेला बोध होय.' नाटकाच्या योगें मनरंजन होऊन त्यांत पाहिलेली स्थिति चित्तावर चांगली ठसते व तेणें करून पाहणारास चांगला-वाईट मार्ग शोधतां येतो. नाटक कोणत्याही प्रकारचें असलें तरी त्याचा ठसा पाहणारावर उमठल्यावांचून कदापि राहत नाहीं. अर्थात् अलिकडील नाटकांत बहुतेक बिभत्स प्रकारच भर-

---

१ या जगांत नानातऱ्हेचे लोक आहेत. कोणी स्वार्थासाठीं दुसऱ्यांच्या माना कापितात कोणी परोपकारासाठीं तनमनधन यांचा व्यय करण्यास निरंतर सिद्ध असतात. कित्येक कामूक होऊन झुरत असतात. कित्येकांवर द्रव्याभिलाषाचें मोठें प्राबल्य असतें. कोणाचा रागच फार अनिवार असतो. दुसऱ्यांचा घात, विपत्ती, दुःख यांतच कोणाला संतोष वाटतो. कोणी अभिमानाचीं माहेरघरें असतात. अशा निरनिराळ्या स्वभावांच्या लोकांनीं भरलेली आपली पृथ्वी आहे. जो तो आपापले हेतु सिद्धीस नेण्याच्या कामांत गुंतलेला असतो. यामुळें कित्येकदां विलक्षण प्रसंग घडून येतात. ही बाह्यसृष्टि जशी बहुविध आहे तशीच आमची अंतसृष्टि किंवा स्वभावसृष्टि ही बहुविध आहे. या दोन्ही सृष्टींची यथास्थित माहिती करून घेऊन सांगितल्या-प्रमाणें घडलेल्या एकाद्या प्रसंगाचें कवीनें आपण आड राहून केलेलें जें गद्यात्मक व पद्यात्मक किंवा गद्यपद्यात्मक हुबेहुब वर्णन त्याला नाटक ह्मणावयाचें.

केसरींतील निवडक निबंध भाग १ ला.

लेला असल्यामुळें, तीं पाहण्यानें प्रेक्षक जनसमूहाचीं मनें दुराचारयुक्त व्हावींत यांत नवल तें काय? कालिदास भवभूतिसारखे नाटककार ज्या काळांत झाले त्यावेळीं या कलेची जी भरभराट होती ती आतां त्याच्या शतांशानें सुद्धां दिसत नाहीं. आणि ह्मणून सुशिक्षितांनीं हल्लीं रंगभूमिवर होत असलेल्या नाटकाबद्दल आपला तिरस्कार दाखवावा हें यथायोग्यच आहे. परंतु केवळ तसें केल्यानें हल्लींचें नाटकांचें स्वरूप बदलून त्यापासून अज्ञजनांच्या मनावर होत असलेला वाईट परिणाम थांबेल असें मुळींच नाहीं. तर हल्लींच्या परिस्थितीचें योग्य निरिक्षण करून त्याप्रमाणें सुधारणा होईल व उत्तरोत्तर अधिकाधिक वाढत चाललेल्या बाष्कळपणास अजिवात फांटा मिळेल तर समाजास योग्य प्रकारचें वळण लावण्यास हें एक चांगलें साधन होईल. लोकशिक्षणाचें नाट्यकर्म हें किती जबरदस्त साधन आहे हें अजून आमच्या सुशिक्षित विद्वान मंडळीस कळूं नये ही आश्चर्याची गोष्ट होय. शाळा, वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें, ग्रंथ इत्यादिकांचा देशोन्नतीच्या कामीं प्रसार होणें जसें इष्ट आहे तद्वतच या नाटकांची गोष्ट आहे ह्मणून विद्वान मंडळीनें यांत अवश्य मन घालून व स्वतः मेहनत घेऊन हलकट लोकांच्या हातीं असलेली ही कला आपणाकडे घेऊन त्यापासून देशोन्नत्तीच्या कामीं योग्य उपयोग होईल असा प्रयत्न करावा.

गणपत्युत्सवांत वरील सर्व साधनांचा ( व्याख्यान, नाटक, कथा, पुराण इ. ) समावेश होत असल्यामुळें त्यांचा योग्य उपयोग केल्यास त्यापासून देशोन्नतीच्या कार्यास आमच्या पुढारी मंडळीस पुष्कळच हातभार लावतां येणार आहे.

**३ इतर गोष्टी व उपसंहार**—"हिंदुस्थानच्या परिस्थितीचें सूक्ष्मदृष्टया निरीक्षण केलें असतां या देशाची आज किती शोचनीय स्थिति झाली आहे हें सहज समजून येणार आहे. इतकी शोचनीय स्थिति आज क्वचितच जगावरील एकाद्या देशाची असेल. पावसानें जरा डोळे वटारले कीं, हिंदुस्थानांतील प्रत्येक प्राणिमात्रास डोळे पांढरे

करण्याची पाळी येते. एक वर्ष पाऊस पडला नाहीं कीं, चोहोंकडे एकसारखा धुमाकुळ माजून राहतो. इतकी हिंदुस्थानाची हीनतर स्थिति झाली आहे. गेल्या शतकांत ह्मणजे सन १८०० पासून तों १९०० पर्यंत या दुर्दैवी देशांत एकंदर १९ दुष्काळ पडले त्यावरून हिंदुस्थानची उत्तरोत्तर वाईट स्थिति होत चालली आहे, असें प्रत्येक विचारी मनुष्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. याचीं कारणें अनेक असतील! परंतु आज आपण दारिद्र्यानें खास पीडलों आहोंत यांत संशय नाहीं. अशा वेळीं गणपत्युत्सवासारखे चैनबाजीचे प्रकार करून पाण्यासारखा पैसा उधळणें हें देशहिताचा टेंवा मिरविणाऱ्या पुढारी लोकांस बिलकूल शोभत नाहीं." असा गणपत्युत्सवाच्या द्वेष्ट्यांकडून आक्षेप घेण्यांत येतो. चांगली गोष्ट सर्वत्र चांगलीच भासते तद्वत वरील आक्षेपांतील ह्मणणें खरें असल्यास त्याचा सर्वत्रांकडून स्वीकार झालाच पाहिजे. देशास दारिद्र्य आलें असून अशा वेळीं पाण्यासारखा पैसा अनाठायीं खर्च करणें अतिशय वाईट आहे हें कोणीही अमान्य करणार नाहीं. परंतु गणपत्युत्सवांत खरोखरींच तसा प्रकार होत आहे कीं काय याचा प्रथमतः योग्य तपास केला पाहिजे. गणपत्युत्सवाला "चैनबाजीचा प्रकार" ह्मणून जें विशेषण देण्यांत आलें आहे त्यांत बिलकुल सत्य नाहीं. सार्वजनिक जागेच्या ठिकाणीं गणपतीची स्थापना करून त्यापुढें आरास केली व राजा रविवर्मानें काढलेलीं सुंदर चित्रें तेथें मांडलीं तर त्यास चैनबाजीचा प्रकार ह्मणावयाचा कीं काय? त्याचप्रमाणें मेळ्यांच्या पोषाखाकरितां खर्चलेला पैसा व्यर्थ खर्च केला असें ह्मणतां येईल काय? स्वशक्तीचा अतिक्रम न करतां अशा कामीं पैसे खर्च करणें यास उधळपट्टी ह्मणावयाची असेल तर खुशाल ह्मणावें. आतां एकाद्या ठिकाणीं फाजील खर्च होत असेल व तो न होऊं देण्याविषयीं खबरदारी घेणें अत्यावश्यक आहे. पण तेवढ्यावरून सर्व ठिकाणीं होणाऱ्या उत्सवास सारखा दोष देणें वाजवी होणार नाहीं. कांहीं ठिकाणीं उत्सवांत नायकिणींचीं गाणीं होत असतात. हा प्रकार गर्हणीय आहे. याकडे मेळ्यांच्या पुढाऱ्यांनीं अवश्य लक्ष दिलें पाहिजे. दु-

सन्या एक अति महत्वाच्या गोष्टीकडे गणपत्युत्सवाच्या पुढाऱ्यांनीं लक्ष पुरविणें अत्यावश्यक आहे. ती हीच कीं, गणपत्युत्सवास लागणारें हरएक प्रकारचें सामान विलायती व परदेशीय न वापरतां अवश्य आपल्या देशांतील वापरावें ह्मणजे या कामीं गणपत्युत्सवांत खर्च होणाऱ्या द्रव्यापासून देशाचें नुकसान न होतां उलट आपल्या देशांतील कलाकौशल्यास, व्यापारास उत्तेजन दिल्यासारखें होणार आहे. आपल्या देशांतील परंपरागत चालत आलेले करागिरीचे व इतर धंदे अगदीं बसत चालले आहेत. इतर देशांत त्यांच्या धंद्याची जशी वृद्धि होत आहे, त्यांच्या कारागिरीचे कर्तृत्वाचा जसा उत्कर्ष होत आहे तद्वत आपल्या देशांत होत नाहीं. आणि तेणें करून व्यापारापासून संपत्ति वाढविण्याचा लाभ आपणास न होतां बाह्य देशांतील लोकांस मिळतो. तो वरील उपायानें अंशतः तरी कमी होणार आहे.

आणखी एक बारीकशी सूचना कराविशी वाटते ती हीच कीं, प्रत्येक सार्वजनिक गणपतीच्या प्रवेशद्वाराजवळ गौरक्षणाच्या धर्तीवर एक पेटी ठेवावी व त्यांत मंगलमूर्तीच्या भेटीस येणाऱ्या इसमांनीं स्वशक्त्यनुसार पै पासून रुपया पर्यंत पैसे टाकावेत व त्याचा विनियोग दुष्काळपीडित लोकांच्या दुःख निवारणार्थ करण्यांत यावा. गतसालीं पुण्यांत अशा निराश्रित लोकास भोजन देण्यांत आलें होतें ही समाधानाची गोष्ट होय. अशाच प्रकारें या उत्सवाचें स्वरूप आपल्या देशाच्या भरभराटीस कारणीभूत होईल असा विद्वज्जनांनीं प्रयत्न केल्यास होणार आहे.

सामान्य जनसमाजाला भक्तिमार्गाकडे वळविण्यास गणपत्युत्सवासारखा सुलभ व उत्तम दुसरा मार्गच नाहीं ह्मटलें तरी चालेल. पंढरीची वारी किंवा पुण्यांतील ज्ञानोबाची पालखी ज्यांना पहाण्याचा प्रसंग असेल त्यांना अशा उत्सवानें भक्तिमार्गाकडे मन कसें लवकर वळतें याची कल्पना चांगली करतां येणार आहे. गीतेंत ज्ञानमार्गापेक्षां भक्तिमार्गालाच श्रेष्ठत्व दिलें आहे. रामायण, भारत इ० ग्रंथांत

सुद्धां जेथें तेथें भक्ति तत्वच वर्णिलें आहे. यज्ञयागादि कर्में करणारा, योगाभ्यास करणारा किंवा ज्ञानी या सर्वांपेक्षां भक्तिमान मनुष्य मला अति प्रिय आहे असें भगवंतांनीं गीतेंत ह्मटलें आहे. सामान्य जनसमूहास ज्ञानमार्गानें जाण्याचें सामर्थ्य नाहीं. अर्थात् भक्तिमार्गच त्यांना सुलभ व श्रेयस्कर आहे. '**ठेवा जाणीव गुंडून। येथें भावचि प्रमाण ॥**' असें तुकारामांनीं ह्मटलें आहे. भक्तीस कोणत्याही प्रकारची अडचण येत नाहीं. वाटेल त्यानें वाटेल तेव्हां व वाटेल तेथें भक्ति करावी. तशी मुभा इतर कोणत्याही साधनांत नाहीं. योगाभ्यास करावयाचा ह्मटला ह्मणजे त्याला प्रथमतः सर्व प्रकारची शुद्धता करावी लागते. देश, काल, स्थल इ० सर्व पहावें लागतें. इंद्रियनिग्रह करावा लागतो इ० अनेक खटपटी कराव्या लागतात. यज्ञयागादि क्रियांत द्रव्याची चांगली अनुकूलता लागते शिवाय कर्म सर्व प्रकारें सारखें झालें पाहिजे. त्यांत किंचित् चूक झाली कीं, सर्व कर्म वाया गेलें. अशा प्रकारचा त्रास भक्तिमार्गांत नाहीं. अर्थात् भक्तिमार्गासारखा दुसरा सुलभ उपायच नाहीं. व यांत अति श्रेष्ठ वर्गापासून तो अंत्यजापर्यंत सर्वत्रांस सारखें मिसळतां येतें. सारांश भक्तिमार्गांत जितक्या सवलती आहेत तितक्या इतर कोणत्याही मार्गांत नाहींत. आणि या दृष्टीनें पाहिलें असतां भक्तिमार्गाचा अवलंब करण्यास गणपत्युत्सवासारखे प्रसंग किती महत्वाचे व अवश्यक आहेत हें सांगणें नलगे.

**ऐक्यः**—गणपत्युत्सवाच्या निमित्तानें आपणांत ऐक्याची वृद्धि होण्याचाही बराच संभव आहे. व कांहीं अंशीं त्यास यशही येत चाललें आहे; ही समाधान मानण्यासारखी गोष्ट होय. ऐक्य वृद्धीनें किती लाभ होणार आहे हें नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. सर्वांस एकीची महति कळलेली आहे. परंतु त्याकडे लक्ष पोंचवून योग्य खटपट करण्याचें श्रम मात्र लोकांकडून होत नाहींत. आणि ह्मणून बहुतेक उद्योगधंद्यांत आपलें पाऊल पुढें पडत नाहीं. "जातिभेद मोडल्यावांचून ऐक्य होणेंच अशक्य अर्थात् ऐक्याशिवाय राष्ट्राचें कल्याण होणें किंवा सुधारणा होणें मुळींच संभवनीय

नाहीं." असें ह्मणण्याचें धाडस करणारी आज समाजांत वरीच मंडळी आहे. परंतु तसें समजणें हा त्यांचा भ्रम आहे. कारण पूर्वापार चालत आलेल्या जाति बुद्धिपुरःसर कोणी केल्या असें नाहीं. हें इतिहासज्ञांस सांगणें नलगे. व पूर्वी या देशाची भरभराट होती तेव्हां हें जातिप्रकरण मोडलें होतें असेंही नाहीं. अर्थात् जातिभेदामुळें ऐक्य होणें अशक्य आहे हा मुद्दा या दृष्टीनें विशेष महत्वाचा धरतां येत नाहीं. पृथ्वीवरील कोणत्याही देशाकडे पाहिलें तरी हा जातिभेद निराळ्या नांवानें जेथें तेथें आढळांत येतो. व त्यापासून त्या त्या देशाचें नुकसान झालें आहे असें कदापि कोणास ह्मणतां येणार नाहीं. जातिभेद मोडल्यानें ऐक्यवृद्धि होईल असें ह्मणणारांनीं एकाच जातींतील लोकांत किती ऐक्य वागत आहे याचा विचार करावा. ह्मणजे त्यांचें ह्मणणें किती पुळपुळीत आहे हें त्यांस कळून येईल. ऐक्यवृद्धीला बाधक जातिभेद नसून केवळ मतभेदच आहे. मतविरोधानेंच आज देशोन्नतीच्या कार्यावर कित्येक आघात झाले आहेत. ह्मणून मतभेद न वाढेल असा प्रयत्न केला ह्मणजे वहुतेक कार्य होणार आहे.

"पिंडे पिंडे मतिर्भिन्नः" या ह्मणीप्रमाणें प्रत्येकांत त्याच्या बुद्धिमत्तेप्रमाणें, ज्ञानाप्रमाणें, व अनुभवाप्रमाणें मताभिन्नत्व असणार व तें दोषार्ह आहे असें ह्मणतां येणार नाहीं. परंतु एकाद्या सार्वजनिक कृत्यांत उगाच हट्टास पेटून अभिमानानें "मी ह्मणतों असेंच झालें पाहिजे. नाहीं तर तुमचें आमचें पटावयाचें नाहीं." असा व्यर्थ आग्रह धरून दुही माजविणें याला शहाणपणा ह्मणत नाहीं. आणि याच प्रकारचें प्रावल्य या देशांत विशेष असल्यामुळें ऐक्यापासून होणाऱ्या हिताचा लाभ या देशास मिळत नाहीं. घरगुती वैमनस्यावरून सार्वजनिक कृत्यांत सुद्धां व्यक्तिमात्राचा द्वेष करणें हें वाजवी नाहीं. "परेषामुपकारार्थं यज्जीवती सजीवति" धर्मबुद्धि जागृत ठेऊन दुसऱ्यावर उपकार करण्यांत आपला देह झिझविणें हेंच प्राण्याचें खरें जीवन होय. हें तत्व प्रत्येक प्राणीमात्राच्या मनांत चांगलें बिंवल्यावांचून वरील मतभेद नष्ट होऊन ऐक्य वृद्धि होणें अशक्य आहे.

सारांश गणपत्युत्सवाच्या चालक मंडळींनीं वर सांगितलेल्या सर्व गोष्टी नीट लक्षांत घेऊन त्यांत योग्य परिश्रम करून सुधारणा करण्याचें मनांत आणलें तर हल्लींच्या गणपत्युत्सवानें लोकांत धर्मजागृति होऊन त्यामुळें देशोन्नतीच्या कार्यांस पुष्कळ साह्य होणार आहे. देशांतील कलाकौशल्यास अंशतः तरी उत्तेजन मिळेल. आपापसांतील दुही मोडून ऐक्यभाव वाढविण्यास पुष्कळ अंशीं मदत होईल. संगीतशास्त्र, वक्तृत्वकला, नाट्यकला, इ० तही चांगली सुधारणा होऊन त्यापासून देशाचें पुष्कळ हित होईल. खऱ्या कवींस उत्तेजन मिळेल. इत्यादि अनेक गोष्टी एका गणपत्युत्सवानें होणार आहेत तेव्हां या दृष्टीनें हा उत्सव किती महत्वाचा आहे हें प्रत्येकानें पाहिलें पाहिजे.

शेवटीं या उत्सवाचें अध्वर्यूंस हीच विनंति करावयाची कीं, त्यांनीं हें आरंभिलेलें देशहिताचें अति महत्वाचें कार्य वर दर्शित केलेल्या सूचनांकडे लक्ष देऊन नेटानें प्रतिवर्षी चालवावें. विरुद्ध पक्षानें ( उत्सवाच्या द्वेष्टयांनीं ) आपली कितीही अवहेलना केली–द्वेषबुद्धीनें उत्सवासंबंधीं कितीही वाईट प्रकारचा गैरसमज उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला तरी त्याकडे–राष्ट्रहित बुद्धि मनांत वागवून–दुर्लक्ष केलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर प्रतिपक्षाचा दुरभिमान, लपंडाव, अज्ञान किंवा गैरसमज हीं आपणांस दिसून आलीं तरी त्याबद्दल प्रतिपक्षाची कोणत्याहि प्रकारें अवहेलना न करितां त्यांचें ह्मणणें प्रमाणसिद्ध नाहीं किंवा तर्कशुद्ध नाहीं असें मित्रभावानें स्पष्टपणें पण शांतमनानें उहापोह करून त्यांच्या प्रत्ययास आणावें. अशा सत्यप्रीतीनें व राष्ट्रहितैकबुद्धीनें प्रयत्न केल्यावर कालांतरानें तरी इष्टकार्य सिद्धी होईल यांत बिलकुल संशय नाहीं.

**समाप्त.**

॥ ॐ ॥

जगदीशाय नमः

# मुलांचा स्वदेशाभिमान.

लेखक—वामन रामचंद्र जोशी बी. ए.
मुंबई.

श्रीशिवाजी राज्याभिषेक शक २३१,
श्रीशालिवाहन शक १८२७. } ज्येष्ठमास.

आवृत्ती पहिली.

किंमत अर्धा आणा.

मुंबई "जगदीश्वर" छा. छा.

ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

ॐ जगदीशायनमः

# समर्पण पत्रिका.

माझे तीर्थरूप रा.रा. **रामचंद्र प्रभाकर जोशी** व त्यांचे वडील बंधू माझे तीर्थस्वरूप रा.रा. **गोविंद प्रभाकर जोशी** यांनीं, लहानपणींच पिता देवाधीन होऊन अत्यन्त आपत्तीचे दिवस असतांहि नाना प्रकारचे हाल सोसून **रत्नागिरीस** व **पुण्यास** विद्या केली. पुढें तीर्थस्वरूप हे **धारवाडास** राहून **सन्मार्गदर्शक** नावाचा छापखाना काढून छापखान्याचे नामार्थास योग्य अशीं पुस्तकें छापून ज्ञानप्रसार करीत असतां वयाचे बत्तिसावे वर्षीं अकालीं देवाधीन झाले. त्याचप्रमाणें तीर्थरूपांनीं बेळगांवास **बेळगांव समाचार** पत्राबरोबर बेळगांवसमाचार छापखाना काढून चांगलीं चांगलीं पुस्तकें पुष्कळ छापलीं व पुढें प्रकृतीच्या नाइलाजानें पत्र व छापखाना यांतील आपले हक्क दुसरे सहकारी यांस विकून ते कोकणांत घरीं **श्री क्षेत्र महाकालीचें आडीवरें** येथें येऊन राहिले व बरींच वर्षें शांततेंत काढून देवाधीन झाले. तीर्थस्वरूप व तीर्थरूप यांचें भ्रातृप्रेम अनुपम होतें, व त्यांचें एकत्र स्मारक कांहीं तरी माझे हातून व्हावें अशी त्यांनीं अंतकालापूर्वी आपली इच्छा मला कळविली होती. या नंतर विचार करितां त्या दोघांचीहि तरुण पिढीला चांगलें राष्ट्रीय शिक्षण मिळावें अशी उत्कट इच्छा होती, व माझ्या विद्येला कारण या उभय बंधूंनीं कष्टानें मिळविलेली संपत्ती होती. हें जाणून हें पुस्तक मी माझे तीर्थस्वरूप कै० **गोविंद प्रभाकर जोशी** व तीर्थरूप कै० **रामचंद्र प्रभाकर जोशी** यांस त्यांचें एकत्र **स्मारक** ह्मणून अत्यन्त नम्र भावानें समर्पण करीत आहे. अन्य रीतीनें स्मारक करण्याची अनुकूलता मला दिसत नसल्यामुळें व हा मार्ग मला विशेष इष्ट व विशेष पवित्र वाटल्यामुळें हें स्मारक या उभय आत्म्यांनीं मान्य करून घ्यावें अशी मी जगत्कर्त्यापाशीं अनन्यशरणागत भावानें प्रार्थना करितों.

मुंबई, गिरगांव आंग्र्याची वाडी. श्रीशालीवाहन शके १८२७ ज्येष्ठ.

**वामन रामचंद्र जोशी.**

ॐ

जगदीशायनमः

# मुलांचा स्वदेशाभिमान.

लेखकः–वामन रामचंद्र जोशी बी. ए.

मुंबई.

**ग्रंथारंभीं जगदीश प्रार्थनाः**–हे दयाळू जगच्चालका! आह्मांला सर्वदा सर्व स्थितींत अंतरामध्यें व कृतीमध्यें पूर्ण निष्पाप ठेवा; आह्मांकडून सर्वदा सर्वस्थितींत आपली खरीभक्ति चांगल्या प्रकारें करून घ्या; आह्मांकडून सर्वदा सर्वस्थितींत सत्यमार्गांनीं स्वराष्ट्राची वृद्धि करवा; आह्मांला सर्वदा सर्वस्थितींत अखंड वाढणारें असें निर्मल यश द्या; आह्मांला सर्वदा सर्वस्थितींत शुद्ध, रम्य, इष्ट सुखांचे अनुभव द्या.

## प्रकरण १ लें.

१ मुलांनों, ज्या देशांत तुह्मीं जन्मलां आहांत, वाढत आहांत, व पुढें नांदणार आहांत, त्यांतील सर्व देशबांधवांच्या एकंदर सुखाच्या मानानें तुमचें सुख असणार आहे, व त्यांच्या एकंदर दुःखाच्या मानानें तुमचे दुःख असणार आहे; ह्मणून स्वदेशहिताच्या वृद्धीसाठीं आयुष्यांत होईल तितकें झटण्याचा एव्हांपासून दृढ निश्चय धरा.

२ मुलांनों, जर तुह्मांला स्वदेशहिताच्या वृद्धीसाठीं झटून आपलें कर्तव्य करावयाचें आहे, तर तुह्मांला आपल्या अंगीं कर्तृत्वाचे उत्तम गुण आणिले पाहिजेत. असें गुण अंगीं आणण्यास मनुष्याच्या एकंदर आयुष्यांत हें तुमचें वयच अतिउत्तम काल होय.

३ मुलांनों, तुमच्या सध्याच्या वयांत तुह्मांवर कुटुंबाचा भार नसतो, या वयांत उपयुक्त ज्ञानाच्या ज्या प्रकारांत तुमची बुद्धि उत्तम चालेल, ते ज्ञान तुह्मी तत्परतेनें मिळवा, तसेंच निर्वाहाच्या न्यायशुद्ध धंद्यांपैकीं जो तुह्मांला शक्य दिसेल व रुचेल त्यांत निपुणता संपादन करा.

जर तुह्मी ज्ञानसंपन्न झालां नाहीं व चरितार्थ करण्याचें सामर्थ्य तुह्माला आलें नाहीं तर तुह्मी स्वदेशसेवा कशी करणार ?

४ मुलांनों, जीं मुले लहानपणीं वेळाचा दुरुपयोग करितात त्यांकडून पुढें स्वदेशसेवा घडत नाहीं, स्वतःचें कल्याण साधलें जात नाहीं, त्यांना अपकीर्ती मध्यें व हालअपेष्टांमध्यें जन्म काढावा लागतो.

५ मुलांनों, ज्यांनीं आपल्या आयुष्यांत आपलें आणि देशाचें उत्तम कल्याण केलें असे जें पूर्वीं होऊन गेलेले थोर लोक अशांच्या चरित्रांपैकीं एकाद्या चरित्राचीं कांहीं पानें तरी तुह्मीं दर दिवस वाचा. तेणेंकरून अन्नानें जसें तुमचें शरीर वाढत आहे त्याप्रमाणें तुमच्या मनाला थोरपण येत जाईल, मनाला सामर्थ्य येत जाईल आणि आयुष्यामध्यें आपल्याला काय करावयाचें आहे हें तुम्हाला हळु हळु कळूं लागेल.

पहिला अनुवाक समाप्त.

---

१ मुलांनों, आपल्या देशांतील उद्योग धंद्यांची चलती व्हावी, या साठीं कपडे इत्यादि जे जिन्नस तुह्मीं वडिलांपाशीं मागाल ते जर स्व- चांगलें राष्ट्रीअसले तर स्वदेशीच आणून देण्याकरितां वडिलांपाशीं आ- ग्रेला कारण

हें पुस्तक,ळांनों, ज्या पुस्तकांत तुमच्या देशासंबंधानें, अथवा धर्मासंबं- के०राग्अथवा इतिहासासंबंधानें अज्ञानीलोकांनीं खोटा मजकूर लिहिला असेल अशीं पुस्तकें वाचल्यापासून तुमच्या आयुष्याचें नुकसान होणार आहे, ह्मणून पुस्तकें वाचण्यापूर्वीं तीं जाणत्या भल्या माणसांना दाखवून त्यांनीं पसंत केलेलीं अशींच वाचीत जा.

२ मुलांनों, ज्या प्रकारची आपल्याला संगति असते, त्या प्रकारच्या संवयी आपल्याला अनुकरणानें लागत असतात. व त्या प्रकारचीं आपलीं संभाषणें वगैरे चालून आपले विचार बनत असतात. ह्मणून तुम्हीं चांगला विचार करून व तुमचें हित पाहणाऱ्या वडील माणसांचे संमतीनें जे शुद्धशील व स्वदेशभक्त असतील अशांचीच संगती धरा.

४ मुलांनों, ज्यांचें शील वाईट, व ज्यांच्यांत देशभक्ति वसत नाहीं त्यांवर तुम्ही प्रेम करूं नका. प्रेम ही मोठी देणगी आहे. ती दुसऱ्यांना देणें न देणें आपले हातची गोष्ट आहे. वाईट माणसांवर प्रेम न करणें आणि अशा रीतीनें त्यांचे वाईटपणाविषयीं आपली नापसंती निश्चयानें दाखविणें हें आपलें स्वतः संबंधीं व देशासंबंधी कर्तव्य होय.

५ मुलांनों, जर तुमचीं वडील माणसें तुम्हाला वाईट मार्गाची गोष्ट सांगतील अथवा देशहित भंगेल असें कांहीं करण्यास सांगतील तर त्यांची अवज्ञा करणें तुमचा दोष नाहीं. अशा संकटांत तुम्ही जे खरोखरी सुशील व देशभक्त अशा दुसऱ्या कोणी अनुभवी देशभक्तांच्या सल्यानें चालावें.

दुसरा अनुवाक समाप्त.

---

१ मुलांनों, स्वदेशसेवेला अवश्य ती योग्यता अंगीं आणण्याचे कामीं तुम्हांकडून चांगले श्रम होण्यास आत्म्याच्या प्रसन्नतेची अवश्यकता आहे. जे प्रत्यहीं शुद्धचित्तपूर्वक आपल्या स्वाभाविक शब्दांमध्यें जगत्कर्त्याला आपलें सुखदुःख सांगतात, आणि निर्भयता, कल्याण व यश यांसाठीं त्याची प्रार्थना करितात त्यांना आत्म्याची प्रसन्नता प्राप्त होत असते.

२ मुलांनों, स्वदेशसेवेला अवश्य ती योग्यता अंगीं आणण्याचे कामीं तुह्मांकडून चांगले श्रम होण्यास मनाची प्रसन्नता अवश्य आहे. ही प्रसन्नता मनाचे संकल्प सत्याचे आणि न्यायाचे ठेविल्यानें प्राप्त होते. ज्यापासून प्राणीमात्रांचें अत्यन्तहित साधतें तें सत्य होय. ज्यांत दुसऱ्याचा अपराध घडत नाहीं व दुसऱ्याचे योग्यतेप्रमाणें आपण त्यांना वागवितों तें न्यायाचें वर्तन होय.

३ मुलांनों, स्वदेशसेवेला अवश्य ती योग्यता अंगीं आणण्याचे कामीं तुम्हांकडून चांगलें प्रकारें श्रम होण्यास शरीर प्रसन्नता अवश्य आहे. ती स्वच्छता, आरोग्य व सामर्थ्य यांनीं मिळते. ह्मणून तुम्हीं शरीर व वस्त्रें चांगलीं स्वच्छ राखा. आरोग्यासाठीं शुद्ध, नेमस्त व नियमित आहार

करा, नियमित श्रम करा, नियमित झोंप घ्या, नियमित विश्रांति घ्या, व सामर्थ्यासाठीं निरनिराळ्या प्रकारचे चांगले व्यायाम चांगल्या व्यायामशिक्षकांपासून शिका.

४ मुलांनों, स्वदेशसेवेला अवश्य ती योग्यता अंगीं आणण्याचे कामीं तुम्हांकडून चांगले प्रकारें श्रम होण्यास नीति शुद्ध मार्गांनीं व नेमस्त प्रमाणांत विश्रांति आणि खेळ अवश्य आहेत. परंतु त्यामध्यें अनीति अथवा अतिरेक होऊं न देण्यासाठीं तुह्मी जपलें पाहिजे व त्यासाठीं तुह्मीं तुमचें हित चांगल्या प्रकारें पाहणाऱ्या अनुभवी माणसांच्या सल्ल्यानें चाललें पाहिजे. असें न केल्यास तुमचें व देशाचें नुकसान आहे.

५ मुलांनों, तुह्मीं आपला वेळ जगत्कर्त्याची प्रार्थना, ज्ञानसंपादन, वडिलांची सेवा, देहाची काळजी, विश्रांति, मित्रांसह संभाषण, स्वस्थपणें विचार, खेळ व झोंप यांत तुमचे उत्तम हित पाहणाऱ्या अनुभवी वडील माणसांचे सल्यानें विभागून त्याप्रमाणें नेहमी वागत असा ह्मणजे स्वतःचें आणि स्वदेशाचें कल्याण वाढविण्यास अवश्य अशी योग्यता तुम्हांमध्यें हळु हळु येईल.

तिसरा अनुवाक समाप्त.

## प्रकरण १ लें समाप्त.

---

ॐ

### जगदीशायनमः

# प्रकरण २ रें,

मुलांनों व तरुण जन हो,–तुह्मीच पुढें थोर होणार, तुमच्याच हातून राष्ट्राचें अभाग्य जावें व भाग्य वाढावें ह्मणून प्रयत्न व्हावयाचे आहेत ज्या मगदुराचें राष्ट्रांत तेज असतें त्या मगदुराचे त्याचे उद्योग असतात व त्या मानानें त्याचें भाग्य असतें. राष्ट्र ह्मणजे ज्यांच्या आकांक्षा समान

आहेत अशा लोकांचा संघ होय. तेव्हां कोणते गुण लोकांत असले ह्मणजे राष्ट्राचें भाग्य चांगलें असतें व अखंड वाढत असतें हें तुह्मांला सांगतों.

**१ जगकर्त्यालाच अनन्य भावानें शरणागत होऊन त्याची प्रार्थना:**—खरा देव ह्मणजे जो अनंत जगतांचा कर्ता तो मात्र एक भक्त मनोरथ पुरविण्यास सर्व समर्थ आहे, त्याहुन अन्य सर्व मर्त्यरूपें पामर आहेत हें जाणून त्याची आणि त्याची मात्र प्रत्यहीं वरचेवर नम्र भावानें स्वत:च्या शब्दांनीं प्रेम पुर:सर प्रार्थना करणें.

**२ राष्ट्र विस्तार हेंच आपलें स्वरूप, राष्ट्र भाग्य हेंच आपलें भाग्य:**—राष्ट्र विस्तार हेंच आपलें खरें स्वरूप समजणें, राष्ट्र भाग्य असतें त्या मानानें आपलें भाग्य असतें ह्मणून राष्ट्रभाग्य हेंच आपलें भाग्य मानणें, राष्ट्राचें सुख तें आपलें सुख, राष्ट्राचें दु:ख तें आपलें दु:ख असा मनाचा निर्धार करणें.

**३ जन ही आपलीच दिव्य विभूति:**—आपल्या अंतरांत जो परमेश्वर आहे त्याचीच जन ही सहस्रावधि, लक्षावधि, कोट्यावधि मुखांची विभूति मानून जनसंघशक्ति वनविणें; जनामध्यें क्षुद्रमत्सर व मतभेद असतील ते आपल्या या विराट शरीरांतील रोग समजून मोडून काढणें; शरीराचे अवयव एकमेकांच्या उपयोगास पडतात तसे राष्ट्रीय अवयव ह्मणजे त्यांतील वर्ग, संस्था, जमाति व व्यक्ति यांच्यांत साहाय्य उत्पन्न करणें, व राष्ट्र एकविचारानें भरून आणि राष्ट्रीयभाग्य वाढविणारीं थोरकार्यें करून कृतकृत्य होणें.

**४ सुशीलता हेंच सर्वस्व व हेंच पूज्यत्वाचें लक्षण:**—सौख्य संपादण्याच्या कोणत्याहि मानसिक अथवा इंद्रियांसंबंधी, अथवा शारीरिक व्यापारांमध्यें दुसऱ्यांचा अपराध न करणें हें जगत्कर्त्याला प्रिय आहे हें जाणुन सुशीलता हेंच आपलें सर्वस्व मानणें व सुशीलता ज्याच्यांत नाहीं तो इतर कोणत्याहि लक्षणानीं संपन्न असला तथापि धि:कारास मात्र त्याला पात्र समजणें.

**५ राष्ट्रकार्यीं दीर्घ प्रयत्न हाच मोठेपणा:**—पुढच्या शेंकडों

वर्षासंबंधानें मोठ्या पल्याचे राष्ट्रीय हेतु मनांत धरून ते अमलांत आणण्यासाठीं दीर्घप्रयत्नांची पराकाष्ठा हेंच मोठेपण समजणें.

**६ ईश्वराचा न्यायीपणा, आत्म्याचें अमरत्व, उद्योग व सत्यनिष्ठा ही आपली उत्तम साह्यसामग्री समजणें:—** ईश्वर योग्यतेप्रमाणें फल अवश्य देत असतो; योग्यता करून घेणारा जीव अमर आहे व एका देहांत अपुरे राहिलेले हेतु लागलेच पुढच्या देहांत त्याला पुरे करून घेतां येतात परंतु, एकनिश्चयाचा अविछिन्न उद्योग चालू ठेविला पाहिजे व हे उद्योग सत्याच्या सूत्रानें चालविले पाहिजेत, कारण असत्याला ईश्वर अपेश देतो. या गोष्टी नेहमीं लक्षांत ठेवणें व त्यांसच आपली उत्तम साह्यसामग्री समजणें.

**७ आळशी लोक राष्ट्राचे शत्रु:—**ताकद असून जे श्रम न करितां जगूं पहातात ते उद्योगी लोकांना जिवें मारतात. असलीं माणसें राष्ट्रांत उत्पन्न नच होतील असेच राष्ट्रीय विचार व आचार ठेवणें.

**८ स्त्रीपुरुषांचा स्वदेशाभिमान:—**स्त्रीपुरुषांनीं नांदणें व मुलें वाढविणें या गोष्टी पशुपक्षीही करितात. मानवी स्त्रीपुरुषांत त्यांच्याहून जास्त लक्षण ह्मणजे स्वदेशाभिमान पाहिजे; स्वदेशाभिमान ह्मणजे स्वदेशांत जें चांगलें वाइट असेल तें सर्वच चांगलें असा अयोग्य अभिमान नव्हे तर जें चांगलें असेल तें आपण अधिक चांगलें करूं व वाइट असेल तें दीर्घ प्रयत्नानें चांगलें करूं असा शुद्ध अभिमान धरणें.

**९ स्वदेशाभिमानाचें स्त्रीपुरुषांस शिक्षण:—**राष्ट्रीय भाग्य स्वदेशाभिमानप्रेरित पुरुषांच्या दीर्घोद्योगांवर अवलंबून असतें. स्वदेशाभिमान प्रेरित अशा पत्नीचें प्रेम देशकार्यें करण्यामध्यें पुरुषाला श्रेष्ठ बळ देतें व पतीच्या उच्च कीर्तीनें स्त्रीला श्रेष्ठत्व येत असतें हें जाणून आईबापांनीं मुलींना व मुलांना स्वदेशाभिमानाचें उत्तम शिक्षण देणें.

**१० राष्ट्रीय संपत्तीची वाढ करण्याकडे लक्ष्य.—**राष्ट्रीय संपत्तीची वाढ झाल्यानें राष्ट्रीय सामर्थ्य, राष्ट्रीय भाग्य व राष्ट्रीय सौख्य हीं वाढतात हें जाणून स्वदेशीमाल होत असेल तो कांहीं महाग पडला तरी घेण्याचा लोकांनीं निश्चय ठेवणें कारण असा निश्चय असला ह्मणजे धंद्याची चलती होऊन तोच माल स्वस्त मिळूं लागतो. ज्या वस्तु स्वदे-

शांत होत नसतील व होण्यासारख्या असतील त्या तयार करण्याकडे व्यापारी व कारागीर लोकांनीं लक्ष्य ठेवणें. देशाची संपत्ती व अन्न वाढवून निर्वाह करितां येईल असा निदान एक सचोटी धंदा आईबापांनीं मुलांना शिकविणें. जीं मुलें सुशील व स्वदेशाभिमानयुक्त नसतील त्यांना शिक्षा ह्मणून आईबापांनीं आपली संपत्ती त्यांना न देणें.

११ **सृष्टिशास्त्रांचें ज्ञानः**—कोणत्या सृष्टिनियमांची कशी योजना केली असतां मनुष्यांचें सुख वाढविणारीं कोणतीं कार्यें करितां येतात या ज्ञानासच विभागपरत्वें निरनिराळ्या विद्यांची शास्त्रांचीं व कलांची नांवें आहेत. अशा ज्ञानाची संपन्नता राष्ट्रीय भाग्याला अवश्य आहे ह्मणून त्याचा फैलाव करीत असणें.

१२ **इतिहासाचा अनुभवः**—आपल्या व इतर देशांच्या खऱ्या खऱ्या इतिहासाचे ज्ञानापासून नानाप्रकारच्या संकटांतून पार कसें पडावें हें पूर्वींच्या काळच्या माणसांच्या अनुभवानें कळतें ह्मणून अशा खऱ्या इतिहासज्ञानाचा फैलाव करीत असणें.

१३ **शुद्ध व समर्थ मानवी तेजः**—सत्य मार्गांनीं थोर उद्योग होणें राष्ट्रीय भाग्याला अवश्य आहे; व असे उद्योग होण्यास मनुष्यांतील तेज शुद्ध व समर्थ असणें अवश्य आहे. हे गुण मानवी तेजांत असण्यास अत्यन्त अवश्य गोष्ट ह्मणजे प्रत्येक स्त्रीनें आपल्या पतीखेरीज इतर सर्व पुरुषांची रूपें त्यांच्या वयाचे मानानें पिता बंधु पुत्र यांचे समान मानून चाललें पाहिजे व प्रत्येक पुरुषानें आपले पत्नीखेरीज इतर सर्व स्त्रियांची रूपें त्यांच्या वयाचे मानानें माता, वहिणी, कन्या यांचे समान मानून चालले पाहिजे. या गुणांनीं आईबापें संपन्न असलीं तर सद्गुणी व भाग्यशाली प्रजा राष्ट्रांत जन्मत असते. या बाबतींत स्त्री पुरुषांनीं आपली शुद्धता जशी शरीरानें तशी दृष्टीनें व मनानेंहि ठेविली पाहिजे. कारण मनानें व दृष्टीनें पापकर्में झालीं तरि मानवी तेजाची शुद्धता व त्याचें सामर्थ्य यांचा नाश होत असतो. विशेषेंकरून स्त्रीपुरुषनीतीची जबाबदारी पुरुषांवर आहे. कारण पुरुषवर्ग जास्त सुजाण व जास्त समर्थ असतो. पुरुष निश्चयानें चांगले राहिले ह्मणजे स्त्रीवर्गाचा चांगुलपणा आपोआप राहत असतो.

**१४ विवाहसंबंध अविचारांचे होतां कामा नये**:--नवरा व बायको परस्परांचे ठिकाणीं संतुष्ट असतील तरच नीती व शांति गृहांत असतात ह्मणून अशी संतुष्टता जोडण्यांत असेल अशाच प्रकारचे ह्मणजे परस्परांस वयानें व गुणांनीं जोड शोभणाऱ्या अशा स्त्रीपुरुषांत विवाह झाले पाहिजेत केवळ पुरुशाला स्त्री व स्त्रीला पुरुष यांची गांठ घालून देणें असले विवाह होतां कामा नये. अयोग्य वयाच्या व कुलक्षणी पुरुषाशीं स्त्रीचा विवाह करून देणारीं माणसें देशांत दुःखें वाढवितात व वऱ्याच ठिकाणीं पापें वाढविण्यास कारण होतात.

**१५ स्त्रीवर्गाविषयीं पुरुषवर्गाचा आदरभाव**:—नवऱ्यांनीं बायका ह्मणजे दागिने ठेवण्याच्या जिवंत पेट्या किंवा करमणुकींच्या जिवंत वस्तु न समजतां ईश्वराच्या दृष्टीनें स्त्रीवर्ग हा पुरुषवर्गाच्या बरोबरीचा आहे. स्त्रिया या राष्ट्राच्या जननी आहेत व जननींचे गुण मुलांत अवश्य येतात हें जाणून त्यांना आदरभावानें वागविणें व गृहव्यवस्थेंत आणि राष्ट्रीयकार्यांचे उद्योगांत त्यांचें आदरानें साह्य घेणें.

**१६ मनगटांत जोर**:—ज्या लोकांच्या मनगटांत जोर नाहीं. त्यांची स्थिति जगांत तृणवत असते. मनगटांत जोर असण्यास राष्ट्रांतील श्रीमंत गरीब प्रत्येक माणसानें नेहमीं आरोग्य उत्कृष्ट राहील इतका मोकळ्या हवेंत व्यायाम केलाच पाहिजे व करमणुकीची सुखें घेणें तीं नीति शुद्ध मार्गांनीं नेमस्तच घेतलीं पाहिजेत.

**१७ देशभाग्यास हितकर असाच सामर्थ्याचा उपयोग**. प्राण गेला तरि बेहेत्तर-परन्तु स्वदेशाभिमान, स्वदेशकल्याण व स्वदेशवैभव यांना बाध येईल असा आपल्या चातुर्याचा अथवा शौर्याचा अथवा कोणत्याहि प्रकारें मानसिक किंवा शारीरिक सामर्थ्याचा उपयोग न करणें.

**१८ अन्यायाला शिरजोर होऊं नदेणें**:—कोणाचा अपराध न करितां न्यायमार्गानें व स्वकष्टानें मनुष्य जेंजेंकांहींमिळवितात तें त्यांचें परमेश्वर दत्त धन होय; तें त्यां पासून घेऊं पाहाणारांनीं नीतीला संमत व त्यांच्या संतोषा सारखा मोबदला देण्यास तयार असलें पाहिजे. असें

न करितां जो त्यांच्या धनाचा बलात्कारानें अपहार करणारे, अथवा मोबदल्याच्या शर्ती स्वतःस वाटतील त्या घालणारे ते त्या मनुष्यांचा परमेश्वर दत्त हक्क तुडवीत असतात. ते परमेश्वराचा अपराध करून स्वतः आपल्यावर दुःखें आणितातच पण आपल्या दुष्ट करणीनें लोकांच्या सुखाचाहि नाश करितात. असे मनुष्य आपल्यादेशांत नसावेत या साठीं समाज रचना, समाजआचार, व समाजपरिश्रम योग्य त्या गुणबलानें संपन्न राखणें.

---

प्रकरण दुसरें समाप्त.

मुंबई जगदीश्वर छा० छा०

श्रीशालीवाहन शक १८२७.

श्रीशिवाजी राज्याभिषेकशक २३१ ज्येष्ठमास.

ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.



मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. नं. ११८

अत्यन्त लोकप्रिय झालेलें
नवें पुस्तक.

# स्वदेशाभिमान संजीवन.

लेखक
वामन रामचंद्र जोशी बी. ए.
मुंबई.

किंमत दर प्रतीस ८।।।

मिळण्याचा पत्ता--मॅनेजर जगदीश्वर छापखान्याचें पुस्तक विक्रीचें दुकान, गिरगांव, मुंबई. बाहेरगांवांहून निदान आठ पुस्तकांची ऑर्डर लिहिणारास फक्त व्ही. पी नें पुस्तकें जातील. पुस्तकांचे किंमतीशिवाय पॅकिंग, पोष्टेज, व्ही. पी. कमिशन मिळून आठ प्रतीस इतर चार्ज दोन आणे.

मुंबईत किरकोळ प्रती विकल्या जातील. मुंबईत व बाहेरगांवीं व्यापाऱ्यांस योग्य कमिशनें पुस्तकें मिळतील.

# वामनपंडित

( वृत्त व ग्रंथ )

हा छोटा निबंध

रा. बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.,

यांनीं लिहिला,

तो

महादेव केशव काळे

यांनीं आपल्या

श्रीसरस्वतीमंदिरांत

छापून प्रसिद्ध केला.

मुंबई:—" तत्त्वविवेचक " छा० छा०

शके १८२७

किंमत ४ आणे.

खालीं लिहिलेलीं पुस्तकें

## विक्रीस तयार आहेत.

# महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग.

यांत शके १२०० पासून शके १५०० पर्यंतचा महाराष्ट्रांतील राजकीय, धार्मिक व सामाजिक चळवळीचा संगतवार इतिहास दिलेला आहे. या पुस्तकाच्या वाचनानें त्या काळच्या स्थितीचें चित्र हुबेहुब डोळयांपुढें उभें राहतें. किंमत १॥ रु. ट. ख. ८=.

## राजा भोज.

(डे. व्ह. ट्रा. सो. नें बक्षीस दिलेलें.)
भोजप्रबंधाच्या आधारें लिहिलेलें गद्यपद्यात्मक पुस्तक.
किंमत ०।- ट. ख. ८८॥.

## यक्षसंदेश.

( विद्वानांचे उत्तम अभिप्राय. )
वर मूळ असून खालीं मेघदूताचें समवृत्त व समश्लोकी मराठी भाषांतर.
किंमत ८≡ ट. ख. ८८॥.

## डॉ. का० ना० गोखले, एल्. एम्. ॲन्ड् एस्.

### यांनीं केलेलीं पुस्तकें.

१ गृहपरिचर्या व आरोग्यशास्त्र. किं. १॥ रु.

२ सुईण अथवा सूतिकाशास्त्राचीं मूलतत्त्वें (The Midwife). किं. ३ रु.

३ एकाद्यास एकाएकीं इजा झाली असतां तीवर तावडतोब करण्याचे उपाय. ( प्रश्नोत्तररूपानें व सचित्र ). किं. ०॥.

४ शारीर व जीवनेंद्रियशास्त्राचीं मूलतत्त्वें ( सचित्र ). किं. ०॥.

टपाल खर्च निराळा.

# वामनपंडित

## ( वृत्त व ग्रंथ )

हा छोटा निबंध

**रा. बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.,**

यांनीं लिहिला,

तो

**महादेव केशव काळे**

यांनीं आपल्या

**श्रीसरस्वतीमंदिरांत**

छापून प्रसिद्ध केला.

मुंबई,

शके १८२७

**किंमत ४ आणे.**

मुंबई,
तत्त्वविवेचक छापखान्यांत छापिलें.

दा. क्र.

# प्रस्तावना.

वामनपंडितांचे ग्रंथ वाचीत असतांना कांहीं प्रकरणांतील दुर्बळ भाषासरणी, पोरकट कल्पना, फाजील अश्लीलपणा, यथार्थदीपिकेशीं विसंगत अशी विचारसरणी इत्यादि प्रकार पाहून मनांत ज्या शंका उद्भवल्या व जीं अनुमानें काढतां आलीं, तींच प्रस्तुत निबंधांत नमूद केलीं आहेत. यांतील सर्वच गोष्टी सर्वांस पटतील असें नाहीं. तेव्हां या विषयाची चर्चा होऊन, प्रस्तुत लेखकाच्या अनुमानांचें व सिद्धान्तांचें कोणीं सकारण खंडन केलें असतां, लेखक त्याचा आभारी होऊन आपली चूक सुधारील. केवळ सत्यान्वेषणाचाच हा प्रयत्न आहे.

मुरुड–जंजिरा. }
१।७।०५.

वा० अ० भिडे.

# वामनपंडित.

## ( वृत्त व ग्रंथ. )

श्रीपति भक्तोत्तम जो गावा तद्रूप वामनस्वामी, ।
ज्या होउनि लुब्ध म्हणे, 'त्यजिन' श्रीकृष्णनाम 'न स्वा मी.' ॥ १ ॥
सगुणश्रीहरिभक्त ख्यात ज्ञात्या जनांत हा शुकसा, ।
बहुजन्मसिद्ध ऐसा साधेल सुपक्क योग आशु कसा? ॥ २ ॥
केली श्रीगीतेची व्याख्या, बहु भक्ति जींत गाजविली, ।
साजविली साधुसभा, भाषाकविकवनशक्ति लाजविली. ॥ ३ ॥

—मोरोपंत.

१. इसवी सनाच्या तेराव्या शतकांतील श्रीमज्ज्ञानेश्वरांपासून तों तहत अठराव्या शतकांतील महीपतिमोरोपंतांपर्यंत जे नांवाजण्यासारखे अनेक मराठी कवी झाले, त्यांतील अग्रेसरांत वामनपंडित हे मोडतात.

सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची, ।
ओवी मुक्तेशाची, किंवा आर्या मयूरपंताची ॥

या रामचंद्रपंत बडव्यांच्या आबालवृद्धांच्या तोंडीं बसलेल्या गीतीवरून हें उघड आहे कीं, सामान्य जनांत वामनपंडितांची प्रसिद्धि त्यांच्या मंजुळ, रसाळ, कोमल व यमकानुप्रासालंकृत श्लोकरचनेवरूनच आहे. त्याप्रमाणेंच या पंडितांची पांडित्यप्रौढी व तिचा परिहार यांसंबंधेंही वऱ्याच दंतकथा लोकांत पसरलेल्या आहेत. परंतु साधु किंवा भगवद्भक्त या नात्यानें पंडितांचें स्मरण झालेलें क्वचित्च आढळतें. ज्ञानेश्वर, तुकाराम किंवा रामदास या प्रसिद्ध भक्तांच्या शिष्यशाखा फारच विस्तृत असून, त्यांचे वार्षिकोत्सव मोठ्या थाटानें व भावनिष्ठेनें करण्यांत येतात. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, मोरोपंत इत्यादिकांच्या पुण्यतिथी निरनिराळ्या तऱ्हांनीं साजऱ्या केलेल्या आपण पाहातों व ऐकतों, परंतु वामनपंडितांसंबंधेंमात्र अशी चळवळ कोठेंच दृष्टोत्पत्तीस आलेली नाहीं. भगवद्भक्त या नात्यानें वामनपंडित वरील संतमंडळीपेक्षां अणुरेणूही कमी नव्हते; किंबहुना भागवतधर्माचा मार्ग उजळ व

निष्कंटक करण्याच्या कामीं पंडितांची योग्यता इतरांपेक्षां कांकणभर जास्तच होती, हें त्यांच्या ग्रंथांचें सूक्ष्म परिशीलन केलें असतां स्पष्टपणें नजरेस येतें. पंडितांनीं अश्रान्त परिश्रम करून, आपलें सर्व बुद्धिवैभव खर्चून व ज्ञानयुक्त सगुण भक्तीनें रसरसून, मुमुक्षुजनांसाठीं, भगवद्भक्तिगौरवासाठीं व दुर्मतखंडनासाठीं जी प्रचंड ग्रंथरचना मराठींत केली आहे, तिच्याविषयीं जुन्या पंडितमंडळींत तसेंच नव्या शिक्षितवर्गांत बहुतेक एक नमुन्याचेंच औदासिन्य आढळून येतें. ज्ञानेश्वरांची जशी भावार्थदीपिका ऊर्फ ज्ञानेश्वरी, एकनाथांचें जसें भागवत, किंवा समर्थांचा जसा दासबोध, तशीच पंडितांची यथार्थदीपिका. परंतु पहिल्या तीन ग्रंथांशीं विद्याव्यसनी लोकांचा जितका परिचय आढळतो, तितका चवथ्याशीं आढळत नाहीं, आणि म्हणून ज्ञानेश्वरादिकांसंबंधें जेवढी वाटाघाट होते, तेवढी पंडितांसंबंधें होत नाहीं. त्यांचें चांगलेंसें चरित्र किंवा त्यांच्या काव्यांचें मार्मिक व विस्तृत परीक्षण प्रसिद्ध झालेलें नाहीं. पंडितांच्या नांवावर मोडणारे अनेक ग्रंथ आहेत, परंतु त्यांपैकीं खुद्द त्यांचे किती यासंबंधीं नक्की असें कांहींच ठरलें नाहीं. या दिशेनें कै० हंस व बाळाजी आणि कंपनी यांनीं थोडासा प्रयत्न केला होता; परंतु तो पुढें कोणींच चालविला नाहीं. काव्यसंग्रहकारांनीं वामनी ग्रंथ छापतांना वरील गोष्टींचा ऊहापोह केला नाहीं, किंवा हंस व बाळाजी आणि कंपनी यांच्या श्रमाचा चांगलासा उपयोग करून घेतला नाहीं. पंडितांचे समग्र ग्रंथ छापण्याचे आजपर्यंत एकंदर दोनच प्रयत्न झालेले पाहण्यांत आहेत; एक बाळाजी आणि कंपनी यांचा व दुसरा निर्णयसागराच्या मालकांनीं चालविलेल्या काव्यसंग्रहाचा. पैकीं पहिला प्रयत्न १८९१ सालीं सिद्धीस गेला व दुसरा अद्याप चालू आहे. परंतु ग्रंथसंख्येसंबंधें त्यांचा एकमेकाशीं मेळ बसत नाहीं. त्यामुळें प्रसिद्ध झालेल्या प्रकरणांत खुद्द वामनी—म्हणजे यथार्थदीपिकाकारांचीं—प्रकरणें किती आहेत, याविषयीं वारंवार शंका येते; आणि कित्येक वेळां हें मुक्रर करणें मुष्किलीचें व प्रसंगीं अशक्यही होतें. *नवनीतकार सांगतात कीं, यथार्थदीपिका व निगमसार हीं प्रकरणें जमेस धरतां एकंदर वामनी प्रकरणें सुमारें ४२ आहेत. कै०

* नवनीत, आवृत्ति ४ थी, सन १८९५.

हंस आपल्या पंडितांवरील निबंधाच्या अखेर एका यादींत पंडितांची म्हणून १०० प्रकरणांची नामावळी देतात आणि काव्यसंग्रहकार, प्रकरणांच्या रदबदलीसंबंधें किंवा छाटाछाटीसंबंधें एक अवाक्षरही न काढतां, ९३ प्रकरणें प्रकाशित करितात! तेव्हां हा कोण ब्रह्मघोंटाळा! आजपर्यंत काव्यसंग्रहांतून वामनी ग्रंथांचे जे तीन स्फुटभाग प्रसिद्ध झाले आहेत, त्यांत एकंदर ग्रंथसंख्या ९,३२१ आहे व अजून यथार्थदीपिका पुरी व्हावयाचीच आहे. तिचे आजपर्यंत दोन भाग मिळून नऊ अध्याय संपले आहेत आणि तिसरा भाग हल्लीं छापत आहे. यथार्थदीपिकेंत एकंदर २२,२६६ ओव्या आहेत; म्हणजे पंडितांच्या नांवावर मोडणाऱ्या ग्रंथाची संख्या ३१,५८७ आहे. यांपैकीं किती कृति खास यथार्थदीपिकाकारांची ठरवितां येते, कितीविषयीं संशय येतो व किती त्यांची नाहीं असें बिनधास्त म्हणतां येतें, यासंबंधें प्रस्तुत निबंधांत खल करण्याचें योजिलें आहे. अर्थात् यासंबंधे वाटाघाट करितांना पंडितांचें इतिवृत्त, मतें, स्वभावचर्चा, भाषेची शैली वगैरेविषयीं चर्चेचा फारच उपयोग होणार आहे, हें उघड आहे.

२. मराठींतील बरेचसे प्रसिद्ध कवि संत, साधु, योगी किंवा भगवद्भक्त या नात्यानेंही विख्यात आहेत. त्यांतील कित्येकांनीं आपल्या अलौकिक चारित्र्यानें, प्रेमळ पण अधिकारप्रयुक्त वाणीनें आणि भक्तीच्या एकतानतेनें समाजावर विलक्षण छाप बसवून, त्याचीं मनें आपल्या अगदीं अंकित करून टाकिलीं व म्हणूनच लोक त्यांना ईश्वरी अंश किंवा अवतार मानीत व अद्यापही मानितात. अशा महाव्यक्तींचीं चरित्रें त्यांच्या शिष्यांनीं व भक्तांनीं मोठ्या प्रेमभावानें लिहून ठेविलेलीं आहेत. या चरित्रग्रंथांतून पौराणिक कथानकांप्रमाणें मधून मधून अनेक असंभाव्य प्रकार व अद्भुत चमत्कार वर्णिलेले असून, या संतादिकांच्या अंगीं सिद्धींच्या व भक्तीच्या जोरावर कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् शक्ति आलेली होती, असें दाखविलेलें *आहे. अशा तऱ्हेच्या वर्णनांवर व चमत्कारां-

* ज्ञानेश्वर, चांगदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादिकांचीं चरित्रें व हनुमंतस्वामीकृत रामदासस्वामींची बखर हीं पुस्तकें वाचलीं असतां, आमच्या वरील विधानाचें सत्य वाचकांच्या तत्काल अनुभवास येईल.

वर ऐतिहासिक दृष्ट्या किती भरंवसा ठेवावा, हा मुद्दा बराच नाजूक व वादग्रस्त *आहे. कित्येकांस आपल्या अतिभूमीला गेलेल्या प्रेमाच्या, पूज्यभावाच्या व विश्वासाच्या जोरावर हे सर्व अद्भुत प्रकार सर्वथैव खरे मानण्याला कोणतीच दिक्कत वाटत नाहीं, व दुसरे या गोष्टींना तर्कशास्त्राच्या कसोटीला लावून, त्यांत सत्याचा लवलेशही नाहीं म्हणून त्यास नादान व टाकाऊ ठरविण्यास मुळींच डगमगत नाहींत. परंतु इतर बऱ्याच वादांप्रमाणें प्रस्तुत प्रकरणींही निर्भेळ सत्य कोठें तरी मध्यंतरीं असून, त्यास दोन्ही पक्ष अंशतः पारखे झालेले आढळतात; कारण या अद्भुत चमत्कारांना सारासार विचाराची चाळण लाविली म्हणजे अखेर थोडेंसें तरी सत्य हातीं आल्यावांचून राहात नाहीं. पण हा घोंटाळूं पहाणारा मुद्दा जरी एकवार बाजूस ठेविला व अशा प्रकारच्या संतांच्या व साधूंच्या चरित्रांतून असंभवनीय भाग गाळला, तरीसुद्धां चरित्रनायकांच्या आयुष्यांतील बऱ्याच ठोकळ गोष्टी समजून येतात. †महीपतिबोवा ताऱ्हाबादकर यांनीं अठराव्या शतकांत अशा तऱ्हेचीं निरनिराळ्या शेंकडों संतांचीं चरित्रें संकलित करून, संतविजय, भक्तविजय, संतलीलामृत व भक्तलीलामृत हे ओंवीबद्ध ग्रंथ लिहिले. यांत ज्ञानेश्वरांपासून झाडून लहान मोठ्या साधुभक्तांचीं चरित्रें असल्यामुळें, कविचरित्रें लिहितांना अर्वाचीन चरित्रकारांना त्यांचा अवर्णनीय उपयोग झाला आहे.

---

* रा० रा० विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं हनुमंतस्वामीच्या रामदासी बखरीसंबंधें जे उद्गार काढिले आहेत, ते अशा तऱ्हेच्या संतचरित्रांना सामान्यनः लागू करण्याला हरकत नाहीं. ते म्हणतातः—समर्थांनीं अद्भुत चमत्कार केल्याचें हनुमंतस्वामीनें लिहिलें आहे. परंतु तो सर्व हनुमंतस्वामीच्या कल्पनेचा खेळ होय. समर्थांचे अद्भुत चमत्कार सांगण्यांत हनुमंतस्वामीनें आपल्या स्वतःच्या भोळेपणाचें मात्र हास्यकारक प्रदर्शन केलें आहे........ समर्थांच्या वेळची मंडळी धर्मनिष्ठ होती व हनुमंतस्वामीच्या वेळची मंडळी धर्मभोळी होती.

—रामदास.

† महीपति इ० स० १७१५-१७९०. हे मोरोपंताचे समकालीन होते. यांनीं आपलीं संतचरित्रें, नाभाजीचें 'संतचरित्र' व उद्धवचिद्घनाचें 'भक्तचरित्र' या ग्रंथांच्या व वृद्धांच्या तोंडून वगैरे स्वतः मिळविलेल्या माहितीच्या आधारें लिहिलीं आहेत, असें भक्तविजयाच्या आरंभीं स्पष्ट सांगितलें आहे.

परंतु पंडितांसंबंधेंमात्र यांत कांहींच माहिती मिळत नाहीं. वामनपंडित हे जाडे विद्वान्, न्यायतर्कव्याकरणशास्त्रपारंगत, वेदांतविद्यानिष्णात व एकनिष्ठ सगुणोपासक होते. लोकांना वैदिक धर्मज्ञान होऊन भक्तिमार्ग वाढावा व नाममहिम्याचें खरें स्वरूप सर्वांच्या निदर्शनास यावें, म्हणून या पंडितवर्यांनीं मराठींत दांडगी ग्रंथरचना केली. पंडितांच्या शिष्यमंडळीनें त्यांच्या पादुका अद्यापि सांभाळून ठेविल्या आहेत व त्यांची ते पूजा करीत असतात, असें आपल्या ऐकण्यांत असल्याचें *नवनीतकार सांगतात. तेव्हां कोणा शिष्यानें किंवा महीपतिबोवांनीं पंडितांचें जीवनवृत्त वर्णिलें नाहीं, हें आश्चर्य खरेंच! पण ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, चोखामेळा इत्यादि संतांच्या अद्भुतलीला, पंडितांसारख्या ग्रंथव्यासंगी व ज्ञाननिष्ठ भगवद्भक्ताच्या जीवनवृत्तांत संभवनीय नाहींत, हेंच या चरित्राभावाचें कारण असावें. कांहीं अलौकिक व अद्भुत पाहण्यांत किंवा ऐकण्यांत आलें, तर तें कागदावर टिपून ठेवण्याकडे मनुष्याची साहजिक प्रवृत्ती होते. परंतु तसें या महापंडितांच्या चरित्रांत कांहीं असण्याचा संभव नसल्यामुळें, त्यांचें चरित्र न लिहिण्यांत म्हणजे कोणाला दुष्टावा साधावयाचा होता, असें आमच्या बुद्धीस वाटत नाहीं. परंतु बाळाजी आणि कंपनीच्या वामनी ग्रंथाला जें लहानसें पंडितांचें चरित्र जोडलें आहे, तें लिहिणारांची कल्पना अगदीं भिन्न आहे. ते चरित्रकार वरील गोष्टीस उद्देशून लिहितातः—"ते ( पंडित ) प्रेमळ जीवन्मुक्त हरिभक्त होते, परंतु त्यांचे हातून एकही अद्भुत चमत्कार झाला नाहीं, म्हणूनच जर त्यांला साधुमालिकेंत ओंविलें नसेल तर कोण जाणे! किंवा ते सत्यप्रिय व निस्पृह--असल्याकारणानें त्यांनीं श्रीमद्भगवद्गीतेवरील टीका करते वेळीं कित्येक शब्दांचा अर्थ अन्य टीकाकारांस समजला नाहीं, असें स्पष्ट सांगितल्याबद्दल इतर टीकाकारांच्या अनुयायांचा त्यांवर रोष झाला असावा, व ते संतमालेंत ओंवण्याजोगे साधु नव्हत, यास्तव त्यांस त्या चरित्रांच्या हद्दपार करावें, असें त्यांनीं मनांत आणिलें असावें." बाळाजी आणि कंपनींतील चरित्रकार पंडितांचे विशेष पक्षपाती असल्यामुळें व रागाला वश होऊन बुद्धी भडकल्यामुळेंच त्यांच्यानें वरच्यासा-

---

* नवनीत, पृष्ठ ८८.

रखा मत्सराचा व क्षुद्रबुद्धीचा भयंकर आरोप संतमंडळ व त्यांचे अनुयायी यांजवर लादण्याचें धाष्टर्य करवलें. कारण हा आरोप सपशेल खोटा आहे, हें ठरविण्यास हल्लीं विपुल साधनें उपलब्ध आहेत. 'महाराष्ट्रकवि' व 'ग्रंथमाला' या मासिकांतून अलीकडे प्रसिद्ध झालेल्या संतमालिकांपैकीं बऱ्याच मालिकांत 'वामन' हें नांव आढळतें. मोरोपंतांनीं 'सन्मणिमाला' व 'सन्नामगर्भरामायण' यांत वामनपंडितांचा उल्लेख केला आहे; शिवाय 'वामनपंडितस्तुति' या मथळ्याचें एक स्वतंत्र प्रकरण रचिलें आहे. यांत पंतांनीं पंडितांची जशी कवित्वाबद्दल तशीच भगवद्भक्तीबद्दलही मनःपूर्वक स्तुति केली आहे. याच प्रकरणांतील तीन गीति या निबंधाच्या आरंभींच्या अवतरणांत उतरल्या आहेत. श्रीधरांनींही पंडितांच्या कवित्वासंबंधें असा सादर निर्देश केलेला आढळतो.—

> "जैसा चंडांशु सतेज व्योमीं। तैसाचि केवळ वामनस्वामी; ।
> ज्याची श्लोकरचना ये भूमीं। भूमंडळावरी अपूर्व गा!"॥

संतचरित्रकार महीपतिबोवा यांनीं पंडितांचें जरी स्वतंत्र जीवनवृत्त दिलें नाहीं, तरी मधून मधून रामदास, तुकाराम इत्यादिकांच्या हकीतींत ओघानेंच पंडितांच्या नांवाचा उल्लेख मोठ्या प्रेमानें, उल्हासानें व पूज्यभावानें केलेला आढळतो.—

"वामनस्वामी चतुरपंडित। जो प्रेमळ द्वेषरहित।
यांणीं दशमस्कंध भागवत। केलें प्राकृत निजबुद्धि॥ सं.वि.अ.१०ओ.१६
वामनस्वामी चतुरपंडित। जो वेदांतशास्त्रीं निपुण बहुत।
त्याहीवरी प्रेमळ भक्त। कविता प्रख्यात जयाची॥ १०–७२
वामनस्वामी भक्त थोर। जो व्यास अवतार कलियुगीं"॥ २२–४१

हे बोवांचे उद्गार पूज्यभाव, सरलता व निर्मत्सरता यांनीं रसरसलेले नाहींत का? तेव्हां अशीं *प्रमाणवचनें ढळढळीत नजरेपुढें अस-

---

* पंडितांना साधु, संत, योगी बराच मान देत व त्यांच्याच सांगण्यावरून यथार्थदीपिका रचण्याचें त्यांचे मनांत आलें, असें पंडित स्वतःच सांगतातः—
आणि तुझ्या कृपेचे विभागी। शिष्य, संत, भक्त, योगी,। ते म्हणती कीं 'जगदुपयोगी। ऐशी टीका करावी'॥ अ० १ ओ० १३२.

तांना, संत किंवा त्यांचे चरित्रकार यांच्या निःपक्षपातित्व संबंधें किंवा सत्यप्रियतेसंबंधें साशंक होऊन, त्यांजवर मत्सरीपणाचा व वस्तुविपर्यासाचा आरोप लादणें विचारास धरून नाहीं, असें आम्हांस वाटतें. महीपतिबोवांनीं पंडितांचें चरित्र न लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, त्यांना पंडितांच्या जीवनवृत्ताची माहिती वृद्धमुखानें किंवा ग्रंथद्वारा फारशी उपलब्ध झाली नसावी, किंवा जी कांहीं उपलब्ध झाली असेल ती विशेष अलौकिक किंवा मनोरंजक वाटली नसावी. बाळाजी आणि कंपनींतील वामनचरित्रकार तर पंडितांचे निःसीम भक्त दिसतात! मग, त्यांनींही पंडितांच्या देशकुलवृत्ताविषयीं व जीवनवृत्ताविषयीं फारशी माहिती कां दिली नाहीं? त्यांना तर मत्सरानें झपाटलें नव्हतें ना? मग हा प्रभाव कसला? तेही अनुमानधक्क्यानें चांचपडत चांचपडतच कां मार्ग क्रमीत आहेत? कोणाचेंही चरित्र लिहावयाचें म्हणजे त्यास यथास्थित साधनें व भरपूर माहितीचा संचय लागतो; पण याच गोष्टींचा जर अभाव असेल, तर चरित्रकार काय रडणार? त्यानें चरित्र कोठून पैदा करावें? हीच स्थिति महीपतिबोवादि संतचरित्रकारांची असल्यामुळें, पंडितांचें चरित्र न लिहिल्याबद्दल त्यांस दोष देणें किंवा मत्सरी म्हणणें म्हणजे निव्वळ आपल्या मनाच्या अनुदारतेचें भर चव्हाट्यावर प्रदर्शन करणें होय. आतां पंडितांचें चरित्र न लिहिल्याबद्दल जर संतचरित्रकार मतलबी व मत्सरी ठरतात, तर पंडितांच्या पादुका संभाळून ठेवणारे शिष्य व त्यांचे काशींतील वंशज यांनींही पंडितांचें चरित्र लिहिलें नसल्यामुळें, तेही कृतघ्नत्वाच्या व गुरुद्रोहाच्या दोषाला पात्र होत नाहींत का? मग, त्या शिष्यांविषयीं व वंशजांविषयीं एक अवाक्षरही न काढितां बाळाजी आणि कंपनींतील चरित्रकारांनीं संतचरित्रकारांवरच तेवढें कां घसरावें, हें आम्हांस समजत नाहीं.

असो, एकंदरींत पंडितांचें कुलवृत्त व जीवनवृत्त समजण्याला चांगलेंसें व विश्वासार्ह असें साधन नाहीं. नाहीं म्हणायला, संतविजयांत एक व हनुमंतस्वामीकृत रामदासी बखरींत दोन अशा एकंदर तीन आख्यायिका त्यांविषयीं उपलब्ध आहेत. परंतु त्यांवर कितपत विश्वास ठेवावा व त्यांस कितीसें महत्व द्यावें याचा विचार पुढें करण्यांत येईल. अशा

रीतीनें बाह्य व स्वतंत्र साधनांचा मार्गच खुंटल्यामुळें, पंडितांविषयीं त्यांच्या ग्रंथांतच अंत:प्रमाणानें जी काय माहिती मिळेल, तेवढीच जमेस धरून गुजारा केला पाहिजे. तसेंच पंडितांनीं दिलेल्या स्वतःच्या माहितीशीं जेथें जेथें म्हणून वर निर्दिष्ट केलेल्या दंतकथांचा विरोध येईल, तेथें तेथें त्या दंतकथा टाकाऊ ठरविल्या पाहिजेत, हेंही अगदीं उघड आहे.

३. आतां आम्ही वामनपंडित म्हणजे यथार्थदीपिकाकार समजतों. यथार्थदीपिका ही भगवद्गीतेवर विस्तृत टीका आहे. हा एकंदर २२ हजारांवर ग्रंथ आहे, म्हणजे हा ग्रंथ ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेच्या अडीच पटींहूनही जरासा मोठाच आहे. गीतेमध्यें नानातऱ्हेचे शेंकडों आध्यात्मिक व व्यावहारिक विषय आले असल्यामुळें, तीवरील या पंडितकृत विस्तृत टीकेंत पंडितांचीं मतें, मनोरचना, लेखनशैली, थोडेंबहुत जीवनवृत्त व तत्कालीन समाजस्थिति हीं समजण्याचा बराच संभव आहे. शिवाय ज्याअर्थी वामनपंडित म्हणजे आम्हीं यथार्थदीपिकाकार समजतों, त्याअर्थी हीच कृति प्रथम जमेस धरून, तीवरून पंडितांचीं अशीं निःसंदेह दुसरीं किती व कोणतीं प्रकरणें ठरतात, हें पहावयाचें आहे. तरी या कृतीचीच प्रथम छाणणी करणें इष्ट आहे.

४. पंडितांचें कुलवृत्त व इतिवृत्त जाणण्याच्या उद्देशानें हा अवाढव्य ग्रंथ चाळणाऱ्या जिज्ञासूची पूर्ण निराशा झाल्याशिवाय राहणार नाहीं; कारण आपलें कुल, कुलदैवत, मातापितरें, जन्मस्थान, अध्ययन इत्यादिकांचा पंडितांनीं कोठेंही यत्किंचित्सुद्धां थांगपत्ता लागूं दिला नाहीं. त्यांनीं आपला स्वतःचा उल्लेख, अथपासून इतीपर्यंत 'वामन' याच साध्या एकेरी नांवानें केलेला आहे. ज्याअर्थी यथार्थदीपिकेसारख्या बिनमोल महत्वाच्या अचाट ग्रंथांतही पंडितांनीं आपल्या कुलवृत्ताचा वगैरे निर्देश केलेला नाहीं, त्याअर्थी या गोष्टींचा दांडोरा पिटणें पंडितांना मुळींच आवडत नव्हतें, असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय आहे, असें वाटत नाहीं. ग्रंथकर्त्यानें विषयप्रतिपादनाला अवश्य असेल, तितक्याच स्वतःच्या व्यक्तिविषयक अनुभवाचा उल्लेख करावयाचा, या पलीकडे आपली कुळकथा सांगण्यांत कांहीं हंशील नाहीं, असाच जणुं काय

पंडितांचा बाणा सर्वत्र आढळून येतो. प्रस्तुत ग्रंथांत त्यांनीं स्वतः विषयींच्या एका गोष्टीचा मात्र तीन ठिकाणीं उल्लेख केला आहे; ती गोष्ट म्हणजे त्यांना ब्रह्मविद्यारहस्याची प्राप्ति कोणापासून व कशी झाली, ही होय.

(१) जी श्री सच्चिदानंद गुरू ! । जें जें वदलास कल्पतरू ।
निर्गुण, सुवर्ण सगुण मेरू । तो भेटलासी यतिरूपें ॥ ८
श्रीगुरुरूपें देवा ! । मज भेटलासी वासुदेवा ! ।
तैं हें रहस्य देवाधिदेवा ! । बोलिलासी. ॥ ७९
तुझीं वचनें तुजप्रती । यालागीं बोलिलों श्रीपती ! ।
कीं श्रोते तुझ्याच मूर्ती । तूं विश्वरूप भगवंत ॥ ८०

—अध्याय १.

(२) जयजय देव गीताकार ! । जयजय देव टीकाकार ! ।
जयजय देव सर्वाकार ! । वामनगुरो ! वामनात्मन् ! ॥ ७

—अध्याय १६.

(३) सृष्टिस्थिति प्रलयादि कार्य । ज्याच्या संकल्पमात्रें, तो तूं विधीचा आर्य ।
तोचि तूं स्वयें माझा आचार्य । ऐश्वर्य माझें अतर्क्य, देवा !॥ १५
नामें आणि रूपें । सच्चिदानंद स्वरूपें ।
मजनिमित्त रूप अरूपें । प्रकट केलें मलयपर्वतीं ॥ १६
दों मुहूर्तांची संगती, । परि अनाद्यनंत अनन्यगती ।
झालासी, आणि बहुतां जनांतें सद्गती । यामुखें देसी तूं विश्वतोमुख ॥ १७

—अध्याय १८.

वरील तीन अवतरणांवरून इतकें स्पष्ट आहे कीं, मलयपर्वतावर पंडितांना ईश्वरी साक्षात्कार होऊन, त्यांस अद्वैततत्त्व व सगुणभक्तिरहस्य यांचा बोध झाला व त्यांनीं त्या ज्ञानप्राप्तीचा उपयोग यथार्थदीपिकादि ग्रंथांच्या द्वारें आपल्या बांधवांना करून दिला आहे. पंडितांपुढें भगवंत यतिरूपानें प्रकट झाले. या यतीचें रूपाप्रमाणें नामही सच्चिदानंदच होतें. या यतीश्वरांनीं अवघ्या दोन मुहूर्तांच्या अवधींतच ब्रह्मविद्यारहस्याचा उलगडा केला व या ज्ञानप्रकाशानेंच गीतेवर यथार्थ व्याख्या करण्याचें

वामनपंडितांना सामर्थ्य आलें. समग्र यथार्थदीपिकेंत या व्यतिरिक्त अन्य गुरूचा किंवा गुरुपरंपरेचा पंडितांनीं कोठेंही निर्देश केला नाहीं, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. हीच गोष्ट पंडितांनीं आपल्या निरनिराळ्या चारपांच ग्रंथांत नमूद केली आहे, व तींत असंबद्धता कोठेंच आढळत नाहीं. तेव्हां या प्रकाराशीं विसंवादी असणाऱ्या सर्व दंतकथा एक तर बनावट मानिल्या पाहिजेत, किंवा त्या यथार्थदीपिकारांविषयीं नसून, त्यांचा संबंध दुसऱ्या कोणत्या तरी वामनकवीशीं मानला पाहिजे; यावांचून सुटका नाहीं.

यथार्थदीपिकेची भाषा सर्वत्र अगदीं प्रयोगशुद्ध, सरळ, जोरदार व कसलेली आहे. समयानुरूप ती रसाळ, कोमळ, सणसणीत, रंगेल, भाविक व हृदयंगम अशी दिसून येते. हा ग्रंथ तयार झाल्याला आजमितीस जरी अडीचशेंहून अधिक वर्षें झालीं आहेत, तरी भाषारचनेंत कोठेंही जुनाटपणा, अपरिचितपणा किंवा शिथिलत्व आढळत नाहीं. विषयप्रतिपादनाच्या आवेशांत सरस्वतीचा प्रवाह अस्खलित घोंघावत चाललेला आहे, त्याला जबरीनें कृत्रिम वळण दिलेलें कोठेंही भासत नाहीं. वाक्यरचना इतकी सरळ व बिनघोंटाळ्याची आहे कीं, ती बहुतेक गद्यासारखीच भासते; किंबहुना गद्यग्रंथ लिहिण्याचा जर पंडितांच्या वेळीं प्रघात असता, तर हजार हिश्यांनीं त्यांनीं आपली दीपिका गद्यरूपानेंच प्रकट केली असती, असा आमचा होरा धांवतो. टीकेला ओवी छंद स्वीकारल्यामुळें, अक्षरवृत्तांच्या शृंखलेंतून सुटलेली पंडितांची वाणी स्वच्छंदरीतीनें विहार करितांना पाहून ठिकठिकाणीं वाचकांचें चित्त रंगून गेल्यावांचून राहत नाहीं. पंडितांच्या ओवीला अक्षरमात्रांचा फारसा ताळमेळ आढळत नाहीं. मनांतला अर्थ सरळपणें व्यक्त करावयाचा या तत्त्वावरच एकंदर सर्व रचना आहे. ओवींत यमकांचीच काय ती अटक आहे, परंतु त्यांकरितां कवीनें कोठेंही आटापेट केलेला दिसत नाहीं. सूर्यबिंब क्षितिजावर आरूढ होतां क्षणींच जशीं पद्मवनें आपोआप विकसित होतात, तद्वतच पंडितांच्या मनांत विचार प्रादुर्भूत होतां क्षणींच त्यांची वाणी यमकांनीं

प्रफुल्लित झालेली भासते.* जागोजाग 'हातच्या कांकणास आरसा;' 'काडीचोर तो पाडी चोर'; 'पोट दुखणें;' 'आपलेच दांत, आपलेच ओंठ;' 'अंगांत वारें भरणें;' 'दांत चावणें;' 'पिशाचाचे हातीं कोलित;' 'वारा मुठींत धरणें;' 'लेंकराचे खेळ;' 'नख लागे ज्याला, कां कुऱ्हाडी हाणणें त्याला;' 'चोराचे मनीं चांदणें' 'कोंडा कांडणें' 'खाऊं मागणें' 'ज्या मापानें घ्यावें, त्याच मापानें फेडावें,' 'मनाचा घोडा' अशासारख्या म्हणी व लौकिक शब्दसमूह यांचा प्रसंगानुसार उपयोग करून, पंडितांनीं आपल्या वाणीला साधें पण मोहक स्वरूप आणिलें आहे. सरस दृष्टान्त, उपमा व रूपकें यांच्या साह्यानें गहन विषयही सर्वांस सुगम केले आहेत आतां ज्या ठिकाणीं गीतेंतील श्लोकाचा खरा अर्थ न समजल्यामुळें दपटशाही करून इतर टीकाकारांनीं कशी तरी वेळ मारून नेली आहे, किंवा भगवद्वाक्यांचा अर्थविपर्यासही झाला आहे, असें पंडितांना वाटलें, त्या ठिकाणीं अर्थात् एक एक शब्द घेऊन त्यावर मल्लिनाथी करणें त्यांना भागच पडलें आहे. परंतु इतर ठिकाणीं अद्वैताचें प्रतिपादन करितांना, सगुणभक्तीची महती गातांना, भगवंताला आळवीत असतांना किंवा अशा तऱ्हेच्या मनाला उमळवून टाकणाऱ्या इतर प्रसंगांचें वर्णन करीत असतांना पंडितांची वाणी ईश्वरी प्रसादानें विकसलेली व काव्यप्रतिभेनें अगदीं रसरसलेली आढळते. या विधानांच्या समर्थनार्थ यथार्थदीपिकेंतून शेंकडों उतारे

---

* वर पंडितांनीं यथार्थदीपिकेंत यमकें साधिलीं आहेत म्हणून म्हटलें, परंतु भागवतप्रकरणांतील वामनीश्लोकांत जशीं यमकें साधिलीं आहेत, तशा प्रकारचीं हींही आहेत असें मात्र समजूं नये. ज्ञानेश्वरींतील किंवा तुकारामनामदेवाच्या अभंगांतील यमकांच्याच नमुन्याचीं हीं यथार्थदीपिकेंतील यमकें आहेत. तेव्हां यथार्थदीपिकेंतील यमकांवरून म्हणजे कोणी पंडितांना 'यमक्या वामन' हें नांव देईल, असें आमची तरी मनोदेवता घेत नाहीं. परंतु चमत्कार हा कीं, हनुमंतस्वामी आपल्या रामदासी बखरींत म्हणतात, "पुढें वामनपंडित यांनीं जगदोद्धारास्तव स्वामींचे आज्ञेप्रमाणें यथार्थदीपिकादि बारा लक्ष ग्रंथ केला, त्यांतील प्रत्येक यमक अति सुंदर पाहून स्वामींनीं पंडितांचें नांव 'यमक्या वामन' असें ठेविलें." यावरून हनुमंतस्वामींची पंडितांच्या ग्रंथाविषयींची कल्पना किती भ्रामक होती, हें उघड होतें.

देतां येतील, परंतु तसें करण्यास या चिमुकल्या निबंधांत फारसा अवकाश नाहीं. तरी पण वाचकांच्या समाधानार्थ येथें थोडेसे उतारे देतों:—

(१) ते निर्गुणोपासकही शहाणे खरे, । स्वहित तत्परचि खरे; ।
परंतु आत्मा कळतांचि भरे । आंगीं वारें जाणिवेचें ॥ २६७
ज्या गांवीं सुख अत्यंत । तो दृष्टी दिसों लागला निश्चित ।
परंतु मार्गीं आडपर्वत । वाट दाखविणार तेथें सोडिला ॥ २६८
दृष्टीं गांव दिसतो नीट, । आतां काय दाखवावी येणें वाट? ।
म्हणोनी साधनाचे कडे अचाट । शरीरबळें वेंघों
आरंभिले ॥ २६९

नदीचे पैल थडी । दृष्टीं देखतां वाटते नदी थोडी, ।
नाव सांडून टाकिली उडी । आवर्तशत प्रवाहांत ॥ २७०
तैसें कळतांचि निर्गुण, । आतां नलगे म्हणती सगुण; ।
आपणातें मानूनि निपुण, । करिती अभ्यास योगाचा ! २७१
—अध्याय १२.

(२) जो स्वात्मसुखातें जाणे । आणि ध्यानें स्वसुख ज्यास बाणे ।
त्यातें म्हणती तत्वज्ञ शहाणे । कीं बाह्यसुखस्पृहा त्याला
असेना ॥ १३०२

स्वयें जो अमृत प्याला । कांजी कां आठवेल त्याला? ।
स्वानंदसिंहासनारूढ झाला । तो भिकेचीं खापरें कां
स्मरेल ? ॥ १३०३

जो खेळे गंगाजळीं । तो कां सूर्यकिरणें तळमळी ।
ध्याननिष्ठाच्या मनीं नसे उकळी । विषयसुखस्पृहेची ॥ १३०४
—अध्याय १२.

(३) जैसी राजपत्नी नवोढा मनोरमा । मातृमुखें जाणोनि
भर्तृमहिमा ।
बैसोनि अंकींही परमा । जाऊंच पाहे उठोनी. ॥ ४२१
जों जों वाढे सलगी । तों तों अधिक थारे पलंगीं, ।
गोडी घेतां अंगसंगीं । ढकलली तरी ढकलेना ! ॥ ४२२
तैसें चित्त घडीघडी । अभ्यासीं घे स्वरूपाची गोडी ।
स्थिरत्व बाणतां न सोडी । अनुभव तो आनंदाचा. ॥ ४२३
—अध्याय ६.

(४) अर्जुना! जरी संन्यासी । डोई बोडोनि झालासी ।
तरी कैसा कर्मे टाकिसी । क्षण एकही. ॥ ८०
लंगोटीही टाकणें । आणि नग्न होऊनि असणें ।
तेंही नव्हे काय करणें । अगा! कर्म? ॥ ८१
घट वर्ते तरीच माती । न वर्तता काय अन्य जाती? ।
कर्मे रचिली देहाकृती । त्याग कर्माचा तो कैसा? ॥ ८३ ॥
भूचर टाकोनि भूमी । म्हणे पळोनि जाईन मी ।
पळतां पुढें रिकामी । भूमीच दिसे! ॥ ८४ ॥
गगन टाकोनि पक्षी । उडों लागला अंतरिक्षीं ।
तो तों सर्वत्र लक्षी । तेंचि गगन! ॥ ८९ ॥

—अध्याय ३.

(५) जें जग अनेकरूप पूर्वी देखिलें । तेंच हें ऐसें अर्जुनें लेखिलें ।
परि त्या एक शरीरीं देखे रेखिलें । चित्र नवनारीगजाचें जे रीतीं ॥ २४१
पाहतां गजाच्या आकाराकडे । गज सारा दृष्टीं पडे ।
त्यांतचि पाहतां सांपडे । स्थळस्थळीं भिन्न स्त्रीरूप. ॥ २४२ ॥

—अध्याय ११

(६) नदीजळीं नदीतीर । प्रतिबिंबे; परंतु तेंचि नीर ।
तीर बुडवून जेव्हां धरी पसर। प्रतिबिंब जळीं तीराचें दिसेना. ॥ ६२७ ॥
ते स्वयें तीरींचे कडेच दिसती जळीं। तेव्हां प्रतिबिंब त्याचे जळीं न डळमळी ।
तैसें चित्प्रतिबिंब निर्मळीं । सत्त्वीं समाधींत गवसेना. ॥६२८॥

—अध्याय १२.

(७) द्विपदत्वें मनुष्य होय । तरी पक्षियासही दोनच पाय ।
दाढीनें मनुष्य होय तरी काय । दाढी नसे बोकडासी? २८० ॥
आहेत हात यावरूनी । म्हणावें मनुष्य म्हणूनी ।
तरी मर्कटासही दोनीदोनी । असती हस्त. ॥ २८१ ॥
सुरतसुखें म्हणावें नर । तरी तें सुख पावती वानर खर ।
मनुष्य निर्मिती म्हणावें घर । तरी पक्षीही गृह निर्मिती. ॥२८२॥
पुढील चिंता कोणासी । नसे, ती एक मनुष्यासी, ।
या गुणें म्हणावें मनुष्यत्व यासी, । तरी पक्षियासही ते असे ॥ २८३ ॥

प्रसूत नाहीं तोंचि चिमणी । आंडियांकारणें गर्भिणी ।
कापूस आणि मृदुतृणीं । सज करी. ॥ २८४ ॥
चारा सांडूनि, वेंची । कापूस, धरधरोनि चोंचीं ।
ने; ऐसी चिंता संतानाची । करी, जीं उपजलीं तीं
नसतीं. ॥ २८५ ॥
ऐसा पाहतां विचार । पशुपक्षियां समान विहार ।
निद्रा, मैथुन, आहार, । पशूंस तैसे मनुष्यांसही. ॥ २८६ ॥
एवं भजन सर्वेश्वराचें । करिती, त्यांचें मनुष्यत्व साचें ।
म्हणूनि वाक्य भगवंताचें । कीं, 'माझ्या मार्गीं वर्तती
मनुष्य सर्व' ॥ २८७ ॥
—अध्याय ४.

(८) पुत्र जाला तरुण । तो बरा जाणे पित्याचे गुण ; ।
बाळ नेणे, म्हणूनि करुण । काय उणें पाहे तयातें ? ॥ १६००
भक्त अपक्व असला जरी । पक्वापरिस ओझें त्याचें मजवरी ।
त्याची सर्व चिंता ती श्रीहरी । अगा ! अर्जुना करितसे. ॥१६०१
जो पक्वचि जाला, । म्यां काय संभाळावें तयाला ? ।
क्षणमात्र न स्फुरे जयाला । द्वैत कांहीं. ॥ १६०२
पक्षहीन बाळ । पक्षी त्याचाच करिती संभाळ ।
देखोनि त्याचा परिपक्वकाळ । निश्चिंत असती. ॥ १६०३
—अध्याय १२.

(९) "तूं कृष्ण सखा आपला । देवा ! इतुकेंच ठावुकें मला ।
हा तुझा महिमा नाहीं कळला । मानिला सखाचि म्हणोनी.॥७६२
मर्कट मुक्ताफळें नेणे । दांतें रगडी मानूनि चणे ।
तैसा मी" अर्जुन म्हणे, । "सखा मानुनी बोलिलों तुजसीं.॥७६३
कल्पवृक्षाचा नागर । करूं पाहे हलधर ।
म्यां मानिला तूं सर्वेश्वर । सखा प्राकृतपुरुषदृष्टीनें. ॥ ७६४
न कळतां परिसाचा गुण । टांक आठरा भार खूण ।
जोख पाव शेर मानूनि, लवण । विकूं लागला भारें तयाच्या॥७६५
कामधेनूचिया कांसे । गोचीड आवडी तृप्ति होतसे ।
तेचि उपमा मज दिसे । सुख पावलों सखा प्राकृत मानुनी. ॥७६६
दांडगियास चिंतामणी । सांपडला तो घालून गोफणीं ।
शेत संरक्षी, तसा मी चक्रपाणी । प्राकृत सखा मानिला! ॥७६७

प्रसूत नाहीं तोंचि चिमणी । आंडियांकारणें गर्भिणी ।
कापूस आणि मृदुतृणीं । सज करी. ॥ २८४ ॥
चारा सांडूनि, वेंची । कापूस, धरधरोनि चोंचीं ।
ने; ऐसी चिंता संतानाची । करी, जों उपजलीं तीं
नसतीं. ॥ २८५ ॥
ऐसा पाहतां विचार । पशुपक्षियां समान विहार ।
निद्रा, मैथुन, आहार, । पशूंस तैसे मनुष्यांसही. ॥ २८६ ॥
एवं भजन सर्वेश्वराचें । करिती, त्यांचें मनुष्यत्व साचें ।
म्हणूनि वाक्य भगवंताचें । कीं, 'माझ्या मार्गी वर्तती
मनुष्य सर्व' ॥ २८७ ॥
—अध्याय ४.

(८) पुत्र जाला तरुण । तो बरा जाणे पित्याचे गुण; ।
बाळ नेणे, म्हणूनि करुण । काय उणें पाहे तयातें ? ॥ १६००
भक्त अपक्व असला जरी । पक्वापरिस ओझें त्याचें मजवरी ।
त्याची सर्व चिंता ती श्रीहरी । अगा ! अर्जुना करितसे . ॥१६०१
जो पक्वचि जाला, । म्यां काय संभाळावें तयाला ? ।
क्षणमात्र न स्फुरे जयाला । द्वैत कांहीं. ॥ १६०२
पक्षहीन बाळ । पक्षी त्याचाच करिती संभाळ ।
देखोनि त्याचा परिपक्वकाळ । निश्चिंत असती. ॥ १६०३
—अध्याय १२.

(९) "तूं कृष्ण सखा आपला । देवा ! इतुकेंच ठावुकें मला ।
हा तुझा महिमा नाहीं कळला । मानिला सखाचि म्हणोनी.॥७६२
मर्कट मुक्ताफळें नेणे । दातें रगडी मानूनि चणे ।
तैसा मी" अर्जुन म्हणे, । "सखा मानुनी बोलिलों तुजसीं.॥७६३
कल्पवृक्षाचा नागर । करूं पाहे हलधर ।
म्यां मानिला तूं सर्वेश्वर । सखा प्राकृतपुरुषदृष्टीनें. ॥ ७६४
न कळतां परिसाचा गुण । टांक आठरा भार खूण ।
जोख पाव शेर मानूनि, लवण । विकूं लागला भरें तयाच्या॥७६५
कामधेनूचिया कांसे । गोचीड आवडी तृप्ति होतसे ।
तेचि उपमा मज दिसे । सुख पावलों सखा प्राकृत मानुनी. ॥७६६
दांडगियास चिंतामणी । सांपडला तो घालून गोफणीं ।
शेत संरक्षी, तसा मी चक्रपाणी । प्राकृत सखा मानिला! ॥७६७

ज्या ज्या नामाचा प्रताप । निववी नाशुनी तिन्ही ताप ।
तो संतांचा मायबाप । प्राकृत सखा म्यां मानिला. ॥ ७६९

अमृत मानूनि पाणी । मूढ शिंपी आंगणीं ।
अनादि सखा चक्रपाणी । प्राकृत सखा मानिला ! ॥ ७७२

प्राकृत सखा मानुनी । 'अरे कृष्णा ! अरे यादवा !' म्हणोनि ।
'अरे सख्या ! अरे गड्या !' ये रीतीं करोनी । वेडें वांकुडेंही मी वदलों. ॥ ७७३ ॥

—अध्याय ११

(१०) प्रारब्धाशीं करी हट । तो वायांच जाय निपट ।
कीं ईश्वरशक्तींकरून उत्कट । बळ प्रबळ प्रारब्धाचें ॥ २२६१ ॥

तीव्र प्रवाहीं पडे । पोहणार पोहे प्रवाहाचकडे ।
तरी तो पोहणार न बुडे । हळुहळू लागे तीरातें. ॥ २२६३ ॥

जो पोहे उफराटा । त्याच्या तोंडांत भरती लाटा ।
जरी पोहणार मोठा धाटा । होय कष्टी बहु फार ॥ २२६४ ॥

मग तें पोहणेंही विसरे । जेव्हां पोटीं पाणी शिरे ।
तैसा ज्ञाना अनुभवी विसरे । हटें प्रारब्धासीं मोडतां ॥ २२६० ॥

राजाज्ञा वंदी शिरीं । त्याचमध्यें पोटभरी ।
तो सुखी अन्यथा वर्ते तरी । थितें जीवित्व अंतरे. ॥ २२६६ ॥

—अध्याय १८.

इतके उतारे पुरे झाले. या व पुढें प्रसंगोपात्त येणाऱ्या उताऱ्यांवरून पंडितांच्या भाषाशैलीविषयीं आम्हीं जें वर लिहिलें आहे त्याची सत्यता वाचकांच्या अनुभवाला येईल. पंडितांची चतुरस्रता, जबर निरीक्षणशक्ति, व्यवहारज्ञान, विशाल अनुभव हींही यांत बिंबलीं आहेत. वसंताच्या अमदानींत उद्यानभूमीमध्यें झाडांवर शोभणाऱ्या फुलांचे घोंस व त्यांखालीं पसरलेला फुलांचा पेर ज्याप्रमाणें अत्यंत मोहक वाटतो, तद्वत् यथार्थदीपिकेंत इतस्ततः पसरलेले अशा प्रकारचे उत्कृष्ट रचनेचे शेंकडों नमुने मनाला अगदीं दंग करून टाकतात. तरी पण हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, दीपिका रचण्यांत पंडितांचा हेतु काव्य निष्पन्न करण्याचा नव्हता, तर भगवद्गीतेच खरा खरा अर्थ प्रकट करून, लोकांना ज्ञानयुक्त भक्तीचा मार्ग निभ्रांत रीतीनें दाखवावयाचा होता. तेव्हां हा आद्य हेतु असल्यामुळें आपल्या

काव्यस्फूर्तीला पूर्ण वाव न देतां, अनेक वेळां त्यांना शब्दार्थावरच मल्लिनाथी करावी लागली आहे, यास त्यांचा नाइलाज होता. गीतेवर टीका करावयाची म्हणजे कांहीं नुसतें कानाला व मनाला गोड लागेल असें काव्य निर्माण करायचें नाहीं. काव्यदृष्टीनें एकादी टीका कितीही गोड असली, तरी जर ती भगवदुक्तीचा यथार्थ आशय प्रकट करीत नसेल, तर ती पंडित टाकावूच ठरवितात. ऐकायला अत्यंत गोड व रसाळ, पण भगवदुक्तींच्या संदर्भाशीं विसंगत असा अर्थ करणाऱ्या किंवा अनुचित दृष्टान्तांनीं त्यांची फोड करणाऱ्या टीकांविषयीं पंडित एके ठिकाणीं म्हणतात—

**भगवंत म्हणा वेडा । अथवा त्या टीकेची श्रद्धा सोडा ।**
**गीता सोडोनी व्यर्थ पवाडा । गोष्टींचा वाचणें, तरी वाचा गोड गोष्ट६९४**
**गीता जाते पश्चिमेकडे । टीका चढे पूर्व दिशा पर्वताचे कडे ।**
**दोहींस हात लाविती बापुडे । अर्थ सांपडे कैंवि तयां ? ॥ ६९९ ॥**

—अध्याय ९

मनोरंजनार्थ सुंदर काव्य करण्याचा यथार्थदीपिकाकारांचा हेतुच नव्हता. भगवदुक्तीचा खरा खरा अर्थ लोकांना अगदीं स्पष्ट करून सांगण्याचेंच त्यांनीं कांकण बांधल्यामुळें, त्यांनीं कल्पनेच्या उड्यांना फारसा वाव दिलेला नाहीं. प्रत्येक दृष्टान्त, रूपक, उपमा, हीं केवळ अर्थ व्यक्त करण्याच्याच उद्देशानें योजिलीं असल्यामुळें, पंडितांनीं त्यांचीं अगदीं फोड करून टाकिली आहे. कोणतीही गोष्ट जराशी गुलदस्तांत ठेवून वाचकांच्या कल्पनाशक्तीस वावरण्यास बिंदुमात्रही जागा ठेविलेली नाहीं. नेहमीं अनुभवास येणाऱ्या गोष्टी व मूर्तपदार्थ यांविषयींच सर्व दृष्टान्त वगैरे आहेत. केवळ कल्पनागम्य, अमूर्त किंवा अपरिचित उपमादृष्टान्तादिकांनीं वाचकांच्या मनोवृत्ति व जिज्ञासा या चाळविल्या जातात व ग्रंथांत एक प्रकारची विलक्षण जादू उत्पन्न होते. केवळ आभासानेंच मन आनंदांत पोहूं लागतें. पण जादूगाराच्या खेळांत जशी प्रेक्षकांची, तशीच अशा तऱ्हेच्या मनमोहन ग्रंथांत वाचकांची कल्पना स्वैर भरारूं लागते व यथार्थज्ञानाला वारंवार एक प्रकारची सांदग्धता व भ्रामकता येऊं लागते. काव्याचें जीवन व मर्म

तें हेंच आहे. परंतु पंडितांना काव्य रचावयाचें नव्हतें, किंवा केवळ कल्पनागम्य गोष्टींनीं वाचकांना भ्रमवून त्यांचें चित्तरंजन करावयाचें नव्हतें. हाच पंडित व ज्ञानेश्वर यांतील मुख्य भेद आहे. भावार्थदीपिका काव्यमय आहे, तर यथार्थदीपिका ज्ञानमय आहे. एकीचा विहार जर उच्च व विरळ वातावरणांत, तर दुसरीचा सखल व घन वातावरणांत; एक पदार्थांस अस्पष्ट पण मोहक रंग देणारी चंद्रिका, तर दुसरी प्रत्येक पदार्थ स्पष्ट व वास्तवस्वरूपानें प्रकट करणारी रविप्रभा; पहिली मनाला चकित करिते, तर दुसरी त्यास शहाणें करिते; पहिलीनें मनाला चमत्कार वाटतो, तर दुसरीनें त्याला समाधान प्राप्त होतें पुढील उतारे वाचले म्हणजे वरील विवेचनाचा वाचकांस प्रत्यय येईल अशी उमेद आहे:--

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥

—गीता, अ. १२ श्लोक १३.

जो सर्व भूतांच्या ठायीं । द्वेषातें नेणेचि कांहीं ॥
आपपर नाहीं । चैतन्या जैसा. ॥ १४४

उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे ।
हें कांहींच नेणिजे । वसुधा जेवीं. ॥ १४५

का रायाचें देह चाळूं । रंका परौतें गाळूं
हें न म्हणेचि कृपाळू । प्राण पैं गा ! ॥ १४६

गाईची तृषा हरूं । व्याघ्रा विष होऊन मारूं ।
ऐसें नेणेचि गा करूं । तोय जैसें. ॥ १६७

तैसी आघवियांची भूतमात्रीं । एकपणें जया मैत्री ।
कृपेसी धात्री । आपण जो. ॥ १४८

आणि 'मी' हे भाष नेणे । माझें कांहींच न म्हणे ।
सुख दुःख जाणणें । नाहीं जया. ॥ १४९

तेवींचि क्षमेलागीं । पृथ्वीसि पवाड अंगीं ।
संतोषा उत्संगीं । दिधलें घर. ॥ १५०

—भावार्थदीपिका.

अगा! सर्व भूतीं तया । द्वेष नाहीं धनंजया! ।
शांति सर्वात्मक ध्यानीं जया । द्वेष कोठें तया उपजेल? ॥ १४०४

कोणी वाईटसा वाटे । तरी मन धांवे द्वेषाचिया वाटे ।
सर्वत्र भगवद्भाव पोटीं वाटे । द्वेष कोठें तया उपजेल ? ॥ १४०५
आत्मा आपला नित्य प्रिय । तोचि सर्वभूतें जाला अद्वय ।
तो कोणासही जरी वाटता अप्रिय । तरी ज्ञानियास द्वेष कोठें
तरी उपजता. ॥ १४०६
भगवद्रूप सर्व सृष्टी । ध्यान करितां बिंबली दृष्टीं ।
सर्वात्मकत्वीं ज्यांस तुष्टी । ते द्वेष करिती कोणाचा ? ॥ १४०७
गूळ आवडे ज्याला । त्यास नावडे कोण भेला ? ।
चाखतां जो तो जिभेला । गोडचि लागे. ॥ १४०८
ज्यास पाहिजे सुवर्ण । त्याज्य त्यास नग कवण ? ।
जिव्हेस उदकपण । न वाटे कोणे गारेनें ? ॥ १४०९
अमृतसिंधूची लहरी । कोणती अमर न करी ।
ज्यास आत्मा उघडा चराचरीं । तो द्वेष करील कोणाचा ?॥१४१०
कीं द्वेषवर्जित सर्वत्र । त्यांत मोक्षाधिकारियांचा मैत्र ।
उरलीं भूतें तीं कृपापात्र । भगवद्भावेंकरूनी ॥ १४१४
जो मोक्षाधिकारी । त्यास संसारसागरीं तारी ।
मित्रत्व त्यासारखें कोण करी ? । म्हणूनी मैत्र वाटे मुमुक्षूंतें॥१४१५
यास सर्व सम । कीं शत्रु, मित्र दोघेही पुरुषोत्तम ।
परंतु ज्याला तारी, त्यास परम । मित्रत्व वाटतें तयातें. ॥ १४१६
काया वाचा मानसा । सर्वभूतीं जगन्निवासा ।
संतुष्ट करी ऐसा । करुण अत्यंत. ॥ १४१८
हें माझें म्हणोनी । जो स्त्रीपुत्रादि आपुलीं मानी ।
त्यावेगळीं चराचरें भूतें त्रिभुवनीं । पारकीं
वाटती तयाला ॥ १४२०
स्त्री एक अथवा पुत्र । आपलीं म्हणतां इतकींच मात्र ।
भूतसृष्टि अवघी विचित्र । ईश्वरासहित पारखी ॥१४२१
ओंगळ ऐसी ममता । मूळ तीस ही अहंता ।
ज्या अहंतेनें आत्मया अनंता । मानी सात विती शरीरमात्र.१४२२
म्हणतां मी एक देह, । उद्भवे देहसंबंधियांचा स्नेह, ।
माझी स्त्री, माझा पुत्र, माझें गेह, । म्हणूनि रंगी रंगे तयांच्या१४२३
त्यास पारखें विश्व सकळ । जो अहंते-ममतेनें व्याकुळ; ।
जो या दोंवेगळा निर्मळ । अद्वेष्टा मैत्र करुण तोचि
भूतमात्रीं. ॥ १४२४

कीं प्रारब्धें सुख आणि दुःखही । जीवन्मुक्त जाला तऱ्ही सुटणार नाहीं, ।
परि भोगितां, 'सुख हो आणि दुःख न हो' ऐसें कांहीं ।
न म्हणे, समदुःखसुख ये रीतीं ॥ १४९२

भोगकाळीं मीपण । वाटे हा पूर्व कर्मांचा गुण ।
कीं मी कर्ता ऐसें अहंस्फुरण । अज्ञदशेंत होतें जन्मांतरीं कर्मे करितां. ॥ १४९३

वारा राहिला विशाळ । परि वृक्षाचें हालणें न राहे तत्काळ ।
अहंता गेली तरी भोगकाळ । दावी अहंकार आहेसा. ॥ १४९८

जें ऐसें भोगीं अहंस्फुरण ! त्यास नाशक समपण ।
तो भोगातीतचि आपण । जो सुखदुःखीं सम ऐसा. ॥ १४९९

ज्वरादि अदृष्टकृत । तें भलता सोसी चावूनि दांत ।
हा ज्ञानी विवेकी अत्यंत । घाबिरा नव्हे, नवल नाहीं. ॥ १४८२
परंतु परकृत । दुःख वाटतां अत्यंत ।
क्रोध उपजे निश्चित । समदुःखसमता मग कैंची? १४८३

म्हणूनि म्हणे जगाचा स्वामी । अगा! अर्जुना! तो क्षमी ।
क्षमा ऐसी कीं, "सर्वही आत्माच मी । क्रोध कोणावरी करूं?" म्हणे. ॥ १४८४

एका हातें मक्षिका मारी । तों करतळ बळें लागे गालावरी, ।
तो दंड जरी हातातें करी, । तरी ज्ञानी कवणावरी क्रुद्ध होय?॥१४८५
आपला दांत आपली जिव्हा रगडी, । दुःख वाटे तरी काय दांत पाडी? ।
ज्यास सर्वांभूतीं आत्मत्वाची आवडी । क्रोध कोणावरी करील तो? ॥ १४८६

—यथार्थदीपिका.

पंडितांना आपल्या ज्ञानाची व पांडित्याची घमेंड होती; दुसऱ्याची अवहेलना करण्यांतच ते पुरुषार्थ मानीत; ते द्वैतवादी होते; संस्कृत भाषाच कायती बोलायची व लिहायची, पण मराठी म्हणजे केवळ अस्पर्श्यच असें त्यांना वाटत असे; त्यांचे संस्कृत ग्रंथ पुष्कळच आहेत; वगैरे अनेक दंतकथा या महापंडिताविषयीं लोकांत प्रचालित आहेत. पंडितांना द्वैतमार्गांतून परावृत्त करून, अद्वैताकडे व भक्तियोगाकडे वळविण्याचे आणि यांजकडून प्राकृतजनोद्धारार्थ प्राकृत रचना करविण्याचें श्रेय

रामदास स्वामींकडे देण्यांत येतं. या दंतकथांविषयीं अनेक शंका घेण्यासारख्या आहेत. पण त्यांविषयीं पुढें विस्तृतपणें विचार करण्यांत येणार आहे, तव्हां येथें इतकेंच सांगतों कीं, मराठीचे कट्टे अभिमानी जे मोरोपंत यांचीसुद्धां संस्कृत कृति पंडितांच्या संस्कृत कृतीपेक्षां अधिक आहे. पंडितांचे एक दोनच संस्कृत ग्रंथ उपलब्ध आहेत, परंतु त्यांत त्यांनीं संस्कृताविषयीं आढ्यता किंवा प्राकृताविषयीं तिरस्कार प्रकट केलेला आढळत नाहीं. पंडित द्वैतमार्गी होते, असेंही त्यांच्या ग्रंथांवरून आढळून येत नाहीं; उलट द्वैतवादानें समाधान होत नाहीं, म्हणून आपण अनेक गुरू केले, अद्वैततत्त्वाचा अनुभवयुक्त बोध व्हावा म्हणून अनेक संस्कृत व प्राकृत ग्रंथांच परिशीलन केलें, पण सर्व निष्फळ गेलें; अखेर मलयपर्वतावर सच्चिदानंदयतिरूपानें भेट देऊन, ईश्वरानें उपदेश केला, तेव्हांच समाधान झालें व अद्वैत आणि सगुणभक्ति यांचें खरें खरें ज्ञान प्रत्ययास आलें, असें पंडितांनींच आपल्या एका * संस्कृत ग्रथांत स्पष्ट सांगितलें आहे. रामदासस्वामींचा पंडितांनीं कोणत्याही ग्रंथांत उल्लेख केला नाहीं, निदान अद्वैतरहस्य व सगुणभक्ति यांचा उपदेश समर्थांकडून झाला असता, तर त्याचा उल्लेख न करितां, सच्चिदानंद यतीचा बनावट काहणी सांगण्याइतका अधमपणा पंडितांच्या अंगीं होता, असें आमचें मन मानूं शकत नाहीं; पंडितांना षट्शास्त्रें व अठरा पुराणें केवळ हातचा मळ होतीं; तरी पण ते महान् भगवद्भक्त होते. भगवद्भजनाला कोणतीही भाषा चालते, संस्कृतांतच कांहीं जास्त आहे असें नाहीं, असेंच वामनपंडितांचें मत होतें. पंडितजन अभिमानानें व दुराग्रहानें बुडाले आहेत, असें ते स्पष्ट म्हणतात. गीतेवरील टीकेंत अगदीं सुलभ शब्द वापरावयाचे, अर्थ स्पष्ट करावयाचा, अगडबंब संस्कृत शब्द किंवा समास योजावयाचे नाहींत, हा पंडितांचा बाणाच होता, व तो त्यांनीं अगदीं कसोशीनें पाळला आहे. जे जे म्हणून भगवद्भक्त होते, त्यां त्यांविषयीं पंडितांना फार फार आदर व अभिमान वाटत असे. बरोबरच आहे, भक्तीपुढें संस्कृत व प्राकृत यांमधील भेदभाव कोठें टिकणार? यांसंबंधानें यथार्थदीपिके-

---

* अनुभूतिलेश, श्लोक १-२, १३३-१४९, ३२४-३२९ पद्य.

तील पुढील लांब उतारा, फारच महत्त्वाचा असल्यामुळें, तो सबंध सादर करितों.:—

जी जी देवाधिदेवा! । प्राकृत भाषेकरितां तुझी सेवा ।
वेदवाणीस उपजे हेवा । तुझ्या स्वरूपाचा ठेवा जीमाजी. ॥ १०

मुख्य तुझें नाम गोड । मुखीं सर्व भाषांचें कोड, ।
जें कानीं मुखीं येतां, मोड । देहीं उपजती प्रेमाचे! ॥ ११

काय वेदशास्त्र जाणे व्रज? । त्याची भक्ति देखोनि, आत्मज ।
ब्रह्मा वेदवक्ता शिरीं पदरज । वंदी व्रजनारीजनाचें! ॥ १२

गजेन्द्र कोण शास्त्र पढला? । बाळ कोण्या पांडित्यें ध्रुवपदा चढला?।
दासी कुब्जा तिला घडला । काय अभ्यास संस्कृताचा? ॥ १३

व्रजीं चारितां गायी । कुचकुंकुमें गोपिकांचीं पायीं ।
तदंकित म्हणे कृतार्थ ठायींठायीं,। वल्लवस्त्रिया पढलिया त्या काय?॥१४

अभिमानें बुडाले पंडित, । यज्ञपत्न्यांनीं अर्चितां वैकुंठमंडित ।
न पढतां, न वाचितां अखंडित । आनंद भक्तीनें पावल्या. ॥ १५

भक्ति थोर, भक्ति थोर; । तूं चंद्रमा, भक्त चकोर; ।
भक्त मयूर, मेघश्याम समोर । त्यांस तूं सर्वत्रही. ॥ १६

एवं पावावया तुझे चरण, । भाषा कोणी नव्हे कारण; ।
कारण सप्रेम अंतःकरण । देवाधिदेवा! ॥ १७

जैसें भजनास कारण नव्हे वित्त, । मुख्य सादर असावें चित्त, ।
तथापि वित्तवंत वेंचिती यानिमित्त, । कीं अन्यथा वित्तशाठ्य लागेल. ॥ १८

मंगलाचरण म्हणोनी । करितों देवा! संस्कृतेंकरोनी; ।
कोणी अर्थीं दृष्टीही नेदुनी । मुखें उगेचि वाचोत. ॥ १९

जेथोनि टीकेचा आरंभ । तेथोनि गीतार्थ तो स्वयंभ ।
तो होय अत्यंत सुलभ । शब्द ऐसे योजितों. ॥ २०

—अध्याय ४

यथार्थदीपिका रचण्याचा हेतु पंडितांनीं पहिल्या अध्यायांत स्पष्ट सांगितला आहे. निरानिराळे मतवादी आपापल्या मतांस अनुकूल असा गीतेचा अर्थ करीत असत; त्यामुळ अर्थाचा अनर्थ होऊन सर्वच चुथडा झाला होता तो मोडून, गीतेचा खरा अर्थ प्रकट करण्याकरितां या

दीपिकेचा अवतार झाला. पंडितांचा निर्गुणवाद्यांवर फारच कटाक्ष होता. एकदा अद्वैत करून निर्गुण साक्षात्कार झाल्यावर सगुणभक्तीचें प्रयोजनच नाहीं, हें निर्गुणवाद्यांचें प्रमेय, व ते स्वमतानुसार गीतावचनांचा अर्थ लावीत. यावर पंडित इतकेंच म्हणतात कीं, ज्याला रुचेल व साधेल त्यानें केवळ निर्गुणचिंतनानें मोक्ष गांठावा, परंतु गीतेंत जेथें तेथें सगुणभक्तीच उपदेशिली आहे. तेव्हां निर्गुणवाद्यांनीं भगवद्वचनांचा विपर्यास करून आपल्या मतांचें मंडण करण्याच्या भरीस पडूं नये. निर्गुणचिंतनापेक्षां ज्ञानयुक्त सगुणभक्ति हाच मोक्षसाधानाचा सोपा व अधिक श्रेयस्कर मार्ग आहे. निर्गुणज्ञानाचें सगुणभक्तीनें दृढीकरण करावें असें गीता म्हणते. चार्वाकाचें नास्तिक मत खोडून काढण्यासाठीं गौतमानें तर्कशास्त्र काढलें. पण निर्गुणवाद्यांनीं त्या तर्कशास्त्राचा आश्रय करून ज्ञानयुक्त सगुणभक्तीवर प्रहार करणें अत्यंत अश्लाघ्य आहे. वस्तुतः गौतमाचे सिद्धान्त व अद्वैत यांत फरक नाहीं, आणि अद्वैताला सगुणभक्तीनें बाध येत नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यास उलट दृढता येते:—

**दुःख बीजें एकवीस । गौतम म्हणे त्यांचा ध्वंस ।**
**तोचि मोक्ष, तरी हे परमहंस । अद्वैतानुभवीही मानिती. ॥ ८७**

**जीवांस अखंड ब्रह्मत्व । ब्रह्मचि मोक्षसुख हें तत्व ।**
**दुःखनाशें मुक्तत्व । अद्वैतसिद्धांतही ऐसा. ॥ ८८**

**एवं अंतरीं अद्वैत । बहिरंग कार्यार्थ धरिलें द्वैत ।**
**अगत्य वेद विरुद्ध मत । खंडावया. ॥ ८९**

**परी हे नेणती लोक । गोड वाटती गौतमतर्क ।**
**म्हणुनी ते अद्वैतार्क । न पाहती, झाले दिवांध. ॥ ९०**

**कळलियाही निर्गुण । मागुती भजावा सगुण ।**
**ऐसें बोलतां ते तर्कनिपुण । हांसती शास्त्रासी. ॥ ९२**

**आतां सांगावें त्यांस सार । कीं कळलें जरी निर्विकार ।**
**तरी मन झालें पाहिजे तदाकार । या निमित्तें सेव्य गुरुदेव. ॥ ९४**

**साखरेच्या औषधीं । रोगनिवृत्तीचीच अवधी ।**
**गोड म्हणूनी निरोगीही कधीं । न सोडी साकर ॥ १००**

अमर झाले अमर । तरी पीती अमृत सादर ।
न सांगतांही हा प्रकार । जीवन्मुक्त करितील. ॥ १०१

सगुणाची अद्वैतभक्ति । करितां, पूर्वील विषयविरक्ति ।
दृढ होतां, होय मुक्ति । हें शब्दज्ञानी नेणती. ॥ १०६

पिसाटाच्या करीं कोलित । तैसें त्यांस शास्त्रसंमत ।
परी त्यांचा अंतरंगसिद्धांत । न कळे त्यांला. ॥ १०७

पशूंस पाजावया पाणी । वडिलीं कूप खारवणी ।
केला, म्हणोनी गोडवणी । न प्यावें काय? ॥ १०८

असो ते प्रस्तुत शास्त्रवाणी । ऐशी अर्जी चक्रपाणी! ।
परी मी न पीं तें क्षार पाणी । वडिलीं केलें म्हणोनी. ॥ १०९

भवद्रुमातें छेदी शस्त्र । ऐसें तुझें गीताशास्त्र ।
त्याची दाविती पाठमात्र । धार लपविती ये रीतीं. ॥ ११०

खड्गास मुख्य पाणी । तैशी भक्तिपर तुझी वाणी ।
गीतेच्या अंतीं चक्रपाणि! । ऐसेंचि बोललासी. ॥ १११.

—अध्याय १ ला.

ज्ञानयुक्त सगुणभक्तीचा द्वेष करणाऱ्या व भगवद्वचनें पिळून स्वतःला अनुकूल असा अर्थ त्यांतून गाळूं पाहणाऱ्या निर्गुणाभिमान्यांवर पंडितांनीं जेथें तेथें अशा तऱ्हेचे कोरडे ओढले आहेत. उदाहरणार्थ ११।१०२९–५३; ११।११३८–४४; १२।९६–२२५; ९।६७३–८३; ४।१७६–८७; १२।२६७–७२; १२।१८००–१८४१; १८।२८७० –२९९२; १८।३०४३–३०४५; ४।४००–४०६; ३।५०१–६; इत्यादि स्थळें पहावीं.

भगवद्गीतेंत ज्ञानयुक्त भक्तीचें गौरव अथपासून इतीपर्यंत आहे, असें पंडित वारंवार कंठरवानें सांगत आहेत.

(१) आणि भगवंता! तुझें मत । कीं निर्गुणात्मक अद्वैत ।
कळोनि माझे चरणीं रत । भक्त सकळांत तो थोर. ॥ ७६

—अध्याय १ ला.

(२) एवंच समग्र गीताशास्त्र । नव्हे सगुणभक्तिहीनाचें व्याख्यानपात्र ।
हाचि एक अध्यायमात्र । काय नव्हे म्हणावा? ॥ १७८४

हा अध्याय ज्या पोटीं । त्या गीतेचिया शेवटीं ।
कृष्ण म्हणे अगा! किरीटी । हा संवाद माझा तुझा धर्म्य ॥ १७८९

अतएव भक्ति थोर करूनी । ज्ञानयुक्त भक्ति थोर म्हणोनी ।
जो गीतार्थ वदेल त्यातुल्य त्रिभुवनीं । प्रिय नव्हे कोणी ऐसें बोलेल. ॥ १७८६

—अध्याय १२ वा.

( ३ ) तुसत्या ज्ञानाहुनी । ज्ञानयुक्त भक्ति श्रेष्ठ म्हणोनी ।
या गीतेंत भक्तीच थोर म्हणोनी । भगवंत वदे. ॥ १९३

—अध्याय १२ वा.

( ४ ) वेद वेदांत पांडित्य । हेंचि कीं अद्वैत सत्य ।
आणि सगुणभक्ति हेंचि कृत्य । मनुष्यदेहीं. ॥ ११११

—अध्याय १५ वा.

( ५ ) अतएव या भगवद्गीतेंत । ज्ञानी आणि भक्त तोचि थोर म्हणतो अत्यंत ।
एवं उत्तम भक्त तोचि जो भागवत । भगवद्रूप जग आपणांमध्यें पाहतो. ॥ १८७१

—अध्याय १८ वा.

अशा प्रकारचे असंख्य उल्लेख ज्ञानयुक्त भक्तीसंबंधें दीपिकेंत आढळतात. अंधभक्ति किंवा अद्वैतज्ञानरहित भक्ति मात्र मोक्ष देणारी नव्हे. द्वैतभाव ठेवून जी भक्ती करण्यांत येते, ती पशुतुल्य होय.

दोहींत केवळ सगुणवादी । त्यांची निष्ठा अखंड भेदीं ।
जयांचें भजन वर्णिलें वेदीं । पशुतुल्य. ॥ ७०

—अध्याय १.

एवं दिव्य भगवद्भजनकर्म । हें आत्मज्ञानाविणें न कळे वर्म ।
यास म्हणा रे! भागवतधर्म । कीं ज्ञानें श्रवण कीर्तन सगुणाचें ॥ २२९

—अध्याय ४.

तरी तो सिद्धांतविरुद्ध । जेव्हां हे भक्त न म्हणावे ज्ञानी शुद्ध ।
सर्वांत थोर ज्ञानी प्रबुद्ध । अज्ञ त्यांपरिस श्रेष्ठ आणि संमत न म्हणावे. ॥ १८९

विरुद्ध बोले नारायण । तरी त्याचें वचन केवीं प्रमाण ? ।
त्याची टीका करावयाचेंचि कारण । मग कैचें ? ॥ १९०

ज्ञानियापरिस अज्ञ भक्त । थोर म्हणणें तों सर्वथा अयुक्त ।
यालागीं 'योगवेत्ते अधिक कोण' हें अर्जुनोक्त । वचन ज्ञानयोग
दोहीं पक्षांचा सूचवी हें सत्य. ॥ १९१

—अध्याय १२.

ज्ञानहीन भक्तीनें पुण्य संग्रहीं पडून, त्याचें फल जें सुख तें प्राप्त होईल. परंतु पुण्य सरतांच पुन्हां 'ये रे माझ्या मागल्या' असा प्रकार सुरू होणार. ज्ञानहीन भक्तीनें अढळ मोक्षपद मिळणार नाहीं; तत्प्राप्तीस्तव अद्वैतज्ञान व सगुणभक्ती यांचा मिलाफ झाला पाहिजे. यावरून पंडितांचा भागवतधर्म व पंढरींच्या वारकऱ्यांचा भागवतधर्म यांतील भेद लक्ष्यांत येईल. निव्वळ भक्ती ही ब्रह्मीभूत होण्याचा मार्ग नव्हे. ज्ञानावांचून भक्ति पंगू होय अशी भगवद्वाणी आहे.

हठयोगादिकांनींही मुक्तिलाभ होऊं शकत नाहीं, असें पंडितांचें मत असे. ज्ञानावांचून व भक्तीवांचून हठयोग फुकट आहे.

ज्ञानावांचूनि मोक्ष नसे । सर्व वेद म्हणती ऐसें ।
अविद्या आवरण असोनि कैसे । हठयोगी मोक्ष पावती ? ॥ ९२९

हठयोगियांचें अमृतत्व । तो मोक्ष नव्हे, जाणावें अमरत्व ।
वेदांतियाचें बोलणें तत्त्व । अमृतत्वशब्दें. ॥ ९३०

आतां हठयोगी मृत्यूपासुनी सुटती । ज्ञानयोगी मुक्ति पावती ।
ऐसें बोलतां, न तुटती । विवाद अन्योन्य. ॥ ९३१

'सुटले मृत्यूपासोनी । ते मुक्त झालेच' म्हणोनी ।
ऐसा श्रुतीचा आश्रय करोनी । स्वमत स्थापिती पुन्हाही योगी. ॥९३२

या कारणें श्रुती । विद्या अविद्या दोहींच्या गती ।
एकाच पुरुषाच्या वर्णितां तोडिती । वाद दोहीं मतांचा. ॥ ९३३

कीं विद्या एक, अविद्या एक । दोन्ही जाणे जो साधक ।
अविद्येनें तरूनि मृत्यूचा पंक । विद्येनें अमृतत्व अनुभवी. ॥ ९३४

एवं मृत्यू तरला तरी कांहीं । मोक्ष तोंपर्यंत नाहीं ।
कीं ब्रह्मविद्येनें नरदेहीं । जों स्वरूप नाहीं ओळखिलें. ॥ ९३५

एवं हठयोगें मरण । तरोनिही, मोक्षाचें कारण ।
ब्रह्मविद्याच, तीविण । मोक्ष नव्हे. ॥ १४१

—अध्याय ४.

त्याच मताचा अनुवाद पुढें पंडितांनीं अनेक वेळां केला आहे. विशेषतः आठव्या अध्यायांतील २४–२५ व साहाव्या अध्यायांतील १२–१७ या श्लोकांवरील टीका अवश्य वाचण्यासारखी आहे. तेव्हां या निरनिराळ्या वादींच्या अभिमानरोगावर भगवदुक्तीच्या यथार्थ-मात्रेचे वळसे देऊन त्यांचा भ्रम उतरण्यासाठींच पंडितांनीं हें दीपिका-रसायन तयार केलें. शिवाय कित्येक ज्ञाननिष्ठ भागवतांनाही गीतेवर टीका करितांना कितीएक महत्वाच्या शब्दांचा अर्थ न करून, त्यांनीं त्यां-विषयीं मुग्धता स्वीकारली आहे किंवा कांहीं तरी लटपटपंची करून वेळ मारून नेली आहे, हीही गोष्ट पंडितांच्या ध्यानांत आली होती. उदाहरणार्थ, भगवंतांनीं आपला अर्जुनाशीं झालेला संवाद वर्णीत असतांना वारंवार 'धर्म्य' पद योजिलें आहे.—

प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् । ९।२
ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते । १२।२०
अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः । १८।७०

तेव्हां पंडित म्हणतातः—

एवं ऐसें 'धर्म्य' पद । भगवान् बोले प्रतिपद ।
याचा अर्थ विशद । न बोलती कोणी. ॥ १२८
निर्धर्म म्हणजे निर्गुण । सधर्म म्हणजे सगुण ।
'धर्म्य' पदें दावी खूण । विश्वात्मज्ञानाची. ॥१२९
पुढें होईल विशद । जें जें ठायीं 'धर्म्य' पद ।
हें मंगलाचरणीं कृष्णपद । स्मरतां आठवे समग्र गीता. ॥ १३०
या कारणें जी भगवंता ! । यथास्थित हे तुझी गीता ।
वाखाणावी म्हणूनि होता । बहुत काळ संकल्प. ॥ १३१

—अध्याय १

हल्लीं ज्याप्रमाणें आपल्या धर्मग्रंथांत लटपट्या ब्राह्मणांनीं स्वकृत श्लोकांची भेसळ करून त्या ग्रंथांची घाण करून टाकिली आहे, अशी

कित्येक समंजस चिकित्सक लोकांना जबरदस्त शंका आली आहे, त्याप्रमाणें तीच शंका अडीचशें वर्षांपूर्वी वामन पंडितांनाही आली होती. गीता व वेद हेच कायते प्रामाण्यग्रंथ आहेत असें त्यांचें मत होतें. यांतील प्रमेयांना पुष्टि देण्यासाठीं पाहिजे तर स्मृति व पुराणें यांतील आधार द्यावे. परंतु जर स्मृतिवचनें व पुराणवचनें गीतावचनाशीं किंवा वेदवचनाशीं विरोध करितील, तर तींच वचनें विश्वासास अपात्र, असत्य व त्याज्य म्हणून समजावीं, असें त्यांनीं आपलें मत कोणाचीही भीडमुर्वत न धारेतां स्पष्टपणें नमूद केलें आहे. दहाव्या अध्यायांत श्रीकृष्ण हाच परब्रह्म परंधाम होय, हें सिद्ध करीत असतां, पंडित म्हणतात:—

हें वचन स्वयें त्या अर्जुनाचें, । आणि हें शास्त्र भारत, पंचम वेद नाम ज्याचें ।
आणि हें जगद्वंद्य उपनिषत्सार साचें । श्रीमद्भगवद्गीता पाठ सर्वत्र लोकांस ॥ ४८८

तेथें ऐसा निर्णय । आदिदेव जगत्कारण अद्वय ।
तो हा श्रीकृष्णचि ऐसा निश्चय । इतकियापरी या गीतेंत. ॥ ४८९

इतर पुराणीं व्यासवैखरी । सन्मार्गीं लावावया अनधिकारी ।
ज्यास त्यास थोर म्हणे परी । सिद्धान्त ऐसा व्यासाचा. ॥ ४९०

आणि शंका इतरां पुराणीं । कीं मतकर्ते आपणास इष्ट तैसी स्ववाणी ।
पुराणश्लोकीं मेळवोनि घाणी । केली सकल पुस्तकांची. ॥ ४९१

पुरातन श्लोक काढिती । स्वकृत श्लोक घालिती ।
सभेंत पुस्तकें काढूनि दाविती । प्रमाणें स्वकल्पितें. ॥ ४९२

वेद आणि हे भगवद्गीता । सर्वत्र पाठ पुण्यवंतां ।
म्हणोनी येथें काढितां घालितां । न फावे कुमत तस्करातें. ॥ ४९३

—अध्याय १०

याच गोष्टीचा पंडितांनीं पुढें चवदाव्या, सोळाव्या व अठराव्या अध्यायांत अनुवाद केला आहे:—

( १ ) गीता पुराणें ये रीतीं । एकवाक्यता पावती ।
तत्रापि गीता उपदेशी श्रीपती । सार सर्वां उपनिषदांचें.॥२०३

पुराणां सर्वांहुनी । श्रेष्ठ भारत म्हणुनि ।
प्रसिद्ध त्यांत विशेषेंकरूनी । भगवद्वचनपीयूष हे गीता. ॥२०४

यापुढें गोष्टी सकळा । बोलतां पावती अवकळा ।
कीं उगवतां भानु सगळा । गतप्रभ होती नक्षत्रें. ॥ २०५

पुराणीं जे जे विरोध । त्यांचा बरा करितां शोध ।
सिद्धान्त ऐसा म्हणूनि होय बोध । बहु पुण्यें करोनी. ॥ २०६

—अध्याय १४.

(२) आतां 'ममैवांशो जीव'। पंचदशीं बोले देव ।
तेथें भेदवादी काढिती भाव । भिन्नांश म्हणोनी ॥ २७४ ॥

त्यास कल्पित वचन । एक दाविती नवीन ।
कीं मत्स्यादि अवतार अभिन्न । जीव भिन्नांश म्हणूनी ॥ २७५ ॥

कल्पूनि कल्पित वाणी । हें म्हणती आहे पुराणीं ।
दाटून कल्पित काहाणी । बोलती वेदास, गीतेस, युक्तीसही विरुद्ध ॥ २७६ ॥

—अध्याय १६.

(३) जरी बोले ऐसें पुराण । तथापि त्यांच्या मुखीं तें अप्रमाण ।
कीं ते कल्पितश्रुति करिती निर्माण । त्या वेदपाठकांस पुसतांच उडती ॥ २८८ ॥

पुराणें पाठ नसती । त्यांत वेदास गीतेस जीं न मिळती ।
तीं अप्रमाणें वाटती । कीं काडीचोर तो पाडी चोर ॥ २८९ ॥

गीता पाठ सर्वत्र । तैशाच वेदांच्या शाखा मात्र ।
यांत त्यांची वाणी अपवित्र । रिघों न शके ॥ २९० ॥

पुराणें पुस्तकींच असती । त्यांत त्यांच्या कल्पना नाचती ।
नवे श्लोक निर्मुनी घालिती । काढिती श्लोक व्यासाचे ॥२९१॥

—अध्याय १७.

(४) आतां 'संन्यस्य श्रवणं कुर्यात्' हे वेदवाणी । तरी तीचा अर्थ बोलतो चक्रपाणी ।
कीं, 'काम्य त्याग संन्यास;' आणि गांडीवपाणी । सुभद्रापती श्रोता गृहस्थ ॥ ११७ ॥

वेदान्तसूत्रकर्ता व्यास । वक्ता गीतेचा जगन्निवास ।
जो अधिकारी या श्रवणास । तोचि वेदांतश्रवणास अधिकारी ॥ ११८ ॥

गीतेस जें जें संमत । तें तेंचिं वेदांत मत ।
गीतानुरूप जो सिद्धान्त । तोचि वेदांत जाणावा ॥ ११९ ॥

—अध्याय १८.

पंडित हे एकंदरीत फार धोरणी, सारासारविचारी, कल्पक, निस्पृह, सत्याभिमानी व वाणीचे खंबीर असे होते. सत्याचें प्रतिपादन करितांना त्यांनीं कोणाचीही भीडभाड धरलेली दिसत नाहीं. आपले ग्रंथ कोणी वाचोत वा न वाचोत, दुसऱ्याच्या आराधनेसाठीं, लौकिकासाठीं किंवा लोकप्रियतेसाठीं सत्यास धाब्यावर बसवून दंभ किंवा मुग्धता स्वीकारावयाची नाहीं हा त्यांचा दृढ संकल्पच होता. सत्यनिष्ठेनें उचंबळून हा आपला बाणा पंडितांनीं अनेक ठिकाणीं स्पष्टपणें निर्दिष्ट केलेला आहे. गीते-मध्यें केवळ एकट्या भगवंताची अनन्य–अव्यभिचारिणी–भक्ति उपदे-शिलेली आहे. श्रीकृष्ण म्हणजे गीताकार हाच या भगवंताचा, परब्र-ह्माचा, परंधामाचा सर्वश्रेष्ठ ईश्वरोपाधियुक्त अवतार. ज्याला ज्याला म्हणून गीता पूर्णपणें समजली, त्याच्या त्याच्या अंतःकरणांत अद्वैत व श्रीकृष्णाविषयीं अव्यभिचारिणी सगुणभक्ति बाणलीच पाहिजे. सर्व जीवात्मे–हें सर्व विश्व–जरी एकाच परमात्म्याचे–एकाच चैतन्याचे–अंश आहेत, तरी त्यांत उपाधियोगानें उच्चनीचभाव उत्पन्न झालेला आहे. ज्यांना अद्वैतज्ञान प्राप्त झालें नाहीं, ज्यांना गीतेचा बोध झाला नाहीं, किंवा ज्यांना अव्यभिचारिणी सगुणभक्तीचें तत्त्व उमजलें नाहीं, त्यांनीं श्रीकृष्णाव्यतिरिक्त अनेक देवतांचें भजनपूजन केलें तर कांहीं तरी क्षम्य आहे; परंतु गीतार्थ ज्यांच्या चित्तांत पूर्णपणें बाणला आहे, जे प्राकृत जनांसाठीं गीतेवर टीका करण्याची महत्वाकांक्षा धरून आपल्या वाणीला चालवितात, त्यांनीं 'सर्वदेवान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वा सर्वपापेभ्यो मोचयिष्यामि तत्त्वतः ॥' असें असंदिग्ध वचन देणाऱ्या गीताकार परमात्म्या श्रीकृष्णाला सोडून, मंगलाचरणीं इतर देवांच्या भजनीं लागणें आणि पुन्हा अव्यभिचारिणी भक्तीचे गोडवे गाणें

यासारखें दुसरें अश्लाघ्य खूळच नाहीं, असें पंडित म्हणतात. गी.तेवरील टीकाकाराला मंगलाचरण करणें असेल तर श्रीकृष्णाचेंच केलें पाहिजे. ग्रंथार्पण करणें असेल तर तें श्रीकृष्णासच केलें पाहिजे. कारण त्याहून अधिक पराक्रमी, अधिक ईश्वरोपाधियुक्त, अधिक तेजस्वी व अधिक मंगल असें कोणतेंही सगुण दैवत असणें शक्य नाहीं. गीताटीकाकारांनीं कृष्णाशिवाय इतर क्षुद्र देवतांच्या भजनीं लीन होणें, म्हणजे आपल्या अज्ञानाची किंवा दंभाची टिमकीच वाजवणें आहे, भगवंताच्या उक्तीस हरताळ लाविणें आहे व श्रेष्ठ गुरूला सोडून क्षुद्र बटकींची सेवा करणेंच आहे असें पंडित समजतात. या एकंदर गोष्टींविषयीं यथार्थदीपिकेंतून थोडेसे उतारे दिल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

(१) मंगलाचरणीं क्षुद्र देवता । त्यांस कठीण अत्यंत हे गीता ।
विना गीताकार अनंता । कोण टीकाकार टीका करील गीतेची ? ॥ ६७९ ॥

अद्वैताच्या आश्रयें । ब्रह्मचि सर्व देवता या निश्चयें ।
आम्ही ज्ञानी जगद्गुरु स्वयें । ऐसें मानूनि वर्म चुकलें भक्तीचें ॥ ६८० ॥

ब्रह्म सर्वत्र सम । तरी घरची बटिक काय नव्हे ब्रह्म ।
कां तिचें श्रवण कीर्तन न करावें परम ? । कां मंगलाचरण तीचें करूं नये ? ॥ ६८१ ॥

देवता विघ्न हरी । तेच मंगलाचरणीं वंदावी कां परी ? ।
एवं ब्रह्म सर्व, परि उच्चनीच पायरी । एकएकाची उपाधिभेदें ॥ ६८२ ॥

एवं ईश्वरोपाधियुक्त निर्गुण । तेंचि एक भजावें सगुण ।
हें न कळोनि गीताप्रोक्त खूण । तक्र पिती दुग्ध म्हणोनि।६८३।

हें परटीकादूषण । आणि स्वटीकाभूषण ।
अभिमानें कीं न्यायें हे विचक्षण । पाहोत पूर्ण दीर्घदृष्टी ॥ ६८९ ॥

——अध्याय ९.

(२) आतां हे यथार्थदीपिका । यथार्थ गीतार्थ त्याची दीपिका ।
कलियुगतमांत प्रकाशिका । गीतार्थांची प्रगटली ॥११४९॥

भीड कोणाची नाहीं। विरुद्ध अर्थ नावडे कांहीं।
संमत वेदां आणि व्यासादिकांहीं। मूलग्रंथातें तें बोलणें ॥

—अध्याय ११.

(३) तत्त्वतां अर्थ ठायीं पडो, न पडो। सर्वांस टीका आपुली आवडो
हा भाव असे, तरी झडो। जिव्हाच हे ॥ १८१४ ॥

जे निषेधिले टीकाकार। बहुतांस त्या अर्थीं अत्यंत आदर।
ते या टीकेचा करिती अनादर। कळत ऐसें, भगवत्प्रीत्यर्थ बोललों ॥ १८१५ ॥

अष्टादशीं म्हणे भगवंत। कीं भक्ति थोर करूनी अत्यंत।
जो गीतार्थ माझ्या भक्तवृंदांत। सांगेल तैसा प्रिय 'न भूतो न भविष्यति' ॥ १८१६ ॥

या वचनाकडे दृष्टी देवोनी। गीतार्थ पाहतां भक्तिश्रेष्ठत्वा-वांचोनी।
अबाधितार्थ न घडे म्हणोनी। बहुतां स्थळीं देखिलें आणि दाविलें ॥ १८१७॥

भक्ति थोर सर्वांपरिस। तेचि कीं अपरोक्षबोधें सुरस।
ज्ञानहीन भजणें विरस। लवणावीण अन्न जैसें ॥ १८?८ ॥

त्या भगवंताच्या वचना। लक्षूनि या टीकेची रचना।
करितों, जे मत्सरयुक्त जना। आवडेचि ना ॥ १८२४ ॥

माझ्या आत्मया भगवंत आवडो। त्याची कृपा मजवरी पडो।
वरकड घडणार तें घडो। वामन म्हणे ॥ १८२९ ॥

जे अनन्य भक्त। ते या ग्रंथीं होतीच अनुरक्त।
बाधित अर्थीं जे आसक्त। ते तों अभक्त लेखावे ॥ १८२६॥

दृष्टी देवोनि लौकिकीं। आपण एक मोक्षार्थी म्हणूनी लोकीं।
मिरवूं जाय, त्यास उत्तमश्लोकीं। भक्ति कोठोनी उपजेल ॥ १८३० ॥

तो दंभार्थ गीता पाहे। भलती एक टीका धरूनि राहे।
त्या ज्ञानाभिमानप्रवाहीं वाहे। स्वहिततत्पर नव्हे म्हणोनी ॥ १८३१ ॥

त्यास हे कां रुचेल टीका?। चोर गोड न मानी मृगांका।
बाधितार्थ जरी आपणास कळला जितका। तितकाच गोड तो मानी ॥ १८३२ ॥

या प्रकारचे नर फार। ज्यांस सार वाटे असार।
त्यांस दृष्टीं पडे जरी अर्थ सार। तरी प्रिय नव्हे ॥१८३३॥
कीं जो अर्थ वदतां आपण। जनांत म्हणवी निपुण।
त्यास बाध लागतां ज्ञातेपण। आपलें उडतसे ॥ १८३४ ॥

स्वहिताची चाड असे। तरी जो अर्थ सार दिसे।
त्याच अर्थीं बुद्धि वसे। सोडी बाधिता अर्थातें ॥ १८३५ ॥
भक्तचि हे टीका वंदिती। अभक्त तितके निंदिती।
दोन्ही समान, एक जगन्मय जगत्पती। संतुष्ट होईल तेंचि पुरे ॥ १८३९ ॥

—अध्याय १२.

(४) जे निर्मत्सर यती। ते तों हाचि अर्थ मानिती।
जे साभिमान त्यांची भीड किती?। कीं त्यांस भिउनी बोलावें अन्यथा ॥ २९७ ॥

हे यथार्थदीपिका। यथास्थित अर्थाची प्रकाशिका।
स्वयें भगवंत करितो टीका। भीड येथें कोणाची?॥ २९८ ॥

—अध्याय १८.

(५) वंदिती पूजिती तुझे चरण। तरी अंतरीं इतरदेवताशरण।
करिती क्षुद्रदेवतामंगलाचरण। इच्छोनि निर्विघ्न कवितास्फूर्ती ॥ २५ ॥

जगीं मिरवोनी सिद्धी। आपल्या टीकांची केली प्रसिद्धी।
तथापि नाहीं झाली अर्थसिद्धी। यथार्थगीतारहस्याची॥ २७
—अध्याय ९.

अशा तऱ्हेचे वाणेदार, निर्भीड उद्गार वामनपंडितांनीं वारंवार काढलेले आढळतात. दांभिक, बोकेसंन्यासी, क्षौरीसोदे, आणि ज्ञानीपणाचा व निस्पृहत्वाचा आव घालून लोकप्रियता व लौकिक यांसाठीं धडपडणारे छद्मी लोक यांसंबंधें पंडितांच्या मनांत किती तिट्कारा बाणला होता, हेंही वरील उताऱ्यांवरून स्पष्ट होतें. सत्यापुढें व भगवद्वचनापुढें आपण कोणाचीही चाड धरणार नाहीं ही भीष्मप्रतिज्ञा तडीस नेण्यांत पंडितांनीं आपल्या अंगचें अतुल नीतिधैर्य जगाच्या निदर्शनास आणून दिलें आहे, यांत तिळमात्र शंका नाहीं.

जेथें जेथें भगवदुक्तीचा विपर्यास झाला असें त्यांना खात्रीनें वाटलें, तेथें तेथें प्रतिपक्षावर तीव्र प्रहार करण्यांत त्यांनीं मुळींच कसूर केली नाहीं, मग तो प्रतिपक्षी भाष्यकार असो, एकादा लोकप्रिय सिद्ध असो वा व्यासपीठावरून गीतेची व्याख्या करणारा एकादा आपला समकालीन महापंडित असो! टिळेमाळा करून, भागवत धर्माचा टेंभा मिरवून, भक्तिहीन बुद्धीनें एकादशीचे उपासतापास करून सर्व वेळ गप्पाष्टकांत घालविणाऱ्या कर्मठांचाही पंडितांनीं चांगला समाचार घेतला आहे. एकादशीला उपवास करण्याला ऋषींनीं सांगितलें आहे; परंतु लोक त्या शासनाचें खरें मर्म ध्यानांत न ठेवितां केवळ बाह्य कसरती व दिखाऊ कर्मे कशीं करितात व एकंदरींत त्यांच्या-कडून निर्जीव देहाला आलिंगन देण्याचे हास्यास्पद प्रकार कसे घडतात, यांचें पंडितांनीं नवव्या अध्यायांत असें वर्णन केलें आहे:—

नामावांचूनि सदाचार। ते सकळही वेडेचार।
पाय उचलोनी मूत्राची धार। निराळी सोडी श्वानही॥ १०७९ ॥

नामावांचूनि आंघोळी। त्या बेडुकांच्या बुड्या जळीं।
जळीं सर्वदा असे मासोळी। दुर्गंध अंगीं अनिवार॥ १०८० ॥

हरिनाम न म्हणे वाचा। निराहार उपवास एकादशीचा।
चाशिंग अलंकार मस्तकाचा। बांधिजे जे रीती पाठीसी ॥ १०८१ ॥

अहोरात्र जागर उपवास। उपयोगी हरिनामकीर्तनास।
म्हणोनि निद्राहार जनास। ऋषि ते दिवशीं वर्जिती ॥ १०८२ ॥

हें स्पष्ट बोलतां जन। कीर्तन करिती करोनि भोजन।
म्हणोन करते जाले शासन। उपवासाचें ॥ १०८३ ॥

विशेषें एकादशी दिनीं। ऋषि म्हणती करावीं दोनीं।
अहोरात्र जागरणीं। एवं कीर्तनीं तात्पर्य ॥ १०८५ ॥

उपवास करी निराहार। सोंकटीं खेळोनि जागर।
तो नव्हे व्रताचा अधिकार। मुख्य कीर्तन ऋषि बोलती ॥ १०८६ ॥

सासू सुनांचें भांडण। घडला उपवास जागरण।
तें पुण्य एकादशीचें, कारण। जालें विमान जावया ॥ १०८७ ॥

म्हणोनि हरिकीर्तनाविण। निराहार आणि जागरण।
करिती, त्यांसही व्रतगुण। होय, अमृतें अमरता जैसी काकासी ॥

काव्ळा अमृत प्याला । वंश अवघा अमर जाला ।
म्हणोनि अमृत मिळतां मानव भला । न करी पान कावळा म्हणोनी ॥
टाकोनी हरिकथामृत । निराहारी वसे जागत ।
फळ देईलही व्रत । परि नव्हे कृपापात्र देवाधिदेवाचें ॥ १०९० ॥
वाणीही मेळवी धन । धनचि मेळवी रायाचा प्रधान ।
परि तो रायासमान । ग्राम्य तुच्छ धनिक हा ॥ १०९१ ॥
क्षण निद्रा येतां दिवसा । भंग जाला उपवासा ।
हरिनामप्रताप नव्हे ऐसा । कीं नाम पूर्ण करी न्यूनातें ॥ १०९२ ॥
व्रत सफळ नामें परम । विना नाम सकळ अंगहीन कर्म ।
एकादशी तों भागवतधर्म । नामावांचून, शव जैसें विनाप्राण॥१०९३॥

—अध्याय ९.

वरील उताऱ्यांत पंडितांचा भागवतधर्माविषयींचा सदभिमान व हरिनामकीर्तनावरील अकृत्रिम प्रेम हीं सारखीं प्रस्फुरत आहेत. भक्तिहीन कर्मठांची ही अडीचशें वर्षांपूर्वींची स्थिति आजकालही तंतोतंत तशीच दृष्टीस पडत आहे. अशा कर्मठांचाच समाजांत असंख्य भरणा आज जर आपल्याला प्रत्यक्ष दिसत आहे, तर आपली धर्मबुद्धि निःसत्त्व झाली आहे व भागवतधर्म निर्जीव झालेला आहे, असें म्हणणें वावगें होईल काय? या उताऱ्याप्रमाणेंच पंडितांनी भागवतधर्माची व्याख्या अनेक ठिकाणीं केली आहे:—

कीं प्रथम कर्मकांड । त्यापुढें उपासनाकांड ।
तिसरें तें ज्ञानकांड । मधील कांड उपासना ॥ ८०२ ॥
तीं कांडियांचा ऊंस । मधली कांडी स्पर्शली दोहींस ।
खालील वरिलीस आणि वरिली खालिलीस । कांडी स्पर्शली नसे जे रीती ॥ ८०३ ॥
ज्ञानास नातळे कर्म । कर्मास नातळे ब्रह्म ।
उपासनारूप भागवतधर्म । दोहींस लागला ॥ ८०४ ॥
सर्वही तोचि वासुदेव । जो जडालंकारीं चित्सुवर्ण स्वयमेव ।
इत्यादि कीर्तनादिकींही सर्वात्मभाव । ज्ञानाश्रित भागवतधर्म ये रीती

—अध्याय १२.

ज्यास ज्ञानाची लागली गोडी । सगुणीं अत्यंत आवडी ।
त्याणें या भागवतधर्मामृतीं बुडी । घावी आणि बाहेर न निघावें ॥
गार उदकाची उदकीं । बुडवितां हळुहळू विघरेच कीं ।
तैसा सर्वाकार सर्वेश या *उत्तम श्लोकीं । जो बुडी देतो तो अनन्य तद्भक्त ॥ २५४६ ॥

यावेगळे धर्म सकळ । टाकून आश्रय त्याचाच केवळ ।
धरितां त्राणे पुष्कळ । सर्वात्मता समाधी ॥ २५४७ ॥

—अध्याय १८.

हा भागवतधर्म पाळण्याला, ईश्वराची तादात्म्यानें भक्ती करण्याला व मन निवांत आणि निश्चळ राहण्याला, एकांत स्थळें किंवा गिरिगुहा पाहिजेत असें नाहीं. परंतु विषयी, आळशी, लोभी, विलासी अशा प्रकारची मंडळी मात्र टाळली पाहिजे; कारण अशी मंडळी स्वतः पुण्यसाधन न करितां, दुसऱ्या साधुसंतांचीं मनें चंचळ व दूषित करण्याचा मात्र प्रयत्न करिते. प्रेमळ भगवद्भक्तांची संगती सोडून भगवच्चिंतनाकरितां किंवा ध्यानसमाधीकरितां विविक्त प्रदेशांत जाण्याची जरूरी नाहीं. भागवतधर्माचें संगोपन भक्तसभांतच झालेलें आहे व अशा सभा टाळणें म्हणजे केवळ अज्ञान होय. तेराव्या अध्यायाच्या दहाव्या †श्लोकांतील ‘ जनसंसदि ’ या पदाचें विवरण करितांना पंडितांनीं हे विचार नमूद केले आहेत. भक्तसभेंत जातिभेद किंवा अन्य भिन्नभावही राहूं शकत नाहीं असेंही पंडितांनीं त्याच स्थळीं सुचविलें आहे.

जनवार्ता करिती जन । काय तेथें घडेल भजन ।
म्हणोनि कंटाळे मन । एकांतवास तरी घडे ॥ ७३९ ॥
आणि ते म्हणावी जनसभा । जेथें विसरले श्रीवल्लभा ।
ज्या सभेंत तो सादर उभा । ते हरिकीर्तनसभा जनसभा न म्हणावी

* मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु । मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोसि मे ॥ १८।६५

† मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी । विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १३।१०

जो असूनि वैकुंठीं नसे । वसोनि योगियांच्या हृदयीं जो न वसे ।
तो स्वकीर्तनीं वसे, कीं तेथें गवसे । कामधेनूचे स्तनीं जेंवि दुग्ध ॥
ऐसा हरिकथासमाज । ते जनसभा म्हणतां वाटे लाज ।
श्रवणरंध्रें रिघे हृदयीं महाराज । देवाधिदेव श्रीपती जे सभे ॥७३८॥
श्रवण करितां परीक्षिती । न पुरे योगियां भक्तां क्षिती ।
श्रीमद्भागवतार्थ लक्षिती । कीं सर्वभूतीं वासुदेव ॥ ७३९ ॥
भीष्माचिया देहावसानीं । शरपंजराभोंवते योगी मुनी ।
ते जनसभा काय म्हणोनी । म्हणवेल ? ॥ ७४० ॥
वक्ता सूत जातिहीन । श्रोते शौनकादि मुनि सज्जन ।
श्रोते बदरीस तपोधन । वक्ता नारायण नरसखा ॥ ७४३ ॥
एवंच जेथें अध्यात्मकथा । ते जनसभा नव्हे सर्वथा ।
गातीं ऐकती जगन्नाथा । जे सभेमध्यें ॥ ७४४ ॥
तेच वर्जावी जनसभा । जेथें न वर्णिती पद्मनाभा ।
एकांतीं ध्यावें श्रीवल्लभा । यदर्थ विविक्तदेशसेवित्व ॥ ७४९ ॥
क्षण एकांतीं न बैसवे । जनसभे बैसतां न उठवे ।
जनवार्तेपुढें कैंवि आठवे । कैवल्यनाथ? ॥ ७४७ ॥
सरलियाही संसारधंदा । क्षण नाठवी मुकुंदा ।
देखोनी ग्राम्यजनवृंदा । त्यांत कंठी तो काळ ॥ ७४९ ॥
जरी जनसभा न सांपडे । तरी निजे उलथा पालथा पडे ।
समानशीळ मिळतां गडे । द्यूतकर्म सोंगटीं आरंभी ॥ ७५० ॥

—अध्याय १३.

पंडितांचा काळ ठरविण्याचें साधन यथार्थदीपिकेंत नाहीं. परंतु त्यांनीं यथार्थदीपिकेंत ( १५।१६०३ ) आपल्या ' निगमसार ' नामक ग्रंथाचा उल्लेख केला आहे. निगमसाराच्या शेवटीं ग्रंथसमाप्ति शके १५९५ म्हणजे इ. स. १६७३ या सालीं झाल्याचें आहे. आतां पंडितांनीं निरनिराळ्या टीकांचें जें खंडण केलें आहे त्याविषयीं हंस आपल्या निबंधांत लिहितात[1] कीं, यथार्थदीपिकेंत " प्राकृत टीकाकारांच्या नांवाचा उल्लेख स्पष्ट नाहीं व बहुवचनी प्रयोग योजिलेला आहे, यामुळें अनेक टीकाकारांस लक्षून बोलल्यासारखाही भास होतो; तथापि ज्ञानेश्वरावांचून

---

१ हंसकृत वामनपंडितावरील निबंध. पृष्ठ ४५–४६.

अन्य टीकाकारांची मुळींच प्रसिद्धि नाहीं; व सिद्धीच्या साधनानें टीकांची जगांत प्रसिद्धि केली हा आरोप ज्ञानेश्वरावर फार चांगल्या प्रकारें लागू होतो." या विधानावर बरेचसे आक्षेप घेतां येण्यासारखे आहेत. एक तर वामनपंडितांच्या वेळीं म्हणजे इ. स. १७०० च्या सुमारास गीतेवर बऱ्याच प्राकृत टीका झालेल्या होत्या व त्यांपैकीं कांहीं तर विलक्षणच विस्तृत आहेत, असें अलीकडे आढळून आलें आहे. पंडितांच्या वेळीं पुढील प्राकृत गीताटीका अस्तित्वांत होत्या व त्या हल्लींही उपलब्ध आहेत :—

१ ज्ञानेश्वरांची भावार्थदीपिका.

२ देसोपंतांचा गीतार्णव. (हा 'महाराष्ट्रकवींत' प्रसिद्ध होत आहे. हा ग्रंथ १,२५,००० आहे असें म्हणतात.)

३ दासोपंतकृत गीतार्थबोधचंद्रिका व इतर टीका.

४ मुक्तेश्वरकृत गीतेचें भाषांतर.

५ उद्धवचिद्घनकृत गीता—सवाई.

६ तुकारामकृत गीतेचें अभंगात्मक भाषांतर.

७ रंगनाथस्वामिकृत चिदानंदलहरी.

याशिवाय आणखी अनेक प्राकृत टीका इ. स. १७०० च्या पूर्वीं झालेल्या असतील, परंतु त्या अद्याप उपलब्ध झाल्या नाहींत. तेव्हां टीकाकार या बहुवचनांत केवळ ज्ञानेश्वरांचा अंतर्भाव होतो, असें नाहीं. तर त्यांत वरील सर्व ग्रंथकर्ते जमा केले पाहिजेत, हें उघड आहे. आतां 'क्षुद्रदेवतामंगलाचरण,' 'धर्म्यपद,' 'सिद्धी मिरवणें,' 'हठयोगाचा पुरस्कार' 'अप्रयोजक दृष्टान्त' 'जनसंसद'

---

१ मागें पृष्ठ ३२ वरील (५) हा उतारा पहा.

२. इ. स. १५५१–१६१६. (समाधिकाळ, शके १५३७ माघ वद्य षष्ठी).

३. इ. स. १६०९–१६६०.

४. इ. सनाचे सतराव्या शतकाचा पूर्वार्ध.

५. इ. स. १६०८–१६४९.

६. इ. स. १६१२–१६८४.

७. गीता ९।६ यावरील ज्ञानेश्वरी व दीपिका यांतील टीका पहा.

८. मागील पानावरील उतारा व त्या प्रसंगाची ज्ञानेश्वरी टीका पहा.

' *गीताकथनाचें फळ ' इत्यादि मुद्यांवरील पंडितांनीं दिलेले यथार्थ टोमणे ज्ञानेश्वरांनां पूर्णपणें लागू पडतात यांत संशय नाहीं. तसेंच पंडितांनीं आपल्या टीकेला यथार्थदीपिका हें नामाभिधान दिलें, त्या वेळींही त्यांचा कटाक्ष ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेवर असावा, हेंही संभवनीय आहे. परंतु याशिवाय अनेक वादविषय यथार्थदीपिकेंत आले आहेत, त्यांचा ज्ञानेश्वरांशीं मुळींच संबंध नाहीं. चार्वाकादि नास्तिक, भेदवादी, निर्गुणैकवादी इत्यादिकांवर जे सणसणीत कोरडे ओढले आहेत, त्यांचा तर ज्ञानेश्वरांशीं बादरायण संबंधसुद्धां जोडतां येत नाहीं. तशांत कित्येक ठिकाणीं ' कोणी अलीकडील टीकाकार ' असेही शब्द पंडितांनीं योजिलेले आहेत.—

**अलीकडील कोणी टीकाकार । करूनि त्या पक्षाचा अंगीकार ।**
**' ज्ञानियास नलगे सगुण साकार ' । बोलती ऐसें ॥ १९० ॥**

—अध्याय १२.

**अलीकडील कोणी भले । अनुभवी जरी जाले ।**
**त्यांसही मनीं संस्कार राहिले । त्या ग्रंथांचे इत्यादि ॥ ६०९ ॥**

—अध्याय १५.

अर्थात् हे टीकाकार पंडितांचे समकालीन असले पाहिजेत हें उघड आहे. त्याप्रमाणेंच—

**कोणी प्राकृत ग्रंथकार । मनास म्हणती भोक्तृत्वप्रकार ।**
**तो तों सर्वथा विरुद्ध विचार । प्रमाण, अनुभव, युक्तीसही ॥१४७६॥**

--अध्याय १२.

या ओवींत व पंधराव्या अध्यायांतील नवव्या श्लोकावरील टीकेंत ज्या प्राकृत टीकाकारांचा पंडितांनीं उल्लेख केला आहे, त्यांत ज्ञानेश्वरांचा अंतर्भाव होत नाहीं. कारण ज्ञानेश्वर मनाचे ठिकाणीं भोक्तृत्व मुळींच मानीत नाहींत. तेव्हां याचा इत्यर्थ इतकाच कीं, पंडितांनीं ज्ञानेश्वरांवरच असा विशेष कटाक्ष ठेवलेला दिसत नाहीं. ज्यांचें ज्यांचें म्हणून मत गीतावचनांशीं विसंगत असें भासलें, त्यांच्या त्यांच्यावर त्यांनीं सप्रमाण टीका केली आहे. तेव्हां ' बहुवचनीं प्रयोग योजिल्यामुळें अनेक टीकाकारांस लक्षून बोलल्यासारखा ' जो भास कै० हंसांना झाला तोच

* गीता १८।६८ यावरील ज्ञानेश्वरी टीका व पंडिती टीका पहा.

खरा होता, व ज्ञानेश्वरांसंबंधें त्यांनीं जें विशेष अनुमान काढिलें आहे तें ठार लंगडें पडतें.

५ आतांपर्यंत यथार्थदीपिकेची जी चोचणी करण्यांत आली, तीवरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, भगवंतांनीं सच्चिदानंदनामक यतिरूपानें वामनपंडितांस भेट देऊन ब्रह्मविद्यारहस्याचा म्हणजे ज्ञाननिष्ठ सगुणभक्तीचा उपदेश केला. पंडितांना प्राकृत भाषेचा अभिमान होता, त्यांची प्राकृतरचना प्रयोगशुद्ध आहे व संस्कृताभिमानी पंडितजनांचा त्यांना किळस होता. गीतेचा यथार्थ अर्थ व्यक्त करण्यासाठीं पंडितांनीं दीपिका रचिली. काव्य रचण्याचा त्यांचा हेतूच नव्हता व गद्य ग्रंथाचा प्रघात असता, तर त्यांनीं ही टीका गद्यांतच लिहिली असती असें अनुमान होतें. गीतेंत केवळ भागवतधर्म आहे व त्याचें मुख्य लक्षण अद्वैतज्ञानयुक्त सगुणभक्ति हें होय. ज्ञानहीन सगुणभक्तीस, तसाच भक्तिहीन अद्वैतज्ञानास भागवतधर्मांत थारा नाहीं, हा पंडितांचा आद्य सिद्धांत व याचेंच स्पष्टीकरण त्यांनीं पहिल्या अध्यायाच्या आरंभापासून तों अठराव्याच्या समाप्तीपर्यंत यथास्थित भगवदुक्तीला अनुसरून केलें आहे. श्रीकृष्ण हें चैतन्याचें ईश्वरोपाधियुक्त स्वरूप होय व सगुणभक्ति त्याचीच केली पाहिजे. इतर देवता उपाधिभेदानें कमी दर्जाच्या ह्मणून क्षुद्र होत. तेव्हां ज्याला गीतेचा बोध झाला आहे, त्यानें श्रीकृष्णाव्यतिरिक्त अन्य देवतेचें भजन करूंच नये. पंडितांचा ज्ञानेश्वरांवरच विशेष कटाक्ष आहे, असा प्रकार मुळींच नाहीं. ज्यांनीं ज्यांनीं जाणून किंवा चुकून गीतोक्तीचा विपर्यास केला आहे, त्यांत्यांवर पंडितांनीं आक्षेप घेऊन यथार्थ अर्थ स्पष्ट केला आहे. धर्मासंबंधें हल्लींची समाजस्थिति व पंडितांच्या वेळची स्थिति बहुतेक सारखीच भासते. हल्लीं जसे निर्गुणवादी, प्रत्यक्षवादी, भेदवादी, नास्तिक वगैरे निरनिराळे पंथ आहेत, तसेच त्या वेळीं होते. हल्लींचा केवळ सगुणवादी वारकरी पंथ त्या वेळीं उदय पावला होता. हल्लीं जसे बरेचसे संभावित लोक कुटाळक्या करण्यांत, पत्ते खेळण्यांत किंवा बुद्धिबळाच्या पटावर लढाया मारण्यांत सर्व वेळाचा चुराडा करून ईश्वराचें भक्तिपूर्वक स्मरणही करीत नाहींत, तशीच स्थिति त्या वेळींही होती. दांभिक, सिद्ध, बायाबापड्यांना

फसविणारे गोसावी, द्रव्यासाठीं हपापलेले पुराणीक, बोकेसंन्यासी यांचा जसा हल्लीं, तसा पंडितांच्या वेळींही सुळसुळाट होताच. आपल्या धर्मग्रंथांत घुसडाघुसडीचा प्रकार आहे, अशी जशी हल्लीं बऱ्याच विचारी मनुष्यांस शंका आलेली आहे, तशी पंडितांसही आलेली होती. पण आमच्या मतें जोंपर्यंत मानवी स्वभावांत विलक्षण क्रान्ति झाली नाहीं, तोंपर्यंत कोणत्याही देशांत अशा प्रकारचीं सर्व सोंगें सर्वकाळीं सांपडणारच. पंडितांचा काळ म्हणजे जेव्हां मुसलमानी हैदोसाला त्रासून महाराष्ट्रानें स्वराज्य स्थापण्याचा अकटोविकट प्रयत्न केला व अखेर यश मिळविलें तो होय. परंतु पंडितांनीं त्याविषयीं कोठें अक्षरही काढलेलें नाहीं.

६ आतां निःसंदेह पंडितांचे असे कोणते ग्रंथ ठरतात तें पाहूं व नंतर त्यांजविषयींच्या दंतकथांचा त्रोटक ऊहापोह करूं.

यथार्थदीपिकेंत पंडितांनीं 'निगमसार,'[१] 'कर्मतत्त्व,'[२] व 'ब्रह्मस्तुति'[३] या तीन स्वकृत प्रकरणांचा उल्लेख केला आहे. या तिन्ही ग्रंथांचा गीतेवरील समश्लोकींत उल्लेख असून, शिवाय 'हरिनामसुधा,'[४] 'योगवासिष्ठ'[५] व 'श्रुतिसार (संस्कृत)'[६] या आणखी तीन स्वकृत ग्रंथांचा तींत निर्देश आहे 'गीतार्णवसुधा' हाही ग्रंथ पंडितांचाच आहे, कारण त्यांतील गीतावचनार्थांचे श्लोक समश्लोकींतून जसेच्या तसेच घेतले आहेत. 'कर्मतत्त्व' या ग्रंथांत 'निगमसार' व 'चित्सुधा'[७] यांचा उल्लेख आहे, 'चरमगुरुमंजरींत'[८] गीतेवरील टीकेचा मुग्ध निर्देश आहे, आणि 'मंजिरींतील' बरेच श्लोक 'उपादानांत' आहेत; तेव्हां हींही प्रकरणें वामनपंडितांचींच ठरतात. 'अनुभूतिलेश'[९] या संस्कृत ग्रंथांत मलय-

१. यथार्थदीपिका, अ० १५-ओ० ६०३ पहा.
२. दीपिका, १५-९६१ पहा.
३. दीपिका, १५-२१८ पहा.
४. समश्लोकी, १२ (उपोद्घात)-८४ पहा.
५. समश्लोकी, १३ (उपोद्घात)-८८-८९ पहा.
६. समश्लोकी, १२ (उपोद्घात)-८५ पहा.
७. कर्मतत्त्व, ८-७८ पहा.
८. चरमगुरुमंजिरी, १३८ पहा.
९. मागें पृष्ठ २० वरील टीप पहा.

पर्वतावर झालेल्या भगवत्साक्षात्काराची यथास्थित हकीकत आहे, तेव्हां तेंही प्रकरण पंडितांचें निःसंदेहच ठरतें.

गीतार्थ वर्णितां ग्रंथ वाढेल अपरांपर ।
समश्लोकीं प्रतिज्ञा हे केली यास्तव माधवें. ॥
—समश्लोकी,—उपसंहार ५.

या श्लोकावरून समश्लोकीच्या नंतर पंडितांनीं यथार्थदीपिका रचिली असें सरळ अनुमान निघतें. अशा प्रकारानें वामनपंडितांचे एकंदर १३ ग्रंथ निःसंशय कायम करितां येतात. ते येणेंप्रमाणें—१ अनुभूतिलेश (संस्कृत), २ श्रुतिसार (संस्कृत), ३ निगमसार, ४ हरिनामसुधा, ५ चित्सुधा, ६ गीतार्णवसुधा, ७ कर्मतत्त्व, ८ ब्रह्मस्तुति, ९ *योगवासिष्ठ, १० समश्लोकीगीताटीका, ११ यथार्थदीपिका, १२ चरमगुरुमंजिरी व १३ उपादान. हीं सर्व प्रकरणें वेदांतविषयक आहेत, व बहुतेक सर्व श्लोकबद्ध आहेत. अक्षरवृत्तांचें बंधन असूनही पंडितांची रचना या सर्व प्रकरणांतून यथार्थदीपिका व निगमसार या ओवीबद्ध प्रकरणांप्रमाणेंच जोरदार, प्रौढ, सरळ व वळणशुद्ध आहे. विषयप्रतिपादनाची शैली थेट यथार्थदीपिकेसारखीच आहे. कित्येक मुद्यांसंबंधें तर यथार्थदीपिकेंत याच प्रकरणांवर हवाला दिलेला आहे. या सर्व प्रकरणांत हरिनामसुधा व कर्मतत्त्व हीं प्रकरणें फार मधुर, रसाळ व भक्तीनें थबथबलेलीं आहेत; व त्यांतील बरेचसे वेंचे देण्याचा आम्हांस मोह पडत आहे. परंतु स्थलसंकोचामुळें मन आवरणें जरूर पडतें! समश्लोकी गीताटीका तर अप्रतिमच आहे. तींत कित्येक अध्यायांच्या आरंभींच्या उपोद्घातांत व अखेर उपसंहारांत गीतेशीं विसंगत असणाऱ्या सर्व मतांचा पंडितांनीं थोडक्यांत निरास केला आहे. यथार्थदीपिकेची प्रचंड ग्रंथसंख्या पाहून ज्यांची छाती दडपत असेल व म्हणून ती हातांत धरण्याचा ज्यांस उत्साह वाटत नसेल, त्यांनीं ही समश्लोकी अवश्य वाचावी. हींत यथार्थदीपिकेचें भरपूर सार आलेलें

---

* यांत पंडितांनीं आपला प्राकृतभाषाभिमान दर्शविला आहे:—

वदो भाव त्याचा महाराष्ट्र वाणी ।
जरी शब्द थोडे, न अर्थास वाणी ॥ ४ ॥

आहे; कोणताही महत्वाचा विषय राहिला नाहीं. हींतील गीतेच्या भाषांतराची धाटणी अनुपमेयच आहे. जोमदार, सुलभ व आटोपशीर भाषांतर कसें करावयाचें हें शिकणारांनीं हा समश्लोकीचा मायना पुढें ठेविला, तर वावगें होणार नाहीं. मोरोपंत कवी या समश्लोकीला इतके भाळले, कीं त्यांनीं आपली गीतेवरील आर्याटीका वामन पंडितांच्याच समश्लोकीवरून रचिली; पंडितांचेच शब्द पंतांनीं आपल्या आवडत्या छंदांत गुंफले! ही गोष्ट दोन्ही टीका एकदम वाचल्या म्हणजे सहज ध्यानांत येईल. पंतांनींही लपवाछपवी न करितां उघडपणें ही गोष्ट आपल्या टीकेच्या उपोद्घातांत व पुढेंही मधून मधून कबूल केली आहे. पंत म्हणतातः—

श्रीमद्वामनविरचित गीताटीकोत्तमा समश्लोकी, ।
आर्याटीका तेचि, च्छंद निराळें, विचित्र हें लोकीं! ॥

—आर्याटीका ( उपोद्घात) १७.

ऐसें बोलेल हरी पार्थाचा प्रश्न होतसे आर्थी ।
वामनमतेंचि गाइल आर्याछंदें मयूर हीं सार्थी. ॥

—आर्याटीका ५—९.

या समश्लोकीविषयीं पंत पंडितस्तुतींत म्हणतात—

रीति समश्लोकींची अतुला साधेल काय नव्यास? ।
या सुयशें होइल कां रोमांचव्याप्तकाय न व्यास? ॥ ६

ही समश्लोकी टीका पुरी झाल्यावर पंडितांना जो कांहीं आनंद झाला तो गगनीं मावेना! आपल्या हातून हें पवित्र कृत्य ईश्वरी कृपेनें निर्विघ्नपणें व उत्तम रीतीनें पार पडलें म्हणून पंडितांनीं उल्हासाचे भरांत उपसंहारांत असे उद्गार काढिले आहेतः—

*माता धन्य, पिता धन्य, धन्य धन्य सुहृत्सखे! ।
केले गीतार्थ गूढार्थ हृदयांत प्रकाशिता. ॥ ७

---

* पंतांच्या हातून महाभारताचा मराठी तर्जुमा पुरा झाला तेव्हां त्यांनींही अशाच प्रकारचे उद्गार काढिले आहेत—

धन्य श्रीराम पिता, धन्या लक्ष्मी प्रसू जगीं झाली ।
आली सत्यवतीची, कीं भारतकीर्ति सुतमुखीं आली. ॥

—स्वर्गारोहणपर्व, ४२.

आतां वामन धन्यत्व काय वामन वर्णिल ? ।
कीं चराचर हें साक्षात् वासुदेव दिसे जया. ॥ ८
तरि गीतार्थ जो जाणे, कृतकृत्य असाच तो; ।
असा न जो, तया गीता बरवी कळली नसे. ॥ ९

—समश्लोकी, उपसंहार.

असो आतांपर्यंत पंडितांचीं म्हणून कायम झालेलीं सर्व प्रकरणें वेदांतविषयक आहेत. यांपैकीं निगमसार[1] व अनुभूतिलेश[2] या ग्रंथांत पंडितांना सच्चिदानंदयतिवेषानें जो ईश्वरी साक्षात्काराचा योग मलयपर्वतावर जुळून आला, त्याची कच्ची हकीगत दिलेली आहे. हीच गोष्ट पंडितांनीं पुन्हां यथार्थदीपिकेशिवाय समश्लोकी[3], व कर्मतत्त्व[4] या प्रकरणांत निर्दिष्ट केलेली आहे. म्हणजे या तेरा ग्रंथांपैकीं पांच सहा ग्रंथांत या गोष्टीची पुनरावृत्ति झाली आहे. हें पुन्हां पुन्हां सांगण्यांत आत्मप्रौढीचा पंडितांचा हेतु नाहीं, तर

जिज्ञासु जो तया भेटे गुरुरूपें रमापती, ।
मरे इतुकियामध्यें, तरि पावेचि मुक्ति तो. ॥

—स० श्लो० उपसं० १९.

हें तत्त्व लोकांच्या मनांत पूर्णपणें बिंबवावें हा त्यांचा पवित्र मानस आहे. ज्या अर्थी भगवंत आपले गुरु झाले व ते सच्चिदानंदनांवानें व यतिरूपानें आपल्यास भेटले, असें पंडित वारंवार निक्षून सांगत आहेत, त्या अर्थी पंडितांचें समर्थांशीं गुरुशिष्याचें नातें लावणाऱ्या दंतकथा केवळ फिक्याच पडतात. यांपैकीं कोणत्याही ग्रंथांत पंडितांनीं आपलें कुळगोत, गांव, आईबाप याविषयीं यत्किंचितही उल्लेख केला नाहीं. या सर्व ग्रंथांत निगमसार हा ऐतिहासिक दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे; कारण, पंडितांनीं इतर कोणत्याही प्रकरणांत रचनाकाळाचा निर्देश केलेला नाहीं. परंतु या प्रकरणांत मात्र तो त्यांनीं सुदैवानें नमूद केला आहे.

---

१. निगमसार, १—९-६८ पहा.
२. मागें पान २० टीप पहा.
३. समश्लोकी, उपसंहार १६–१८ पहा.
४. कर्मतत्त्व, १—४–५ पहा.

शके पंधरा शतें पंचाण्णव । तैं ग्रंथ प्रगटला अभिनव ।
जो अनादि अनुभव । सकळ संतांचा ॥

—निगमसार, ९—१६३.

यावरून पंडितांनीं हा ग्रंथ शके १५९५ म्हणजे इ. स. १६७३ त गुंफला हें सिद्धच आहे. तसेंच या ग्रंथाचा उल्लेख कर्मतत्त्व, समश्लोकी व यथार्थदीपिका या तीन ग्रंथांत असल्यामुळें, ते ग्रंथ इ. स. १६७३ नंतर लिहिले गेले हेंही उघडच आहे. 'नामसुधा' 'चित्सुधा' 'गीतार्णव-सुधा' इत्यादि ग्रंथांशीं नामसादृश्य व प्रौढरचनासादृश्य ज्यांत आहे, असे 'वनसुधा' व 'वेणुसुधा' हेही ग्रंथ यथार्थदीपिकाकारांचे होत. या प्रकरणांतून निसर्गवर्णनें फार बहारीचीं असून, भक्ति, वत्सल व करुण या रसांना ठिकठिकाणीं अगदीं पूर आलेला आढळतो. जेथें तेथें प्रौढता, सरळपणा व भक्तिनिष्ठा हीं चमकत असून, अश्लील बीभत्स शृंगाराचें नांवही नाहीं. 'हरिविलास' 'रुक्मिणीविलास' 'भामाविलास' 'बालक्रीडा' हे ग्रंथ याच मासल्याचे आहेत. या ग्रंथांत वर्णनीय विषयांशीं कवीची मनोवृत्ति अगदीं तादात्म्य पावलेली आढळते व रसिक वाचकांचीही तत्काळ तीच स्थिति होते, यांत शंका नाहीं. 'प्रियसुधा' हें लहानसें अठरा श्लोकांचें प्रकरण पंडितांनीं आपली पत्नी गिरावाई हीस अद्वैतबोध करण्यासाठीं रचिलें आहे, असें दिसतें. 'अपरोक्षानुभूती' वरील समश्लोकी, गीतासमश्लोकीच्याच तोडीची आहे. 'तत्त्वमाला' व 'राजयोग' हे वेदांतविषयक ग्रंथ यथार्थदीपिकाकारांचेच होत, कारण त्यांतील सर्व विचार दीपिकेंतील विचारांशीं जुळतात. येथवर निर्दिष्ट केलेलीं सुमारें २०—२१ प्रकरणें पंडितांचींच आहेत असें विश्वासपूर्वक म्हणतां येतें. आतां इतर प्रकरणांविषयीं विचार करण्यापूर्वीं पंडितांविषयीं प्रचलित असलेल्या दंतकथांचा खल करणें जरूर आहे.

७ प्रथम संतविजयांतील आख्यायिकेची चर्चा करूं. ही आख्यायिका थोडक्यांत अशी आहे— गागाभट्ट व वामनपंडित हे तुकारामबोवांच्या कीर्तनास बसले असतांना, बोवांनीं श्रुत्यर्थाचा अनुवाद केला. तेव्हां शूद्रानें श्रुत्यर्थ सांगणें, हें गागाभट्टांस न आवडून त्यांनीं बोवांचा निषेध केला; परंतु पंडितांनीं आपलें मत बोवांच्या बाजूनें दिलें व भट्टजींचें

श्रुतिप्रमाणें देऊन समाधान केलें. आतां पंडित हे तुकाराम व रामदास यांचे समकालीन होते, हें निगमसाराच्या रचनाकालावरूनच सिद्ध होतें. तेव्हां ही आख्यायिका संभवनीय आहे, यांत शंकाच नाहीं. परंतु हिच्यावर घेण्यासारखे असे दोन आक्षेप आहेत-एक आक्षेप हा कीं, गागाभट्टांना इ. स. १६७३-४ सालीं शिवाजीमहाराजांचा शास्त्रोक्त राज्याभिषेक करण्याकरितां दक्षिणेंत आणण्यांत आलें होतें; परंतु त्यापूर्वी ते दक्षिणेंत आल्याचें कोठें प्रसिद्ध नाहीं. पण तुकारामबोवा तर इ. स. १६४९ या वर्षींच गुप्त झाले होते. दुसरा आक्षेप वराच विचार करण्यासारखा आहे. या प्रसंगीं पंडितांनीं भट्टजींचें समाधान करण्यासाठीं व बोवांचे प्रीत्यर्थ कांहीं श्लोक रचिले होते; ते श्लोक कै० हंस यांनीं आपल्या निबंधांत[1] व काव्यसंग्रहांतील स्फुटप्रकरणांच्या[2] तृतीय भागांत छापिले आहेत. परंतु त्यांत चमत्कार हा कीं हंसांनीं दिले आहेत चार श्लोक, व काव्यसंग्रहकारांनीं दिले आहेत आठ! आणि त्यातल्यात्यांत विशेष चमत्कार हा कीं दोघांत समान असा श्लोक एकच आहे!! तो हाः-

जयाची[3] वदे पूर्ण वेदान्त वाणी। म्हणावें कसें हो! तयालागिं वाणी?॥
परब्रम्हरूपी असा जो तुकावा। तयाचे तुकीं कोण ऐसा तुकावा?॥

—काव्यसंग्रह.

खालीं टीपेंत दिलेले या श्लोकाचे पाठभेद महत्वाचे आहेत. त्यांत तिसऱ्या चरणांत कै० वा० दा० ओकांचा 'जो तुकावा' असा पाठ असून कै० हंसांचा 'हा तुका वा' आहे. अर्थात् पहिला पाठ घेतला तर वरील श्लोकाच्या द्वितीयार्धाचा "असा जो परब्रह्मरूपी मानावा, त्याच्या बरोबरीला दुसरा कोण वर्णावा?" असा सामान्य अर्थ होईल व तो तुकारामांनाच लागू पडेल असें नाहीं. हंस मात्र 'तुका' हें विशेषनाम घेतात. ओकांनीं दुसऱ्या चरणांतील वाणी शब्दाचा अर्थ 'वणिज्' असा दिला आहे. परंतु तिसऱ्या चरणांत जर 'तुका' असें स्वतंत्र पद

---

१. पृष्ठ ९-१०.

२. पृष्ठ ५.

३. हंसांचे पाठभेदः- वेदान्त-वेदार्थ; परब्रम्हरूपी-परब्रम्हरूपीं; जो तुकावा-जो तुका वा; ऐसा-दूजा.

पाहून अर्थ संकुचित करावयाचा नाहीं, तर येथें तरी कां करावा ? ' वाणी ' याचा अर्थ ' कमतरता, वाण' असा घेतला म्हणजे श्लोकार्थ उत्तम तऱ्हेनें लागून, हें पद्य सुभाषितात्मक होतें. ' ज्याची वाणी पूर्ण वेदान्त वदे, तयालागिं वाणी (=कमतरता, वाण, कमीपणा ) (आहे असें,) कसें म्हणावें?' हा सरळ अन्वय. अशा रीतीनें हा श्लोक वांध्यांत पडला म्हणजे कै० हंसांनीं दिलेल्या चारी श्लोकांत तुकारामाचाच निःसंशय संवंध दाखविणारें असें कांहींच उरत नाहीं. शिवाय त्यांत दुसरी एक गोम आहे ती ही कीं, त्यांचा चवथा श्लोक ' हरिविलास*' किंवा ' कालियामर्दन ' या काव्यांत आलेला आहे. तो श्लोक हा:—

आत्मा जगज्जीवन वामनाचा। जो सोहळा नित्य नवा मनाचा।
नानामृतें ग्रंथ कलौ करीतो। नामें जना तारक लौकरी तो॥

तेव्हां ह्याचा तुकारामस्तुतीशीं संवंध नसतां तो तेथें कसा तरी घुसविण्यांत आला, यांत शंकाच नाहीं. राहतां राहिले दोन श्लोक, त्यांतील पहिल्यांत हरिकीर्तनमाहात्म्य आहे व दुसऱ्यांत गुरुकृपेचें फळ आहे. तेव्हां हंसांनीं दिलेल्या श्लोकांचा असा चिवडा उडाल्यावर त्यांत विश्वसनीय व वरील दंतकथेस उपकारक असें कांहींच राहत नाहीं. काव्यसंग्रहांतील ' तुकारामस्तुति ' मात्र खरी तुकारामस्तुति आहे. परंतु त्यांत वरील आख्यायिकेचा कोठेंच संवंध दर्शविलेला नाहीं. एकंदरींत ही तुकारामस्तुति पाहूनच वरील आख्यायिका बनविली गेली असेल, असें मानिलें तर फारसें चुकीचें होईल असें वाटत नाहीं. पण ही तुकारामस्तुति पंडितांची मात्र नाहीं. कारण ईश्वरोपाधियुक्त असें जें चैतन्यस्वरूप श्रीकृष्ण, त्या व्यतिरिक्त इतर देवतांनाही भजणें म्हणजे अश्लाघ्य, असें मानणाऱ्या व कंठरवानें हें मत जगास जाहीर करणाऱ्या पंडितांच्या तोंडून,

जया दर्शनें स्पर्शनें मुक्त होती। तुका नाम वाचेस जे आणिताती।
पुनर्जन्म त्या प्राणियालागिं कैंचा। तुकारामवाणी जया नाम वाचा॥२

अशी स्तुति बाहेर पडेल असें आमचें मन घेत नाहीं. बहुतकरून हा कोणी तरी त्या वेळच्या गाजलेल्या संतमंडळीच्या पुढ्यांतील ' वामन ' असावा. यमक्या व रामदासी वामन तो हाच असा आमचा अंदाज

---

* हरिविलास, अध्याय १ श्लो० ६.

आहे, व याचा यथार्थदीपिकाकारांशीं कांहीं संबंध नाहीं. पण याविषयीं पुढें योग्य स्थळीं पुरी वाटाघाट होणार आहे.

८ आतां हनुमंतस्वामींच्या रामदासी बखरींतील पंडितांविषयींच्या हकीकतीचा विचार करावयाचा. या हकीकतींत मुख्य मुद्दे चार आहेतः– ( १ ) वामनपंडित काशींत बारा वर्षें अध्ययन करून दक्षिणेंत येत असतां वाटेंत हजारों पंडितांशीं वाद करून त्यांनीं जयपत्रें मिळविलीं. अखेर ते आळंदीस आले. तेथें इंद्रायणीच्या तीरीं त्यांस एक ब्रह्मराक्षस ब्राह्मणवेषानें भेटला व त्यानें सांगितलें कीं, हा वादाचा प्रकार तुम्ही असाच चालवाल तर माझ्यासारखेच पापयोनीला जाऊन ब्रह्मराक्षस व्हाल. तर तुम्ही तुकारामबोवांस शरण जाऊन, त्यांची कृपा संपादा म्हणजे पापमुक्त व्हाल. ( २ ) तेव्हां ब्रह्मराक्षसाचे सांगण्यावरून पंडित तुकारामाकडे गेले व त्यांनीं उपदेशाची याचना केली. परंतु, "आम्हीं शूद्र, आम्हांस उपदेश करण्यास अधिकार नाहीं" असें सांगून बोवांनीं पंडितांना रामदासाकडे फेटाळलें. रामदासांनीं त्यांना बदरिकाश्रमीं जाऊन, तप करून ईश्वरी कृपा संपादण्यास सांगितलें. पंडितांनीं बदरिकाश्रमीं बारा वर्षें हरळीच्या मुळ्यांचा रस पिऊन तपश्चर्या केली. परंतु भगवंत भेट देईनात. म्हणून ते वैतागून जेव्हां प्राणहत्या करण्यास सिद्ध झाले, तेव्हां त्यांना चतुर्भुज मूर्तीचें साक्षात् दर्शन घडलें. परंतु भगवंतांनीं पंडितांना उपदेश देण्याचें नाकारिलें व ते म्हणाले, "आपण उपदेश करूं शकत नाहीं. तें काम साधूंचें आहे. रामदासांसच गुरु करून त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागा." तेव्हां पंडितांची पुन्हां पायपिटी सुरू झाली. रामदासांकडे आल्यावर पंडितांस पुन्हां सांगण्यांत आलें कीं, "आपण श्रीशैल पर्वतावर अवधूतमूर्तीचें दर्शन घेऊन आपली इच्छा पूर्ण करून घ्यावी." पंडितांनीं शैलपर्वतावर अवधूतांचें दर्शन घेतलें, परंतु समाधिकाळ जवळ येऊन ठेपल्यामुळें, अवधूतांनीं पुन्हा रामदासावर हवाला देऊन, पंडितांना धाडून दिलें. ही अखेरची हुंडी मात्र पटली व पंडित, रामदासशिष्य बनले. ( ३ ) एक दिवस पंडित व रामदास यांमध्यें चवदा ब्रह्मांसंबंधानें वाद लागला. चौदा ब्रह्में पंडितांनीं स्थापावीं व समर्थांनीं उडवावीं, असें अनेक वेळ झालें. पंडितांचा निःसंशय होईना व

वाद कांहीं मिटेना. तेव्हां समर्थांनीं मारुतिरूप धारण केलें व भुःभुःकार करून व शेपटाचा तडाखा देऊन पंडितांना दडांवून विचारिलें "वामना! समस्या पूर्ण झाली कीं नाहीं?" वामनानें गांगरून 'हो' म्हणून सांगितलें. तेव्हां पूर्वीचें सौम्य रामदासी रूप धरून समर्थांनीं पुन्हा तोच प्रश्न केला, तेव्हां पंडितांनीं 'नाहीं' हा सरळ जबाब दिला. अखेर समर्थांनीं पंडितांचीं उंटाचीं उंट पुस्तकें, भाराभर जयपत्रें आणि अकटोविकट ग्रंथावलोकन या संबंधें मर्मभेदक उद्गार काढून, "बृहदारण्यांत चौदा ब्रह्मांची स्थापना करून उठविण्याचा प्रकारही आहे तो पहा," म्हणून सांगितलें. तेव्हां पंडितांचें समाधान झालें. नंतर समर्थांनीं पंडितांना प्राकृत रचना करण्याचा उपदेश केला व पंडितांनींही संस्कृतांत समर्थांची मनसोक्त स्तुति केली; ती हनुमंतस्वामींनीं दिली आहे. पुढें पंडितांनीं यथार्थदीपिकादि बारा लक्ष ग्रंथ लिहिला व त्यांतील सुंदर यमकें पाहून समर्थांनीं त्यांस 'यमक्या वामन' हें नांव ठेविलें. (४) अवधूतमूर्तीचें दर्शन घेऊन पंडित समर्थांकडे येत असतांना वाटेंत एकदा स्वयंपाक करीत होते. त्यांची स्त्री गिराबाई बरोबर होती, परंतु ते मध्वसंप्रदायी वैष्णव असल्यामुळें तिच्या हातचें जेवीत नसत. चुलीवर भांडें ठेविलें असतांना, पंडित सच्चिदानंदपदाचा विचार करण्यांत इतके गढून गेले कीं, चुलीवरून भांडें ढळलें हें त्यांच्या लक्ष्यांत आलें नाहीं. तेव्हां गिराबाईला हसूं आलें. त्यावर 'हंसलीस कां?' ह्मणून पंडितांनीं विचारिलें. तेव्हां गिराबाई म्हणाली, "तीन वेदांचा अद्याप विचार करीत आहां म्हणून हंसलें." हें ऐकतांच पंडितांनीं तिला आलिंगन दिलें व म्हणाले, 'तूं माझी पत्नी आहेस म्हणून वंदन करीत नाहीं. नाहींतर वंदनच केलें असतें.' नंतर तिच्या सूचनेवरून अवधूताज्ञेप्रमाणें पंडित लवकरच समर्थांकडे उपदेशास्तव आले. त्या वेळेपासून पंडित स्वस्त्रीच्या हातचें जेवूं लागले. हा हनुमंतस्वामींनीं दिलेल्या हकीकतीचा इत्यर्थ आहे.

ही *हकीकत यथार्थदीपकाकारांची असूं शकणार नाहीं हें अनेक रीतीनें

---

* रामदासस्वामींच्या चरित्राची बखर--पृष्ठें २१०-३०४ पहा. हीच हकीकत काव्येतिहाससंग्रहांत छापिलेल्या वामनचरित्रांत थोड्याशा फरकानें नमूद केलेली आहे.

सिद्ध करितां येतें. पहिला मुख्य आक्षेप हा कीं, जर पंडित हे खरोखरच रामदासांचे शिष्य झालेले असते व त्यांच्या ब्रह्मविद्येच्या उपदेशानेंच त्यांच्या मनाला स्वास्थ्य आलेलें असतें, तर सच्चिदानंदयतिवेषानें येऊन भगवंतानें आपल्याला हें रहस्य विशद करून सांगितलें, असें पंडित खोटेंच लिहिते काय? मागें लिहिण्यांत आलेंच आहे कीं, ही गोष्ट पंडितांनीं पांच सहा वेळ सांगितली आहे; परंतु समर्थांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नामनिर्देश त्यांनीं कोणत्याही ग्रंथांत एकदांही केला नाहीं. हनुमंतस्वामींनीं दिलेल्या वरील गोष्टींतील प्रत्येक मुद्यावर पुष्कळ शंका येतात. पहिल्या मुद्यांत ब्रह्मराक्षसाची अद्भुत गोष्ट आहे, तिला फारसें महत्व देतां येत नाहीं. फार तर पंडितांना कांहीतरी कारणानें एकाएकीं उपरति होऊन असमाधान उत्पन्न झालें व कोणी तरी सत्यज्ञान करून देणारा गुरु गांठला पाहिजे, असें त्यांस वाटूं लागलें, इतकेंच त्यांतून निष्पन्न होऊं शकेल; आणि हेंच त्यांतील खरें सार आहे. कारण ही गोष्ट पंडितांनीं अनुभूतिलेशग्रंथांत दिलेल्या त्यांच्या स्वतःच्या हकीकतीशीं जुळती आहे आपल्या मनाला असमाधान उत्पन्न होऊन आत्मोपदेशासाठीं आपण अनेक गुरु पाहिले व संस्कृत आणि प्राकृत असे विविध ग्रंथ वाचिले, असें पंडित सांगतात—

*आचार्यत्वाय बहवः सेविता भूतले मया ।
आत्मोपदेशसमये गुरुत्वेन न मानिताः ॥ १३९
एवं संस्कृतशास्त्रज्ञाः प्राकृतग्रंथवित्तमाः ।
बहवः सेवितास्तत्त्वमद्वैतं ते वदन्त्विति ॥ १४०

---

* या श्लोकाचें साम्राज्यवामनकृत मराठी भाषांतरः—

गुरुत्वाकारणें म्यां या भूतळीं बहु सेविले ।
आत्मोपदेशसमयीं आचार्यत्वें न मानिलें ॥ १३९ ॥
एवं संस्कृतशास्त्रज्ञ प्राकृतग्रंथवित्तम ।
अद्वैततत्त्व बोलाया सेविले म्यां बहुत ते ॥ १४० ॥
वर्षशताचिया पूर्वीं प्राकृतग्रंथकार जे ।
त्यक्तदेही जे यथोक्त न तैसे ज्ञानि प्रस्तुतीं ॥ १४२ ॥
होतां निराश, ज्ञानातें नच भूतळिं जाणता ।
संगमीं सित असित सिद्धान्त तनु त्यागणें ॥ १४३ ॥

प्राकृतग्रंथकर्तारो ये तु वर्षशतात्पुरा ।
त्यक्तदेहास्तैर्यथोक्तं न तथा ज्ञानिनोधुना ॥ १४२
ततो ज्ञाने निराशोहं जातो नास्तीति भूतले ।
विनिश्चितस्तनुत्यागः सितासितसमागमे ॥ १४३

यावरून पंडित तुकाराम, रामदास इत्यादि साधुसंतांकडे गुरूपदेशासाठीं गेले होते, हेंही उघड आहे. परंतु यापलीकडे हनुमंतस्वामींच्या कथेंत कांहींच तथ्य दिसत नाहीं. उलट पंडित साफ म्हणतात कीं, 'मला या पृथ्वीवर खरें खरें अद्वैतज्ञान करून देणारा गुरु कोणीच भेटला नाहीं. शेवटीं मी ज्ञानाविषयीं निराश झालों व गंगायमुनासंगमांत देहत्याग करण्याचा निश्चय केला.' यावरूनही हनुमंतस्वामींच्या हकीकतींतील आणखी एक सत्यकण हातीं लागतो कीं, पंडित एकदा निराशेनें जीव देण्यास तयार झाले होते खरे. परंतु नुसतेंच भगवद्दर्शन झालें पण उपदेश झाला नाहीं, अवधूतसेवा घडली पण त्यांनीं " उपदेश समर्थांचा घ्या " म्हणून पंडितोंना सांगितलें, वगैरे गोष्टींचा थांगपत्ताही लागूं शकत नाहीं. आणि

" यं प्राहुः शिवनिर्विशेषमनिशं ब्रह्मेति वेदान्तिनः
कर्तारं कुशलाः प्रमाणपटवः सद्युक्तिभिस्तार्किकाः ।
अन्ये स्वाभिमतं वदन्ति बहुधा सांख्याः प्रधानं परं
तस्मै सद्गुरवेति (?) संतु नतयः श्रीरामदासाय मे ॥ १ "

यासारखी अघळपघळ स्तुति पंडितांच्या लेखणींतून उतरणें म्हणजे सूर्यबिंबांतून अंधाराचा लोट बाहेर पडण्यासारखेंच आहे! चौदा ब्रह्मांविषयींच्या वादासंबंधीची हकीकत महिपतीनें संतविजयाच्या एकविसाव्या अध्यायांत दिली आहे, परंतु तो वाद कोणी एक ब्राह्मण व समर्थ यांमध्यें झाल्याचें बोवा लिहितात. तेव्हां हा विरोध हनुमंतस्वामींच्या कथेवर मारक आहे. शिवाय बाळाजी आणि कंपनींतील चरित्रकार म्हणतात त्याप्रमाणें " पदार्थास संज्ञार्थ ब्रह्म असें नांव दिलेलें, परंतु तो पदार्थ खरें ब्रह्म नव्हे; असे हे चौदा पदार्थ ब्रह्म या नांवानें मोडतात, परंतु ते ब्रह्म नव्हत ही क्षुल्लक गोष्ट या महापंडितांस समजली नाहीं व तीं ब्रह्मेंच आहेत, असा ते दुराग्रह धरून बसले*" ही गोष्ट

* वामनपंडितांचें चरित्र ( बाळाजी आणि कंपनी ) पृष्ठ ११.

संभवत नाहीं. हनुमंतस्वामींनीं वर्णिलेला अद्भुत प्रकार; समर्थांनीं धरलेलें रुद्रस्वरूप; केलेला भु:भु:कार; वामनाला दिलेले शेपटाचे तडाखे; चौदा ब्रह्मांसंबंधें वाद चालला असतां, ‘ समस्या पूर्ण झाली का? ’ म्हणून केलेला प्रश्न वगैरे सर्व गोष्टी अप्रयोजक, अघटित व समर्थांच्या कीर्तीशीं विसंगत दिसतात. गिराबाई हंसली त्या संबंधींही गोष्ट विलक्षण भासते. कारण गिराबाईच्या उत्तरांत पंडितांनीं उपसंहार होण्यासारखें अपूर्वज्ञान भरलेलें होतें असें मुळींच दिसत नाहीं. वाचकांनीं पुढील उतारा गिराबाईच्या गोष्टीशीं ताडावा:—

श्रीसच्चिदानंद गुरू । ब्रह्मविद्येचा कल्पतरू ।
करुणामृताचा सागरू । वेदांतवेद्य गोविंद ॥ ९ ॥
जो भेटला मल्याचळीं । मार्गीं पाक करते काळीं ।
आधीं स्फुरला हृदयकमळीं । सच्चित्पदार्थ विचारितां. ॥ १० ॥
उपनिषदार्थ पाहतां । आत्मा ब्रह्म हें तत्त्वतां ।
परि अनुभवा नये ऐशी चिंता । ज्या दिवसांत अत्यंत ॥ ११ ॥
तथापि सत्पदें पाहतां । आपणासि घडे ब्रह्मता ॥
परि आनंद कैसा न कळे तत्त्वतां । मनीं ऐसा विचार ॥ १६ ॥
ऐसें विचारितां मनीं । तों ऐकों आली हास्यध्वनि ।
पाहतों जों परतोनी । वस्त्र भगवें देखिलें. ॥ १७ ॥
कृपादृष्टीं अवलोकुनी । ‘काय विचारितां हो मनीं?’ ।
म्हणोनि पुसतां धावोनी । श्रीचरणा लागलों. ॥ १९ ॥

—निगमसार, अध्याय १.

अशा प्रकारें सच्चिदानंदसाक्षात्कार झाल्याचा जो प्रकार निगमसारांत वर्णिला आहे, त्यांत यतीच्या ठिकाणीं गिराबाईची योजना होऊन वरील दंतकथा उपस्थित झाली व हनुमंतस्वामींनीं आपल्या रामदासस्वामींच्या चरित्रांत ती तशीच घुसडली! या एकंदर घोटाळ्याचा उलगडा असा करितां येतो कीं, तुकाराम व रामदास यांची स्तुति गाणारा, यमकांचा अभिमान बाळगणारा, ‘ यमक्या वामन ’ या नांवानें प्रसिद्धीस आलेला, पांडित्याचा वृथागर्व समर्थांनीं परिहार केल्यामुळें त्यांचा शिष्य बनलेला, संतमंडळीच्या पुढ्यांत शिरलेला व दत्तात्रयादिकांचीं स्तोत्रें रचणारा वामन ही अगदीं स्वतंत्र व्यक्ति होती व त्याचा यथार्थदीपिका-

रांशीं कांहींच संबंध नव्हता. अर्थात् कालांतरानें रामदासस्वामींचा शिष्य जो वामन त्याची कीर्ति यथार्थदीपिकाकारांच्या प्रचंड ग्रंथकर्तृत्वापुढें व लौकिकापुढें लोपून गेल्यामुळें, तो लोकांच्या स्मृतींतूनच नष्ट झाला व मग वामनकवि या नांवाला यथार्थदीपिकाकार वामनपंडित यांशिवाय कोणी हक्कदारच राहिला नाहीं. तेव्हां समर्थशिष्याचे ग्रंथ व आख्यायिका यांची साहजिक रीतीनें यथार्थदीपिकाकारांच्या ग्रंथांशीं व आख्यायिकांशीं भेसळ होऊन त्यांचा पूर्ण मिलाफ बनला, व हा सर्व चिवडा यथार्थदीपिकाकारांच्या नांवावर लादण्यांत आला. ही उपपत्ति जर गृहीत धरली, तर हनुमंतस्वामींच्या हकीकतींतील प्रत्येक मुद्यांतील कांहीं भाग पंडितांनीं दिलेल्या स्वतःच्या वृत्ताशीं कां जुळतात व जेथें जेथें समर्थांचा संबंध आला आहे तेथें तेथें अद्भुतता व विसंगतता हीं कां दिसून येतात, यांचें मर्म उघड होईल, असें आम्हांस वाटतें. या समर्थशिष्याचे म्हणून कोणते ग्रंथ वेगळे निवडतां येतात, याचा पुढें योग्य स्थळीं खुलासा होईल.

९ कै० हंस, बाळाजी आणि कंपनींतील चरित्रकार, वा. दा. ओक वगैरे दरोबस्त चरित्रकारांनीं पंडितांचें कुलवृत्त जें दिलें आहे, त्यास आधार काय तो एका प्रकरणाचा आहे. हें प्रकरण म्हणजे 'भीष्मप्रतिज्ञा' ऊर्फ 'भीष्मयुद्ध' होय. हें अवघें २१ श्लोकांचें आहे. त्यांतील पहिला व एकविसावा हे श्लोक येणेंप्रमाणें आहेतः—

लक्ष्मीनृसिंहचरणद्वयसारसाचा ।
जो हेतु मान्य वदती बहुसार साचा ।
प्रत्यूहमत्तगजसिंह तया नमीतों ।
जाणें तयाहुनि कदापि न आन मी तों ॥ १ ॥
ताताभिधा नृहरि पंडित, माय लक्ष्मी ।
जे सर्वदा सुगुणयुक्त उदार लक्ष्मी ।
शांडिल्य गोत्र, कुळदेव नृसिंह ज्याचा ।
दासानुदास निज वामन हो मनाचा ॥ २१ ॥

येथें कवीनें प्रथम श्लोकांत पर्यायानें व अंत्य श्लोकांत सरळ रीतीनें आपल्या मातापितरांचीं लक्ष्मी व नृसिंह अशीं नांवें दिलीं आहेत. तसेंच गोत्र शांडिल्य, कुळदेव नृसिंह व स्वतःचें नांव वामन हेंही सांगितलें

आहे. यांत संदिग्धता मुळींच नाहीं. आतां प्रश्न इतकाच कीं, हा वामन व यथार्थदीपिकाकार वामन हे एकच मानावयाचे कीं काय? भीष्मप्रतिज्ञा हें काव्य अगदींच किरकोळ व फालतू आहे. त्यांतील श्लोकसंख्याही केवळ एकवीसच आहे; म्हणजे जर हें काव्य यथार्थदीपिकाकारांचें असें समजलें, तर त्यांच्या वर निश्चित झालेल्या महाग्रंथांपुढें हें प्रकरण खंडींत राई किंवा दर्यांत विंदू याप्रमाणेंसुद्धां साजणार नाहीं. तेव्हां यथार्थदीपिका, 'निगमसार, कर्मतत्त्व, हरिविलास, नामसुधा, ब्रह्मस्तुति वगैरे प्रचण्ड, बुद्धिवैभवदर्शक, भक्तिपरिपूर्ण, अत्यंत उपयुक्त व हृदयंगम ग्रंथांत जी गोष्ट पंडितांनीं सर्व जगापासून गुप्त ठेविली, जिचा रेसभरही थांगपत्ता लागूं दिला नाहीं, त्याच गोष्टीचा परिस्फोट करण्यासाठीं या क्षुल्लक एकवीसश्लोकी प्रकरणांत हपापून, एकदाच नव्हे, तर दोनदा स्पष्ट उल्लेख करतील हें मानवी स्वभावाला व युक्तीला साजेसें आहे काय? प्रस्तुत प्रकरणांत राधाकृष्ण किंवा कृष्ण-रुक्मिणी अशा तऱ्हेचें ईश्वरस्वरूप वर्णिलें असतें, तर तें काव्यप्रसंगास तरी शोभलें असतें, कारण प्रसंग कृष्णावतारींचा आहे. परंतु लक्ष्मी-नृसिंहाचा प्रकृत विषयाशीं काय संबंध होता? अर्थात् कांहीं नाहीं. तेव्हां विषयाशीं असदृश असें मंगलाचरण करण्यांत कवीचा हेतु इतकाच दिसतो कीं, आपल्या मातापितरांचीं किंवा कुळदेवतांचीं नांवें प्रसिद्ध होऊन, त्यांविषयीं आपली उत्कट भक्तीही जगजाहीर व्हावी. तेव्हां अशा तऱ्हेची अनावर उत्कंठा यथार्थदीपिकाकारांस खचित साजत नाहीं. म्हणून भीष्मप्रतिज्ञेचा कर्ता वामन हा यथार्थदीपिकेचा कर्ता नव्हे, असें साफ म्हणण्यास आम्हांस तर कांहीं हरकत दिसत नाहीं. वामनी ग्रंथांत मोडणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही काव्यांत ही माहिती आलेली नाहीं. नाहीं म्हणायाला ‘ उपदेशमाला ’ ( प्रकरण १ लें ) हें जें ६४ अभंगांचे प्रकरण काव्यसंग्रहांत पंडितांच्या स्फुट प्रकरणांच्या तिसऱ्या भागांत छापिलें आहे, त्यांत नृसिंह हें नांव आलें आहे

उपदेशमाला सुता देवराया । नृसिंहें विनाया करवीली. ॥ ६२ ॥
तेचि सर्व शिष्यां उपयोगा आली । कंधरीं घातली ज्यानें त्यानें. ॥ ६३ ॥
वामनें अर्पिली श्रीगुरुचरणीं । सकळ करणी तयाचीच. ॥ ६४ ॥

परंतु यांतील नृसिंहाचा व वामनकवीचा संबंध काय होता हें स्पष्ट होत नाहीं तरी पण त्यांचें पितापुत्रांचेंच नातें ठरतें असा कोणाचा आग्रह असेल, तर या **शांडिल्यगोत्री नृसिंहसुत वामना**चीं (१) भीष्मयुद्ध (२) उपदेशमाला १ ली व (३) उपदेश माला २ री इतकींच प्रकरणें निश्चित होतात.

१० इतर प्रकरणांचा विचार करायचा म्हणजे प्रथम जीं प्रकरणें त्रुटित आहेत किंवा कविनामहीन आहेत तीं वेगळीं काढणें जरूर आहे. अशा तऱ्हेचीं प्रकरणें सुमारें पंधरा आहेत. स्थालीपाक, पार्थभाग्य, कंसवध २ रा, गोरसविक्रय, रसनास्तुति, नाममहिमा, भक्तिमाहात्म्य, भगवद्दास्य या प्रकरणांपैकीं कांहीं त्रुटित व सर्व कविनामहीन आहेत. भीष्मशरपंजर हें प्रकरण चिंतनीय आहे. यांत शेवटचा श्लोक असा आहेः—

काशीस नाम जननी, जनकाभिधानी ।
श्रीविश्वनाथ, मम दैवत कृष्णवेणी ॥
श्रीमन्महेश अघमर्षण जो उपायीं ।
दासानुदासाचि तरे दत्त तो सुपायीं ॥ २९ ॥

यांतील प्रथमार्धांत कवीनें आपल्या आईबापांचीं नांवें काशी व विश्वनाथ दिलीं असून, त्याचें कुळदैवत कृष्णवेणी असल्याचें स्पष्ट आहे. उत्तरार्धांतील श्रीमन्महेश हें कवीचें नांव आहे कीं काय तें समजत नाहीं पण हें काव्य नृसिंहसुत वामनाचें किंवा यथार्थदीपिकाकार पंडितांचेंही नाहीं हे स्पष्ट आहे. शुकरंभासंवाद हें प्रकरण अर्धवटच आहे अर्थात् शेवटचा भाग उपलब्ध नसल्यामुळें, खरें म्हटलें तर या काव्याचा उपसंहारात्मक श्लोक सांपडणेंच असंभवनीय आहे, तरीपण त्या प्रकरणाचा उपसंहारात्मक श्लोक छापून प्रसिद्ध आहे आणि विशेष चमत्कार हा कीं, यांतील उपसंहार व रुक्मिणीविलासांतील उपसंहार एकच आहे, तो असाः—

धरतिल हृदयीं हा 'प्रेमसंवाद' साधू ।
म्हणउनि अभिधानीं ग्रंथ हा हेंचि साधू ॥
गुणलव कथिले हो वामनें केशवाचे ।
धरुनि चरण चित्तीं श्रीहृषीकेश वाचे ॥

कृष्ण आणि रुक्मिणी यांच्या संवादास ‘ प्रेमसंवाद ’ हें नांव यथार्थ आहे, हें प्रत्येक रसिक किंवा नुसता व्यवहारज्ञानीही कबूल करील. पण शुकरंभासंवादाला हें नांव कां आणि कसें द्यायचें हें मात्र प्रत्येकाला न उलगडणारेंच कोडें पडणार ! तसेंच शुकरंभासंवादाशीं ‘ गुणलव कथिले हो वामनें केशवाचे। ’ या चरणाचा बादरायण संबंधही लावण्याचें धाडस कोणी समजस करील असें वाटत नाहीं. श्लोक म्हटला कीं वामनाचाच व मग एकाद्या प्रकरणांत कविनाम नसेल किंवा तें प्रकरण अपुरें असेल, तर वामनाचें नांव ज्यांत आहे, असा वाटेल तो उपसंहारात्मक श्लोक घुसडण्यांत कसूर करावयाची नाहीं, ही जी घातक चाल जुन्या लेखकांची व हरिदासांचीं होती, तिचेच हे गुण पाघळले आहेत ! ही स्थिति आणखी किती प्रकरणांत झाली असेल तें खात्रीनें अजमावतां येत नाहीं. परंतु कित्येक ठिकाणीं हा प्रकार बिनचूक उघ-डकीस येतो, त्यांपैकींच प्रकृत स्थळ हें एक आहे. नौकाक्रीडा हें प्रकरण याच मासल्याचें आहे. प्रकरण अर्धवट पण वामनी शिक्क्याचा उपसंहार हा आहेच. या प्रकरणाचीं कांहीं अधिक पद्यें परिशिष्टांत दिलेलीं काव्य-संग्रहांतील पुस्तकांत आढळतात. त्यांतील शेवटलें पद्य असें आहे:—

ऐकोनी जननी हरीस हृदयीं घेऊनि दे चुंबना ।
बा रे ! तूं बहु कष्टलास म्हणुनी घालीतसे भोजना. ॥
शय्या घालुनि मंचकीं निजविलें त्या वासुदेवाप्रति ।
सद्भावें करि विश्वनाथ हृदयीं अत्यंत त्याची प्रिती. ॥ १८ ॥

यावरून हें काव्य विश्वनाथ कवीचें आहे, हें निर्विवाद ठरलें. परंतु जोंपर्यंत हा श्लोक उपलब्ध नव्हता, तोंपर्यंत तें वामनाच्या नांवाखालीं दडपण्याला वामनी ठशाचा उपसंहारात्मक श्लोक होता ! भगवत्स्तुति हें षट्‌श्लोकात्मक प्रकरण याच नमुन्याचें. काव्यसंग्रहांत तिसऱ्या भागांत स्फुटश्लोक दिले आहेत, त्यांतील बरेचसे वामनाचे नसावेत. त्याच भागांतील सवायांपैकीं कांहीं सवाया उद्धवचिद्धनाच्या ग्रंथांत छापिल्या आहेत, असें नुकतेंच एका इसमानें केसरीपत्रांत प्रसिद्ध केलें होतें.

गंगालहरी* व भर्तृहरीचीं शतकें यथार्थदीपिकाकारांचीं किंवा कोणत्याही वामन कवीचीं आहेत, असें म्हणण्यास तिळमात्रही आधार नाहीं. श्लोक म्हटला कीं वामनी, या पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या विश्वासाचें हें एक ठळक प्रत्यंतर आहे. प्रस्तुत लेखकाच्या एका मित्रानें वामनी गंगालहरीची म्हणून एक हस्तलिखित पोथी आणून दिली आहे. ही पोथी अर्धवट असून, हातीं आलेल्या पानांत केवळ सतरा श्लोक आहेत. पण यांपैकीं एकही श्लोक पंडितांच्या नांवावर प्रसिद्ध झालेल्या गंगालहरीशीं जुळत नाहीं! तेव्हां हीं प्रकरणें पंडितांच्या नांवावर मोडलीं जाण्याचें कारण केवळ पंडितांची श्लोकाविषयीं ख्याती होय चतुःश्लोकी भागवताचीही हीच व्यवस्था. गंगालहरी या काव्यांत गंगेचीच स्तुति करून, तिला सर्व देवांच्या डोक्यावर बसवलेली आहे, तेव्हां गीताभिमानी पंडित या काव्याशीं प्राकृतजनांचा परिचय करून देण्यांत फारसें भूषण, शतकृत्यता किंवा पुण्य मानतील असें आम्हांस वाटत नाहीं. अद्वैतज्ञान व भक्ति यांचा फैलाव करण्याची ज्यांना उत्कट इच्छा होती, त्या पंडितांना तो आपला हेतु तडीस जाण्याला भर्तृहरीच्या शतकत्रयानें कांहीं साहाय्य होईल असें मानण्याला आधार आहेसें दिसत नाहीं. शृंगारशतक तर पंडितांना केवळ अस्पर्श्यच आहे. तसेंच या शतकत्रयांत कांहीं ठिकाणीं शंकरभक्ति आढळते, तीही पंडितांच्या मतांशीं विसदृशच दिसते. विश्वासबंध हें काव्य पंडितांचें आहे असें मानण्यास हरकत मुळींच नाहीं. परंतु

> **'विश्वास-बंध' करवी वरवा मनाचा ।**
> **ऐसा समर्थ अभयंकर वामनाचा ॥**

या पंधराव्या श्लोकांतच हें प्रकरण समाप्त झालेलें आहे व पुढील सात श्लोक या प्रकरणाला उगीच जोडलेले आहेत प्रेमसरी हें प्रकरण सरस आहे. परंतु पंडितांचें नाहीं, असें वाटतें. त्याच्या आदीं व अंतीं

---

* बाळाजी आणि कपर्नीच्या वामनी ग्रंथांत गंगालहरी व ब्रह्मोपदेश हीं प्रकरणें छापिलीं आहेत. परंतु 'वामनाच्या नांवावर मोडणारीं प्रकरणें' या मथळ्याखालीं त्यांचा संग्रह करण्यांत आला आहे. या प्रकरणांपैकीं ब्रह्मोपदेश हा वामनशिष्य साम्राज्यवामन याचा आहे.

कवीचें नांव नाहीं, पण तें मध्येंच पंचेचाळिसाव्या श्लोकांत आलें आहे. ही पद्धति पंडितांची नाहीं. त्याप्रमाणेंच "मी वेडें वांकडें गातों बोलतों आहें, पण यांत हरीचें नाम आहे, तरी संत हो! हें गोड मानून घ्या" वगैरे विनवणीचा प्रकार पंडितांच्या म्हणून निश्चित झालेल्या ग्रंथांत आढळत नाहीं जर हें काव्य वामनाचेंच म्हणून समजलें गेलें, तर त्याचें कर्तृत्व समर्थशिष्याकडे जाईलसें वाटतें, अशा रीतीनें कविनामहीन त्रुटित किंवा लेखकांनीं वामनी शिक्याचे श्लोक घुसडून घोंटाळलेलीं प्रकरणें बाजूस ठेवून, आतां उर्वरित प्रकरणांचा निकाल कसा लावितां येईल याचा विचार करूं.

११ बाकी राहिलेल्या प्रकरणांचा सूक्ष्म विचार केला तर पंडित व नृसिंहसुत वामन यांशिवाय 'वामन' नांवाचे दुसरे निदान तीन कवी होते असें सिद्ध होतें.

(१) **वासिष्ठगोत्री वामन.**–काव्यसंग्रहांत पंडितांच्या नांवानें दोन संस्कृत प्रकरणें छापिलीं आहेत, एक अनुभूतिलेश व दुसरें सिद्धांतविजय. पैकीं पहिलें प्रकरण तर खुद्द पंडितांचेंच आहे, हें मागेंच सिद्ध करण्यांत आलें आहे. आतां सिद्धांतविजय या प्रकरणांतील शेवटचा श्लोक असा आहे:—

अहो, देहो जातो रघुकुलगुरोर्गोत्रजलधौ।
शुकश्रीव्यासाद्या मुनय इह यत्पूर्वजतमाः॥
स्वनाम्ना यद्भासौ हरिपदरजो वामन इति
श्रियः कान्तः कर्तापि च स्वकृतसिद्धान्तविजयः॥ ९६॥

यांत या वामनकवीचा जन्म सूर्यवंशाचा गुरु जो वसिष्ठ त्याच्या गोत्रांत झाला हें उघडपणें सांगितलें आहे. तेव्हां वासिष्ठगोत्री वामन शांडिल्यगोत्री नृसिंहसुत नव्हे, किंवा यथार्थदीपिकाकार वामनपंडितही नव्हे हें निर्विवाद ठरतें. याच कवीनें रामजन्म व सीतास्वयंवर हीं प्राकृत काव्यें रचिलीं आहेत, कारण त्या दोन्हीं काव्यांत पुढील श्लोक आढळतो:—

श्रीमद्भागवतांत आणि इतर ग्रंथीं, महाभारतीं।
श्रीमद्रामकथा निरूपिलि बरी; व्यासाचिही भारती.॥

गातां तेचि शुकादि गोत्रज बळी मध्यें वसिष्ठान्वयी ।
माझा वामन राम गाइल तयीं लक्षूनि सर्वान्वयीं ॥

—रामजन्म, ४६ व सीतास्वयंवर, २०.

तसेंच रामजन्मांत पुढील श्लोक आहे:—

उपाध्याय रामास माने; मुनी हो! स्ववंशीं स्मरे भक्त जो नेमुनी हो ॥
सुखें रामसेवी अशा गोत्रजाला; स्मरोनी ऋषीमात्र संतुष्ट झाला. ।४७॥

नृहरिदर्पण या काव्याची रचना हुबेहुब सीतास्वयंवराप्रमाणें आहे. रामानें शिवचाप मोडलें व नृसिंह स्तंभ फोडून बाहेर आला, या दोन्ही वेळच्या वर्णनांतील विलक्षण साम्य पाहिलें, म्हणजे दोन्हीं काव्यांचा कर्ता एकच होता, असें मानल्यावांचून सुटकाच राहत नाहीं.

शिवचापभंगाचा प्रसंग:—

कड कड कड चापीं जेधवां शब्द जाला ।
तड तड विधिअंड त्रास दे अब्जजाला ॥
तडफडि फणिराणा, कंप भूमंडलाला ।
खडबडि कनकाद्री धाक आखंडलाला ॥ ९१ ॥

..........................................

भांड ब्रह्मांड अखंड । सातादीपां खंडखंड ।
होऊं पाहे खंड खंड । गगन गडाडिलें ॥
राक्षसांत मुंड मुंड । रावणादि पुंड पुंड ।
होती त्यांचें पिंड पिंड । हृदय तडाडिलें ॥
भ्याले भूप लंड भंड । जगदिग्गज उदंड ।
तोंडीं उगाळितां गंड । शोणित भडाडिलें ॥ ९२ ॥

आतां स्तंभस्फोटाचा प्रसंग पहा.—

स्तंभ तो अवचितांचि कडाडी । अब्जजांड अवघेंचि तडाडी ॥
अब्जजादि हृदयांत धडाडी । काळ मेघशतनाद घडाडी ॥ १०१ ॥

..........................................

ध्वनि उठला अखंड । व्यापी द्वीप खंड खंड ।
होऊं पाहे खंड खंड । ब्रह्मांड हे विदारुनी ॥
दिग्गजाचे चंड चंड । भग्न शुंड दण्ड गण्ड ।
लेंडे टाकिती उदंड । पायु वायु सारुनी ॥
भ्याले दैत्य लंड भंड । दानवेंद्र मुंड मुंड ।
होती त्यांचे पिंड पिंड । रोमांच उभारुनी ॥ १०३

कंसवध ( प्रथम ) हें काव्यही याच कवीचें आहे. सीतास्वयंवरांत चापभंगासाठीं रामचंद्र उठला असतां व कंसवधार्थ कृष्ण सिद्ध झाला असतां प्रेक्षकांत जे निरनिराळे रस उद्भवले, त्या दशरसांचीं वर्णनें दोन्हीं प्रकरणांत बरींच सारखींशीं दिसतात. शृंगाररसवर्णनांत तर विचार व शब्द बहुतेक तेच आढळतात.

**अनंगरंगांबुधिच्या तरंगीं । रंगीं शुभांगी जडि अंतरंगीं ॥**
**भंगील हा हो धनु कैंवि रंगीं? । म्हणे कुरंगी-नयनी सुरंगी ॥**

—सीतास्वयंवर, २०.

**सर्वांग शृंगाररसास नेत्रीं । कीं रंग दावूनि कुरंगनेत्री ॥**
**अनंगरंगांबुधिच्या तरंगीं । रंगीं करी व्याकुळ अंतरंगीं ॥**

—कंसवध ११.

‘ गजेंद्रमोक्ष ’ व ‘ वामनचरित्र ’ हीं याच वशिष्ठान्वयी वामनाचीं असतील, असा अंदाज भाषासरणीवरून होतो या सर्व प्रकरणांची भाषा बरीच शुद्ध, श्रवणमधुर व शब्दार्थालंकारमंडित आहे. वर्णनांतून स्वभावोक्ति चांगली वठली आहे व ठिकठिकाणीं ध्वनि व अर्थ यांची मोहक रीतीनें साजेशी सांगड कवीनें घातली आहे. तेव्हां या वामनाची कविता एकंदरींत चांगलीच हृदयंगम व रसाळ आहे.

**( २ ) यमक्या वामन.**—हा बहुतकरून समर्थशिष्य वामन असावा. यानें आपल्या काव्यांतून ठिकठिकाणीं आपल्या यमकांची प्रौढी मिरविलेली आढळते. यमकाकरितांच केवळ छंद बदलल्याचेंही कवीनें एक दोन काव्यांत स्पष्ट लिहिलें आहे. अशा प्रकारचा यमकाभिमान पुढील काव्यांत आढळतो.

**हरिगुणीं ग्रथिल्या यमका पहा । धरिल थोर भयें यम काप हा ॥**
**हरिगुणांविण हो यमका करी । तरि न दंड धरी यम कां करीं?॥९१॥**
**रामतुष्ट अशिया यमकां हो । आणिखी नियम संयम कां हो ?॥**
***वामनें हरिगुणीं रसनेला । अर्पिता, अनुभवीं रस नेला ॥ ९२ ॥**

—भरतभाव.

---

* हेंच अर्ध भगवत्स्तुति या प्रकरणाच्या शेवटीं उगीच घुसडलेलें आढळतें. काव्यसंग्रह, पंडितकृत स्फुटकाव्यें भाग ३ पहा.

विराटपर्व[१], भागवतीरामायण[२] व द्वारकाविजय[३] या प्रकरणांतही हा यमक-गर्व ढळढळीत दिसतो. दुसऱ्या अनेक वामनी प्रकरणांत या प्रकरणांपेक्षांही अधिक सुंदर यमकें साधलीं असतां, तेथें अशी प्रौढी प्रकट केलेली आढळत नाहीं, म्हणून तर या वामनाला निवडून वेगळा काढितां येतो. भागवतीरामायण, अ० १ श्लोक ३२ यांत यमकास्तव मुळचा छंद समश्लोकींत ठेविला नाहीं असें कवी सांगतो. विराटपर्वांत कवीनें ज्ञानेश्वरांचा दोनदा मोठ्या पूज्यभावानें उल्लेख केला आहे.

**पशूच्या मुखीं बोलवी वेद गा रे! अहंपंडितां देत हट्टें दगा रे ॥**
**असा चिन्मणी भाविकांचा धणी रे। त्यजूनी न घे कामकांचा धणी रे ॥**
—अ० ६ श्लो० १९९.

**परमनिगम बोले ज्ञानराजा हल्या हो।**
**नवल मजमुखेंही ग्रंथ हा जाहल्या हो? ॥**
—अ. ८–१२७.

यावरून हा 'यमक्या वामन' समर्थशिष्य असावा या अनुमानाला दुजोर येतो. 'मनास बोध'[५] 'लोपामुद्रासंवाद' 'हनुमंतस्तव' 'करुणाष्टक'[६] 'वामनबोध' 'शुकाष्टक'[७] 'नामाष्टक' 'दत्तस्तव' 'तुकारामस्तुति' वगैरे प्रकरणें याच कवीचीं असावींत. यांतील 'विराटपर्व' प्रकरणांत दोन तीन अध्यायांत गणपतीला नमन केलेलें आहे. यावरून हें काव्य पंडितांचें नाहीं हें तर निर्विवाद ठरतें. पण ही गोष्ट समर्थशिष्याच्या

१. अ. ८, श्लो. १२८ व १३१ पहा.

२. अ. १ श्लो. ३२ व अ. २ श्लो. ३३ पहा.

३. विजय २–श्लो. ४४ पहा.

४. द्वारकाविजयांत पुढील श्लोक आढळतोः—महात्मा असा शब्द गीतेंत नाना। तया वाचितां ते करीती तनाना। प्रमाणा जयालागिं ओंव्या मराठ्या। धरीती करीं काठिया ऊरफाट्या. ॥ ४।८९. यांतही ज्ञानेश्वरीचा उल्लेख असेल असें वाटतें.

५. यांत गोपिचंद व भर्तृहरी यांच्या उपरतीचा उल्लेख आहे. रामदासी मनाच्या श्लोकांच्या धाटणीवरच हे श्लोक रचण्याचा प्रयत्न केलेला आहे.

६ यांत रामदासी करुणाष्टकांचें अनुकरण आहे.

७. काव्यसंग्रहांत छापलेल्या या प्रकरणांतील चार श्लोक (११–१४) शुकाष्टक नांवाच्या प्रकरणांत शब्दशः तसेच आढळतात.

आड येण्याचें कारण नाहीं. समर्थांचे मुख्य दैवत जरी राम होतें, तरी 'दासबोध,' 'मनाचे श्लोक' वगैरे प्रकरणांत त्यांनीं गणपतिसरस्वतींला नमन केलें आहे. 'सुखकर्ता, दुःखहर्ता' ही प्रसिद्ध आरतीही समर्थांचीच आहे.

वरील प्रकरणांपैकीं कांहींतील भाषा साधारण सरळ व भारदस्तही आहे, परंतु कांहींची अगदीं गचाळ, अशुद्ध व पोरकट आहे. पण समर्थशिष्य वामनाविषयीं जी दंतकथा आहे, तीवरून असेच असणें स्वाभाविक दिसतें. हा कवी संस्कृताचा अभिमानी असून, प्राकृत भाषा वापरणें हें तो प्रथम पापच समजत असे. परंतु पुढें समर्थांनीं त्याचा गर्व परिहार करून, त्यास प्राकृत रचना करण्यास लाविलें, अशी दंतकथा आहे. तेव्हां 'मनास बोध,' 'करुणाष्टक,' 'विराटपर्व' वगैरे प्रथम घेतलेलीं प्रकरणें, मराठीचा चांगलासा सराव नसल्यामुळें, रचनेसंबंधें वरीचशीं कमी दर्जाचीं निपजलीं. परंतु पुढें मराठी रचनेचा व्यासंग जसजसा वाढत चालला, तसतसें तिच्या ठिकाणीं प्रयोगशुद्धत्व, सरसत्व व प्रौढपणा हीं येऊं लागलीं, असें दिसतें.

(३) **शृंगारप्रिय वामन.**—कात्यायनी व्रत (प्रथम), रासक्रीडा, राधाभुजंग, राधाविलास, गोपीगीत, जलक्रीडा वगैरे काव्यें या कवीचीं असावींत. यांतील रचना फारच गोड, कोमल व मनाला भुलविणारी आहे. यमकानुप्रास ओतप्रोत खचले असून, छंदही उद्दिष्ट रसाला पूर्णपणें अनुकूल असेच निवडले आहेत. रचनेंत तरतरी व मृदुता, चमत्कारिकत्व व सरळता, प्रौढता व विनोद यांचें फारच चटकदार मिश्रण झालेलें आहे. पण या काव्यांतील मुख्य गोम ही आहे कीं, भक्तिरसाच्या ऐवजीं शृंगाराचा लोंढा यांत फार जबरदस्त झाला आहे. शृंगाररसाचा भयंकर महापूर उद्दामपणानें वाहून गेल्यामुळें, बऱ्याच ठिकाणीं अश्लील बीभत्सपणाच्या कर्दमांत वाचकांचें मन अटकून राहतें व मग 'प्रवृत्तींत निवृत्ति दाखविण्याची' कितीही जादू व कवाईत कवीनें केली, तरी ती स्थिति लवमात्रही सुधारत नाहीं. कामदृष्टीनें व विषयलोलुपतेनें माझीं काव्यें वाचूं नयेत व मीं तीं त्या हेतूनें लिहिलींही नाहींत, असें कवीनें ठिकठिकाणीं बजाविलें आहे.

प्रवृत्तिप्रसंगांत दावी निवृत्ती ।
तया माधवातें समर्पूनि वृत्ती ॥
कथा वर्णिली वामनें केशवाची ।
जगीं धन्य तो यांस जो लेश वाची ॥ ९४ ॥

—कात्यायनीव्रत.

अशी रासक्रीडा मदनशर अध्याय रचिली ।
प्रवृत्तीच्या लीलांहुनि बहु निवृत्तीच रुचली ॥
निवृत्तीवांचूनी न किमपिहि वृत्तांत गवसे ।
दिसे ब्रह्मीं त्याला जग कनकिं जैसा नग वसे ॥ १०२ ॥
प्रवृत्तीची लीला निजरस निवृत्तींत मिरवी ।
प्रवृत्ती वृत्तांत त्वरितचि निवृत्तींत फिरवी ॥
भवार्ता हे वार्ता निववुनि विवर्ता परिहरी ।
रमाभर्ता कर्ता करुनिहि अकर्ता परि हरी. ॥ १०३ ॥

—रासक्रीडा.

या संबंधानें राधाभुजंग ५४-५५ व जलक्रीडा २४ हेही श्लोक पहावे. परंतु निवृत्तीचा उपदेश करूं निघणाऱ्या वामनानें मूळ भागवतावर अश्लीलपणांत ताण करून, शृंगारिक वर्णनें मर्यादेस झुगारून देऊन बीभत्सतेच्या पराकाष्ठेला न्यावीं, यासारखा आश्चर्यकर असंबद्धतेचा दुसरा नमुना आढळेल असें आम्हांस वाटत नाहीं आपण भक्तिगौरवासाठीं जें काव्य लिहीत आहों, तें काव्य रतिमंजरीच्या किंवा अनंगरंगाच्या तोडीचें न होण्याबद्दल कवीनें काळजी घेऊं नये, यापेक्षां अधिक लाजिरवाणें तें काय? महाराष्ट्र सारस्वतांत रा० भावे म्हणतात, "पंडितांच्या काव्यांत बीभत्सपणा अनेक ठिकाणीं आढळतो व कित्येक ठिकाणीं तर अगदींच गरज नसतांही त्याची योजना केली आहे. यांच्यासारख्या जाड्या कवीनें व विद्वान् पंडितानें असल्या घाणेरड्या प्रकारांत लवमात्र तरी आनंद मानावा, हें जरा विपरीत दिसतें." ( पृष्ठ ५८ ) हें रा. भाव्यांचें म्हणणें अगदीं रास्त आहे; व म्हणूनच आम्ही असें म्हणण्याचें धाष्टर्य करितों कीं, हीं काव्यें (आणि याच काव्यांस उद्देशून रा. भाव्यांचें विधान आहे ) यथार्थदीपिकाकारांचीं नव्हेतच. यांचे कर्ते कोणी तरी निराळेच रंगेल शृंगारी वामनकवी असावेत.

१२. अशा रीतीनें वामन पंडितांच्या नांवावर मोडणाऱ्या बहुतेक सर्व ग्रंथांची वर्गवारी झाली. आतां भूगोलवर्णनासारखीं कांहीं प्रकरणें आहेत, परंतु त्यांचें फारसें महत्व नाहीं व त्यांविषयीं विशेषसें कांहीं सांगावयाचेंही नाहीं. कात्यायनीव्रत ( दुसरें ), बालक्रीडा ( दुसरी ) इत्यादि कांहीं सवाईबद्ध प्रकरणें आहेत. पण तीं अत्यंत नीरस, अशुद्ध व पाणचट अशी आहेत. तीं पंडितांचीं असतील अशी शंका स्वप्नांतसुद्धां घ्यावयाला नको. तेव्हां त्यांविषयीं विस्तारेंकरून लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

१३. निगमसार हा ग्रंथ शके १५९५ म्हणजे इ. स. १६७३ या वर्षी लिहिला गेल्याचें मागेंच आलें आहे त्यानंतर पंडितांनीं समश्लोकी, कर्मतत्त्व, यथार्थदीपिका वगैरे ग्रंथ लिहिले. तेव्हां पंडित इ. स. १६७४ या वर्षानंतर निदान १५।२० वर्षें तरी जगले असावेत असें वाटतें. पंडितांनीं अखेर संन्यास घेतला होता असें कांहीं चरित्रकारांचें म्हणणें आहे. परंतु चतुर्थाश्रम परतंत्र आहे, तेव्हां घेण्यांत अर्थ नाहीं, काम्य संन्यासच स्वतंत्र व योग्य, असें त्यांनीं आपलें मत दीपिकेंत स्पष्टपणें दिलें आहे.

**आणि संन्यास हाचि ( काम्य संन्यास ) खरा । कीं याच करितां आश्रम चतुर्थ बरा ॥**
**शिखा वोडोनि तोडिला दोरा । आणि काम्य मनीं तो नरक पावे संन्यासी. ॥ १०३ ॥**
**काम्यत्यागावांचोनी । आश्रम संन्यास उत्तम म्हणोनी ।**
**कोणीं बोलेल यावरोनी । आश्रम संन्यास गोमटा या संन्यासें. ॥ १०४ ॥**
**जरी काम्यत्याग केलियावरी । संन्यास आश्रम तदुपरी ।**
**तरी काम्यत्यागीं त्याची शिखादोरी । काय खाऊं मागते ? ॥ १०५ ॥**
**जनकें शिखा वोडिली । कीं अर्जुनें दोरी तोडिली ।**
**जन्मान्तर संन्यासाची गोष्टी जोडिली । प्रमाण त्यास कोठें ? ॥ १०६ ॥**
**आश्रम संन्यासाविना । काम्यत्याग संन्यासें गृहस्थां जनां ।**
**अधिकार देखिला कीं टाकितां कामना । आश्रम संन्यासावांचून संन्यास ॥ १०७ ॥**
**आतां वैराग्य उपजे जे दिनीं । संन्यास घ्यावा तेचि दिवशीं म्हणोनि ।**
**श्रुति बोले त्याही वरोनि । काम्यत्याग संन्यासेंचि गोड आश्रम संन्यास. ॥ १०९ ॥**

एवं चतुर्थाश्रम परतंत्र। काम्यत्याग संन्यास स्वतंत्र।
इत्यादि अर्थशतांचें सूत्र। पूर्वार्ध या श्लोकाचा॥ १११॥

—अध्याय १८, श्लो० २.

यावरून पंडितांनीं चतुर्थाश्रम घेतला नसावासा वाटतो. पंडित हे कोठील राहणारे होते हें समजण्यास त्यांच्या ग्रंथांत साधन नाहीं. पंडित कोरेगांव कुमठें येथील राहणार म्हणून हनुमंतस्वामी म्हणतात व सर्व चरित्रकारांनीं त्यांचाच अनुवाद केला आहे. डॉक्टर वुइल्सन आपल्या मराठीवरील निबंधांत कोल्हापूर हें पंडितांचें मूलस्थान असें लिहितात. शिरगांव कोरेगांव मुक्कामीं वारणा नदीच्या तीरीं पंडितांची समाधि आहे, असें कळल्याचें भारतीय साम्राज्याचे कर्ते व महाराष्ट्र सारस्वताचे कर्ते म्हणतात; व त्यांनीं ही माहिती काव्यसंग्रहांतून घेतली आहे. पंडितांची कोरेगांवास जरी समाधि असली, तरी त्यांनीं संन्यास घेतलाच होता असें नाहीं, कारण शवदहन झालेल्या जागीं साधुपुरुषांच्या स्मरणार्थ समाधि बांधण्याची किंवा छत्री उभी करण्याची चाल महाराष्ट्रांत असे.

१४ असो; या निबंधांत पंडितांचे म्हणून कोणते ग्रंथ निःसंशय ठरवितां येतात व त्यांच्या नांवावर मोडणारे इतर कवींचे कोणते ग्रंथ आहेत याचाच फक्त विचार करावयाचा होता. तो यथामति करून तदनुषंगानें त्यांच्या चरित्रांतील ठळक ठळक मुद्यांचा व त्यांच्या मतांचाही विचार करण्यांत आला आहे. पंडितांच्या काव्यांचें काव्यदृष्टीनें गुणदोषविवेचन करावयाचें म्हणजे त्यावर एक निराळाच निबंध लिहिणें भाग आहे, त्या विषयाचा प्रस्तुत निबंधांत अंतर्भाव होऊं शकत नाहीं.

वा. अ. भिडे.

११४

## देहूची यात्रा.

लेखकः—रा. गोपाळ कृष्ण देवधर, एम्. ए.

या लेखांतील मुख्य विषय धार्मिक असून त्यांतील विचार स्वतंत्र व निर्भीड आहेत. भाषा सुबोध व जोमदार आहे. विवेचनपद्धति सर्वांना रुचेल अशी असून निरनिराळ्या प्रसंगीं स्वभावनिरीक्षणाच्या दृष्टीनें केलेल्या वर्णनामुळें व मुख्य विषयास पोषक अशा प्रसंगोपात्त सुचलेल्या विचारामुळें तिच्या ठिकाणीं मोहकता आली आहे.

ह्या पुस्तकांत, धर्मज्ञानाच्या दृष्टीनें धर्मक्षेत्रें पाहण्याची आवश्यकता, भक्तिमार्गाचा इतिहास, महाराष्ट्रांत संतमंडळीनें केलेल्या कामगिरीचें स्वरूप, महत्त्व व धोरण वगैरे मुद्यांचा उल्लेख केला असून, यात्रांची आवश्यकता व उपयुक्तता, त्यासंबंधीं येणारे आक्षेप व त्यांस समर्पक उत्तरें यांचा विस्तारानें विचार केला आहे.

सारांश, यात्रा हें एक धर्मशिक्षणाचें द्वार आहे, हें दाखविण्याचा ह्या लेखाचा मुख्य रोंख आहे. किंमत ०≈, टपालखर्च ०॥.

---

## कै० प्रो० जिन्सीवाले ह्यांचें त्रोटक चरित्र.

लेखकः—नारायण कृष्ण गद्रे.

प्रोफेसरसाहेबांचें इतकें विस्तृत चरित्र अद्याप दुसऱ्या कोठेंही आलेलें नाहीं. किंमत ०≈॥, ट. ख. ०॥.

---

## स्वामी विवेकानंद ह्यांचें चरित्र.

---

किंमत ०≈, ट. ख. ०॥.

## अष्टाविंशत्युपनिषदः

(गुटका, उपनिषदें २८)

यामध्यें ईश, केन, कठ, प्रश्न, मुण्ड, माण्डू [illegible] ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्य, श्वेताश्वतर, कैवल्य, जाबाल, [illegible] ाथर्व, नारायण, बृहज्जाबाल, कौषीतकि, सूर्य, कृष्ण, हयग्रीव, दत्तात्रेय, रुद्राक्ष, महावाक्य, कलिसंतरण, जाबालि, बह्वृच, मुक्तिक इतकीं उपनिषदें आलीं आहेत. किंमत ·।।। व्ही. पी. नें ·।।।≋.

## पञ्चदशी.

(पॉकेट साईज गुटका)

विद्यारण्य, रामकृष्णविरचितटीकासहित. वेदांतग्रंथांमध्यें हा ग्रंथ अत्यंत महत्वाचा असून सुबोध व सरळ असल्याचें सुप्रसिद्ध आहे. साधारण संस्कृतज्ञालाही या ग्रंथानें वेदांताची सरणी चांगली अवगत होते. किंमत ·।।। व्ही. पी. नें ·।।।≋.

## ब्रह्मसूत्रशांकरभाष्य.

(रत्नप्रभा–भामती–आनंदगिरी व्याख्यांसहित)

या तीनही टीका त्या ग्रंथाचें अध्ययन करणाराला एकत्र मिळाव्या या उद्देशानें वर भाष्य व त्याचे खालीं तेवढ्याच भाष्यावरील टीका येईल अशा रीतीनें त्या छापल्या असून प्रत्येक अधिकरणाचे प्रथमसूत्राखालीं त्या त्या अधिकरणाच्या अर्थाचे संग्राहक भारतीतीर्थमुनिप्रणीत **वैयासिकन्यायमालें**तील श्लोक दिले आहेत. चतुःसूत्रीभामतीवर भरपूर टिप्पणी, ग्रंथाचे शेवटीं सूत्रांचा वर्णक्रमकोश व आरंभीं विषयानुक्रमणिका दिली आहे. किंमत ८ रु. व्ही. पी. नें ८।।।.

# तुकारामाची गाथा.

**सचित्र व पाठभेदटिप्पणींसह. अभंगसंख्या ४५८५.**

हें पुस्तक खिशांत रहात असल्यामुळें प्रवासांत बरोबर नेतां येतें. कागद मोहरेदार असून कव्हरावर श्रीविठोबारखुमाईचें चित्र व नांव सोनेरी अक्षरांनीं एम्बोज करून बाइंडिंग मजबूत व सुरेख केलें आहे. किंमत १ रु. व्ही. पी. नें १८≋.

हीं व याशिवाय येथें मिळणारीं सर्व पुस्तकें आमचेकडे विकत मिळतील.

व्यवस्थापक–**श्रीसरस्वतीमंदिर,**

पेंडसे यांची वाडी, गिरगांव–**मुंबई.**

REFBK-0000114